लोकप्रभा

१० डिसेंबर २०२१
वीस रुपये
पृष्ठ संख्या ५२

धाकधूक...

VISIT…

कव्हरस्टोरी

६ **धाकधूक...**
शैलजा तिवले

१० **ओमायक्रॉन**
कौनैन शेरीफ एम.

१२ **किलर्स स्क्वॉड्रन**
विनायक परब

१६ **रडके मूल आपलेसे करण्यासाठी**
डॉ. चारुता गोखले

१८ **बॅलन डी'ओरच्या प्रतिष्ठेला धक्का**
अन्वय सावंत

२० **भय इथले संपत नाही...**
केतकी जोशी

२३ **दुहेरी भूमिका बजावताना**
जितेंद्र जोशी (मुलाखत - देविका जोशी)

लोकप्रभा | लेखानुक्रम

१० डिसेंबर २०२१ ■ वर्ष ४८ ■ अंक ३५

२६ **रावीची हॅट्ट्रिक**
जय पाटील

२८ **बाबल्याचो गाव**
सरिता बांदेकर

३१ **नातं मैत्रीचं...!**
अनिकेत देशमुख

३२ **वेडी**
सुनील शिरवाडकर

३४ **समृद्ध करणाऱ्या बालकविता**
मोहन कुंभार

३६ **माजगावकरी सहजयोग**
सोनाली नवांगुळ

३७ **निकोप दृष्टी...**
प्रा. मो. नि. ठोके

३८ **सामिष मेजवानी**
तुषार प्रीती देशमुख

४० **संस्कार**
मेघना फडके

४२ **अंधश्रद्धा आजही कायम**
अविनाश पोईनकर

४४ **शब्दकोडे**
सरिता वेंगुर्लेकर

४५ **राशीभविष्य**
सोनल चितळे

४६ **पधारो म्हारे देश...**
मकरंद जोशी

वाचकपत्रे

महत्त्वपूर्ण माहिती

'लोकप्रभा' दिवाळी अंकातील 'पोटातील आनंद' हा संपादकीय 'मथितार्थ' वाचला. खूपच छान लिहिले आहे. पोटातील आनंदचा अर्थ अनेकांना माहीत असला, तरी मलाही माहीत नव्हता. आता समजला, खूपच छान 'मथितार्थ' आहे. पोट हा आपला दुसरा मेंदू आहे, हे अगदी सोप्या भाषेत समजावून सांगितले आहे. या संशोधनाला नोबेल पुरस्कार मिळाला आहे, हेही याच लेखाच्या निमित्ताने समजले. आनंद किती छोट्या छोट्या गोष्टींतून, घटनांतून मिळत असतो ना? फक्त आपले लक्ष असले पाहिजे. तुमचे संपादकीय मला खूप आवडले, त्याबद्दल तुमचे मनःपूर्वक अभिनंदन. 'लोकप्रभा' दिवाळी अंक छान, वाचनीय आहे.

– **संजय भाटवडेकर,** कोल्हापूर

वाचनाचा आनंद देणारा अंक

दिवाळी अंकाच्या निमित्ताने बऱ्याच कालावधीनंतर 'लोकप्रभा' चक्क हातात घेऊन वाचायला मिळाला, त्याचा अतिशय आनंद झाला. या छोटेखानी, दिवाळी अंकातील सर्वच लेख, कथा, इतर मजकूर हटके आणि अद्भुत माहिती देणारा आहे. विनायक परब यांचा 'व्वा' चितारताना, उज्ज्वला दळवी यांचा 'छू मंतर' आणि बासरीवादक पन्नालाल घोष यांच्यावरील लेख वाचताना लेखकाने साद्यंत माहिती मिळवण्यासाठी केलेले अथक प्रयत्न जाणवतात; परंतु अंक वाचताना, मधल्या पानांचे अडसर ओलांडत वाचन सुरू ठेवणे थोडेसे त्रासदायक ठरले. छपाई पूर्णत्वास नेताना, करावी लागणारी ती एक तांत्रिक अपरिहार्यता असावी. असो, पण आतील मजकूर मात्र वाचनाचा आनंद देणारा आहे. अभिनंदन!

– **मोहन गद्रे,** कांदिवली

प्रतिकारशक्तीचे गमक

'लोकप्रभा' दिवाळी अंक २०२१ मधील डॉ. अंजली कुलकर्णी यांचा 'प्रतिकारशक्तीची खाण' हा लेख खूप आवडला. अतिशय महत्त्वाचा, पण क्लिष्ट विषय सोप्या भाषेत विशद केला आहे. व्यावहारिक सूचनांमुळे लेख अतिशय उपयुक्त ठरतो. आधुनिक वैद्यकीय संशोधन व त्याचा आहारविहारातील उपयोग याचा मिलाफ साधण्यात आला आहे. अशा प्रकारची लेखमाला प्रसिद्ध करावी.

– **डॉ. माधव पुराणिक,** पुणे

स्वयंशिस्तीचे धडे अपरिहार्य

'लोकप्रभा'मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'आनंदाने शाळा भरली' या लेखातून मुक्ता काळे यांनी प्रत्यक्ष शाळेत जाण्याचा विद्यार्थ्यांचा उत्साह वर्णन करतानाच शाळेत घेण्याच्या काळजीविषयीही छान माहिती दिली आहे. शाळा गजबजू लागल्या याचा आनंद आहेच; पण अनेक महापालिकांनी ऐन वेळी नियमावली जाहीर करून घातलेला गोंधळ आणि शाळेतील वावराचे अनेक नियम यामुळे विद्यार्थ्यांच्या उत्साहावर पाणी पडत आहे. एका आड एक दिवस उपस्थिती, विद्यार्थ्यांनी डबे एकत्र खाऊ नयेत, म्हणून शाळेचा कालावधी चार तासांवर आणणे आणि डबाच न आणण्याची सूचना करणे, शिक्षक व कर्मचाऱ्यांना वारंवार कोविड चाचणी करून घ्यायला लावणे हे नियम कोविडकाळात गरजेचे असले, तरी विद्यार्थ्यांचा त्यामुळे विरस होत आहे आणि शिक्षकांवर ताण पडत आहे. मुलांच्या आरोग्याची जबाबदारी जशी पालकांची आहे तशीच आता ती शाळा, शिक्षक, विद्यार्थ्यांना शाळेत नेणाऱ्या वाहनचालकांचीही आहे. मुलांनीही तोंडावरची मुखपट्टी सांभाळण्याची, अन्नपदार्थांची देवघेव न करण्याची, शिंकताना, खोकताना इतरांपासून दूर राहण्याची, वर्गात आणि वाहनात बसताना अंतर राखण्याची सवय लावावी लागणार आहे. सध्या तरी आरोग्यविषयक शिस्त पाळणं ही अपरिहार्यता आहे.

– **श्रीपाद पु. कुलकर्णी,** पुणे.

एसटी कर्मचाऱ्यांनी या विषयाला वाचा फोडली!



'एसटीच्या अर्थकारणाचे वास्तव' आपण गेल्या अंकात 'कव्हरस्टोरी'च्या स्वरूपात मांडले. कर्मचाऱ्यांना देण्यात येणारा कामाचा मोबदला याबद्दल विचार करून माझे निरीक्षण मी खाली नोंदवत आहे. एसटीचे शासकीय सेवेत विलीनीकरण केल्यास, शासकीय सेवा देणाऱ्या इतर आस्थापनांतील कर्मचारीदेखील तीच मागणी लावून धरतील, अशी सार्थ भीती, काही जबाबदार नेत्यांनी बोलून दाखवली आहे. शासकीय सेवांचे खासगीकरण करण्यास तीव्र विरोध होत आहे. शासनाने अमुक सेवक-सेविका, मदतनीस, मित्र, सहायक, अशी पोकळ बिरुदं लावून पदे तयार केली आहेत आणि त्यांच्याकडून विविध शासकीय खात्यांतील कामे, अगदी अल्प मोबदल्यात करून घेतली जात आहेत. आज ना उद्या शासन आपल्याला शासकीय सेवेत सामावून घेईल या आशेवर बेकार तरुण, तरुणी या अशा बेभरवशाच्या कामांत स्वतःला, जुंपून घेत आहेत. त्याच वेळी त्यांच्या बरोबरीने त्याच खात्यात काम करणारे शासकीय कर्मचारी मात्र, पूर्ण वेतन आणि वेतनेतर अन्य लाभ अगदी निर्धास्तपणे, वर्षानुवर्षे उपभोगत आहेत. हे चित्र अशा बिरुदांकित तरीही अल्प मोबदल्यात काम करणाऱ्यांच्या मनात अस्वस्थता निर्माण करणारे आहे. लोकशाहीत कल्याणकारी राज्य म्हणून स्वस्त, मोफत, सवलतीच्या दरात अनेक सेवा देताना, वेतनावर होणारा खर्च, काबूत ठेवणे राज्यकर्त्यांना जड जाऊ लागते; पण राज्यकर्त्यांना आज ना उद्या 'कामाचा देय मोबदला' या मुद्द्यावर विचार करावाच लागणार आहे.

– **मोहन गद्रे,** कांदिवली.

लोकप्रभा

- कार्यकारी संपादक
  विनायक परब
- वरिष्ठ प्रतिनिधी
  विजया जांगळे
- अंक सजावट आणि मांडणी
  संदेश पाटील
- अंक-रचना साहाय्यक
  अशोक दळवी
  विशाल क्षीरसागर
- कार्यालयीन समन्वय :
  नेहा नाकटे
  दूरध्वनी : २७६३९९२५
- वितरण विभाग (महापे) :
  दूरध्वनी : २७६२५८६१ *(वर्गणीदारांसाठी)*
- जाहिरात विभाग : **राहुल महाले**
  दूरध्वनी : ६७४४०३९६
- महाव्यवस्थापक, ब्रॅण्ड : **सुपर्णा नायक**
  दूरध्वनी : ६७४४०३१६
  suparna.nayak@expressindia.com
- मुखपृष्ठ रचना : **विशाल क्षीरसागर**
- **संपादकीय विभाग पत्रव्यवहार :**
  लोकप्रभा, प्लॉट नं. ईएल/१३८,
  टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे,
  नवी मुंबई-४००७१०.
  फॅक्स : २७६३३००८

ई-मेल : lokprabha@expressindia.com
वेबसाइट : www.lokprabha.com

© द इंडियन एक्स्प्रेस प्रायव्हेट लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशत: पुन:प्रकाशनास वा पुन:प्रसारणास मनाई.

हे पत्र वैदेही ठकार यांनी मालक द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) यांच्यासाठी इंडियन एक्स्प्रेस प्रेस, प्लॉट नं. ईएल-२०८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१० येथे छापून, मफतलाल टॉवर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरीमन पॉइंट, मुंबई-४०००२१ येथे प्रसिद्ध केले.

- **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका**
- **कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार**
- **कार्यकारी संपादक : विनायक परब ***

(पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.)*

Printed and Published by Vaidehi Thakar on behalf of The Indian Express (P) Limited and Printed at Indian Express Press, Plot No. EL-208, TTC Industrial Area, Mahape, Navi Mumbai-400710 and Published at Mafatlal Centre, Seventh Floor, Ramnath Goenka Marg, Nariman Point, Mumbai-400021.

Editor : Vinayak Parab.* [Executive Editor]

*(*Responsible for selection of news under the PRB Act).*

R. N. I. Regn. No. 27792 / 74

मथितार्थ

अभिनंदन व चिंता

पाचव्या राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षणाचा अहवाल गेल्याच आठवड्यात जाहीर झाला. त्यात महत्त्वपूर्ण बाब अधोरेखित झाली; ती म्हणजे जननदर स्थिरावण्याच्या दिशेने भारताचा प्रवास सुरू झाला आहे. लोकसंख्यावाढ खूप मोठ्या प्रमाणावर होत असल्याची ओरड राज्यकर्त्यांकडून सुरू होती, त्यात तथ्य नाही हेच या अहवालाने सिद्ध केले. आपला जननदर आता २.० वर आला आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानकानुसार तो २.१ पेक्षा कमी असावा; तरच त्या देशाचा प्रवास जननदर स्थिरावण्याच्या दिशेने सुरुवात होते. ८०च्या दशकापासून देशात कुटुंब नियोजनाचे वारे मोठ्या प्रमाणावर वाहू लागले आणि त्या संदर्भातील मोहिमाही राबविल्या गेल्या. त्या साऱ्याला आलेले हे अभिनंदनीय असे यश आहे. मात्र अहवालात एक चिंतेची बाबही आहे. बिहार, मेघालय, उत्तर प्रदेश, झारखंड आणि मणिपूरमध्ये मात्र हा जननदर २.२ पेक्षा अधिक आहे. त्यातही उत्तर प्रदेश २.४, मेघालय २.९ आणि बिहारमध्ये ३.० आहे. प्रगतिशील व सुशिक्षितांची संख्या अधिक असलेल्या पश्चिम बंगाल आणि महाराष्ट्रात मात्र हाच जननदर १.६ आहे, ही चांगली बाब.

२०१५-१६ मध्ये झालेल्या सर्वेक्षणाच्या तुलनेत बँक खाती असलेल्या महिलांच्या संख्येत ५४ टक्क्यांवरून थेट ८० टक्के एवढी वाढ झाली आहे. हाती मोबाइल असलेल्या महिलांच्या संख्येतही ४६% वरून ५४% पर्यंत वाढ झाली आहे. मोबाइलच्या वापरातून महिला सक्षमतेमध्ये चांगली वाढ झाल्याचे यापूर्वीच अनेक पाहणींमध्ये स्पष्ट झाले आहे. म्हणूनच वाढ खूप नसली तरी आकडेवारी महत्त्वाची आहे. महिलांसाठी महत्त्वाचा असतो तो मासिक पाळीचा कालखंड. यापूर्वीच्या अहवालात केवळ ५७% महिलांनाच या काळात आरोग्यदायी सुविधा उपलब्ध होत्या, ते प्रमाण आता ७७% पर्यंत वाढले आहे. हे महत्त्वाचे!

अहवालातील दुसरी चिंतेची बाब म्हणजे जननयोग्य असलेल्या महिलांमध्ये २०१५-१६ साली ५३ टक्के या रक्तक्षयाने ग्रासलेल्या होत्या. यंदाच्या अहवालात हे प्रमाण ५७ टक्के झालेले दिसते. त्याचबरोबर रक्तक्षयग्रस्त असलेल्या लहान मुलांच्या प्रमाणातही वाढ झाली आहे. त्यामुळे जननदर आटोक्यात आणूनही होणारी निपज अशक्त किंवा रक्तक्षयग्रस्त असेल तर हे देशासाठी निश्चितच चांगले लक्षण नाही.

अहवालातील महत्त्वाची चांगली गोष्ट म्हणजे काही वर्षांपूर्वी स्त्रीभ्रूण हत्येचे प्रमाण खूप वाढलेले होते. २०११ साली मुली आणि मुलगे यांचे प्रमाण ९४०:१००० असे होते. तर आता हेच प्रमाण १०२०:१००० असे वाढले आहे. मात्र अहवालातील रक्तक्षयग्रस्ततेचे प्रमाण वाढणे, तरुण मुला-मुलींमधील वाढलेली स्थूलता वाढणे आदी बाबी चिंताजनक आहेत. त्यामुळे सरकारला दोन स्तरांवर काम करावे लागणार आहे. मुलींचे वाढते प्रमाण तसेच राहील याची काळजी घेणे व लहान मुलांच्या आणि खासकरून महिलांच्या आरोग्याकडे लक्ष देणे. त्या कुपोषित किंवा अशक्त राहणार नाहीत याची काळजी घेणे महत्त्वाचे असेल. त्यामुळे भविष्याचा विचार करता अन्नसुरक्षेचा मुद्दा महत्त्वाचा असणार आहे. शिवाय पोषणमूल्य असलेले अन्न नागरिकांना उपलब्ध असणे हेही तेवढेच महत्त्वाचे असेल हेही लक्षात घ्यावे लागेल. तरुणांच्या वाढणाऱ्या संख्येनुसार त्यांच्या हातांना मिळणारे काम वाढेल याचीही काळजी घ्यावी लागेल. महत्त्वाचे म्हणजे महिलांच्या वाढलेल्या संख्येला महिला सक्षमतेशी जोडावे लागेल. त्या दृष्टीने भविष्यातील धोरणांची दिशा निश्चित करावी लागेल.

कोविडच्या पार्श्वभूमीवर जारी झालेल्या या अहवालात आरोग्यविमा केवळ ४१% कुटुंबांपर्यंतच पोहोचल्याचे लक्षात येणे ही दुर्दैवी बाब आहे. ही टक्केवारी वाढायला हवी. कारण आरोग्यावरील खर्चच अनेक कुटुंबांना गरिबीच्या खाईत लोटतो हे आजवर अनेकदा अधोरेखित झाले आहे. त्यामुळे 'आरोग्य हीच खरी समृद्धी' हे ब्रीदवाक्य घेऊन भविष्याची आखणी व्हायला हवी!

@vinayakparab
vinayak.parab@expressindia.com

कव्हरस्टोरी

शैलजा तिवले

धाकधूक...

दीड वर्षाहूनही अधिक काळ कोविडच्या भीतीने कोंडलेले सर्व जण पुन्हा दैनंदिन आयुष्याकडे वळत असताना करोना पुन्हा ओमायक्रॉन या नव्या अवतारात जगापुढे उभा ठाकला आहे. त्याचे रूप किती विक्राळ असेल, तो किती वेगाने पसरेल याबाबत ठोस अभ्यासपूर्ण माहिती अद्याप जगापुढे आली नसली तरी विषाणू अधिक शक्तिशाली झाला असेल का, याविषयी सर्वत्र धाकधूक आहे.

कर्नाटकात दोन व्यक्तींना ओमायक्रॉनचा संसर्ग झाल्याचे गुरुवारी आढळले. भारतात आढळलेले हे पहिले दोन रुग्ण आहेत. यापैकी एक रुग्ण दक्षिण आफ्रिकेतून प्रवास करून आला होता, तर दुसरा रुग्ण आरोग्य कर्मचारी आहे. त्याने परदेश प्रवास केलेला नाही. त्यामुळे कर्नाटकात समूह संसर्ग सुरू झाला आहे का, याची माहिती येत्या काळात घेतली जाण्याची शक्यता आहे. या रुग्णांच्या संपर्कात आलेल्या पाच जणांना कोविडचा संसर्ग झाल्याचे आढळले आहे. ओमायक्रॉनची संसर्गसाखळी तयार होऊ लागली असून ती तोडण्यासाठी प्रवासी आणि बाधितांचे विलगीकरण, निदान यावर पुढील काही दिवस जोमाने काम करावे लागणार आहे.

दक्षिण आफ्रिकेतील ग्वान्टेंग प्रांतात आढळलेले करोनाचे उत्परिवर्तित रूप बी.१.१.५२९ हे डेल्टापेक्षाही घातक असल्याचा दावा तेथील आरोग्य अधिकाऱ्यांनी

केल्यानंतर जगभरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आणि परिणामी जगभरातील भांडवली आणि तेलबाजार गडगडले. जागतिक आरोग्य संघटनेनेही तातडीने बैठक बोलावून या विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली. या नव्या रूपाचे नामकरण ओमायक्रॉन असे करण्यात आले. युरोपीय देशांसह अन्यही काही देशांनी आफ्रिकेतील देशांतून येणाऱ्या प्रवाशांवर लगोलग बंदीही घातली. कोणतीही ठोस माहिती उपलब्ध नसताना अशी बंदी घालण्याच्या निर्णयावर जागतिक आरोग्य संघटनेने नाराजी व्यक्त केली आहे. हा विषाणू किती घातक आहे, त्याच्या प्रसाराचा वेग डेल्टापेक्षाही अधिक आहे का, या विषाणूविरोधात लशीची परिणामकारकता किती, याबाबत सध्या अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

उत्परिवर्तन का होते? करोना विषाणू गेली दोन वर्षे जगाला भेडसावत आहे. एखादा विषाणू बराच काळ वातावरणात वावरत असेल, तर त्याविरोधात सामूहिक प्रतिकारशक्ती तयार होते. या शक्तीला अधिक ताकदीने प्रतिरोध करण्यासाठी वातावरणात असलेला विषाणू त्याच्या अंतर्गत रचनेत काही बदल करतो. याला उत्परिवर्तन (म्युटेशन) असे म्हटले जाते. आत्तापर्यंत करोनामध्ये विविध प्रकारची उत्परिर्तने झाली आहेत. यामध्ये त्याच्या काटेरी आवरणाच्या प्रथिनांमध्ये एक ते दोन प्रकारचे बदल झालेले आढळले आहेत. ओमायक्रॉनच्या प्रथिनांमध्ये मात्र ३२ प्रकारचे बदल झाले आहेत. त्यामुळे हा विषाणू आजवरच्या उत्परिवर्तांपेक्षा वेगळा आहे. भारतात उगम झालेल्या डेल्टामध्ये दुहेरी उत्परिवर्तन झाले होते. ओमायक्रॉनविषयी अद्याप पुरेशी माहिती उपलब्ध नाही. जसजशी माहिती मिळेल, तशी हे चिंताजनक उत्परिवर्तन आहे की नाही, याबाबत अधिक स्पष्टता येईल, असे जागतिक आरोग्य संघटनेने स्पष्ट केले आहे.

- **संभ्रम**

या विषाणूबाबत विविध मतमतांतरे सध्या समोर येत आहेत. दक्षिण आफ्रिकेतील आरोग्य अधिकाऱ्यांनी या विषाणूच्या संसर्गाचा वेग डेल्टापेक्षाही अधिक असून तो अनेक पटींनी घातक असल्याचे सांगितले आहे. लस घेतलेल्यांनाही संसर्गाचा धोका असून तरुणांना अधिक प्रमाणात संसर्ग होत असल्यामुळे अधिक चिंताजनक असल्याचेही तेथील संशोधनकांचे म्हणणे आहे. तर दुसरीकडे विषाणूत उत्परिवर्तन झाल्याचे निदर्शनास आणणाऱ्या दक्षिण आफ्रिकेतील मेडिकल असोसिएशनने मात्र विषाणूचा हा प्रकार अत्यंत सौम्य असल्याचे म्हटले आहे. आत्तापर्यंत आढळलेल्या रुग्णांपैकी एकाही रुग्णाला रुग्णालयात दाखल करण्याची आवश्यकता भासलेली नाही. एकाही रुग्णाचा मृत्यूदेखील झालेला नाही. ओमायक्रॉनचा संसर्ग झालेल्या रुग्णांमध्ये प्रामुख्याने तीव्र डोकेदुखी, मळमळ, थकवा जाणवणे हीच प्रमुख लक्षणे दिसून आली आहेत. चव न समजणे, वास न येणे ही लक्षणे आढळलेली नाहीत. या नव्या प्रकाराबाबत विनाकारण भीती पसरविल्याचेही मत संघटनेने व्यक्त केले आहे.

- **ओमायक्रॉनमुळे डेल्टा संपण्याची शक्यता**

दक्षिण आफ्रिकेतील विषाणूतज्ज्ञांच्या मते, ओमायक्रॉनच्या संसर्गाची लक्षणे सौम्य स्वरूपाची असली, तरी तो वेगाने पसरत आहे. त्यामुळे सध्या जगभरात थैमान घातलेल्या डेल्टाला संपवण्यासाठी ओमायक्रॉन फायेदशीर ठरू शकेल आणि ही सकारात्मक बाब असेल.

- **घाबरू नये, सतर्कता बाळगणे गरजेचे**

'भारतात सध्या तरी ८० टक्के रुग्ण हे डेल्टा विषाणूचा संसर्ग झालेले आहेत. नवा विषाणू कितपत घातक आहे, याबाबत पुरेशी माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे घाबरण्याची आवश्यकता नाही. ज्या देशांत रुग्ण आढळले आहेत, तिथून येणाऱ्या प्रवाशांवर लक्ष



ठेवून सतर्कता बाळगणे गरजेचे आहे,' असे राज्याच्या साथरोग सर्वेक्षण विभागाचे प्रमुख डॉ. प्रदीप आवटे यांनी सांगितले.

'दक्षिण आफ्रिकेतील अनेक देशांमध्ये सुमारे ३० टक्के लसीकरण झाले आहे. युरोपात सध्या वाढती रुग्णसंख्या आणि मृत्युदर यामुळे चिंताजनक स्थिती निर्माण झाली आहे. तिथेही लसीकरण न झालेल्या भागांमध्येच हा प्रश्न उद्भवला आहे. तसेच आता विषाणूचे निदान होऊन आठ दिवस झाले तरी रुग्णांमध्ये तीव्र लक्षणांचे प्रमाण किंवा मृत्यूचे प्रमाण वाढलेले नाही. आजवर आढळलेल्या रुग्णांपैकी बहुतेक रुग्णांना सौम्य लक्षणे आहेत. त्यामुळे या विषाणूची घातकता डेल्टाच्या तुलनेत कमी

असल्याचे सध्या दिसते. त्यामुळे घाबरण्याचे कारण नाही, परंतु सावधानता बाळगणे आवश्यक आहे,' असे मत मृत्यू विश्लेषण समितीचे प्रमुख डॉ. अविनाश सुपे यांनी व्यक्त केले.

- **मुखपट्टीचा योग्य वापर हाच सुरक्षित उपाय**

'करोना प्रसाराची साखळी तोडण्यासाठी आणि उत्परिवर्तित विषाणूचा उद्रेक होऊ नये यासाठी मुखपट्टीचा वापर, हात वारंवार स्वच्छ ठेवणे, सुरक्षित अंतर पाळणे आणि गर्दी टाळणे या करोना प्रतिबंधात्मक नियमांचे पालन काटेकोरपणे करणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारचा विषाणू आला तरी मुखपट्टीचा योग्य वापर केल्यास निश्चितच संरक्षण मिळते,' अशी माहिती कोविड-१९ कृतीदलाचे सदस्य डॉ. शशांक जोशी यांनी दिली.

- **एस जनुकीय आरटीपीसीआर चाचण्या म्हणजे काय?**

करोना विषाणूच्या निदानासाठी केल्या जाणाऱ्या आरटीपीसीआर चाचणीमध्ये एस, एन, ई हे जनुकीय घटक असतात. ओमायक्रॉनची बाधा झालेल्या व्यक्तीच्या आरटीपीसीआर चाचणीमध्ये एस हा जनुकीय घटक अस्तित्त्वात नसल्याचे बहुतेक प्रयोगशाळांच्या अहवालात निदर्शनास आले आहे. त्यामुळे हा जनुकीय घटक आरटीपीसीआर चाचणीत न आढळल्यास रुग्णाला ओमायक्रॉन विषाणूची बाधा झाली आहे, असे सूत्र प्राथमिक पडताळणीसाठी वापरता येईल, असे जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांत म्हटले आहे. परंतु अंतिम निर्णयासाठी जनुकीय क्रमनिर्धारण (जिनोम सिक्वेन्सिंग) चाचण्या करणे आवश्यक आहे, असेही यात स्पष्ट करण्यात आले आहे.

आपल्याकडे वापरल्या जाणाऱ्या बहुतांश चाचणी संचांमध्ये एस या जनुकीय घटकाचा वापर केलेला नाही. त्यामुळे ओमायक्रॉनचे निदान वेगाने करण्यासाठी आता कस्तुरबा आणि केईएमच्या प्रयोगशाळांमध्ये एस जनुकीय घटकाचा वापर केलेले संच उपलब्ध करण्यात आले आहेत. हे संच वापरून परदेशातून आलेल्या बाधित प्रवाशांच्या चाचण्या करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. ही चाचणी आरटीपीसीआर चाचणीप्रमाणेच आहे. एस जनुकीय घटक करोना विषाणूच्या काटेरी प्रथिनांशी निगडित आहेत. परंतु या चाचणीची अचुकता १०० टक्के नाही. त्यामुळे एखाद्या व्यक्तीला ओमायक्रॉनची बाधा झाली आहे का, हे जनुकीय क्रमनिर्धारणानंतरच स्पष्ट होईल, असे केईएमच्या सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. गीती नटराज यांनी सांगितले.

- **एस जनुकीय चाचणी तपासणीचे फायदे**

मुंबईत कस्तुरबा मध्यवर्ती प्रयोगशाळेमध्ये जनुकीय क्रमनिर्धारण प्रयोगशाळा उपलब्ध आहे. परंतु ही चाचणी करण्यासाठी एका वेळी ३५० नमुने यंत्रामध्ये देणे आवश्यक असते. तसेच या चाचणीचे अहवाल येण्यास दोन ते तीन दिवसांचा कालावधी लागतो. सध्या परदेशातून येणाऱ्या आणि बाधित असणाऱ्या प्रवाशांची संख्या तुलनेने फार कमी आहे. त्यामुळे मोजक्या नमुन्यांसाठी जनुकीय क्रमनिर्धारण करणे शक्य नाही. एस जनुकासह आरटीपीसीआर चाचणी करणे तुलनेने सोपे आहे. तसेच याचे अहवालही काही तासांत उपलब्ध होऊ शकतात. ओमायक्रॉनचा संसर्ग झाल्याचे निदान यामुळे वेगाने करता येईल. ओमायक्रॉन संशयित म्हणून या रुग्णांचे तातडीने विलगीकरण करणे आणि संपर्कातील व्यक्तींचा शोध घेण्यास मदत होईल. त्याद्वारे या नव्या विषाणूचा प्रसार रोखणे शक्य होईल. यानंतर खात्री करण्यासाठी जनुकीय क्रमनिर्धारण केले जाईल, अशी माहिती पालिकेचे सहायक आयुक्त सुरेश काकाणी यांनी दिली.

- **बाधित प्रवाशांचे जनुकीय क्रमनिर्धारण**

आफ्रिकेसह ओमायक्रॉनचा प्रसार झालेल्या अन्य देशांतून राज्यात आलेल्या प्रवाशांपैकी नऊ प्रवासी कोविडग्रस्त असल्याचे आढळले आहे. यातील चार प्रवासी मुंबईतील असून यातील एका रुग्णाची एस जनुकीय चाचणी झाली आहे. यामध्ये एस जनुक अस्तित्वात असल्याचे आढळले आहे, तर इतर तीन जणांच्या चाचण्यांचे अहवाल अद्याप आलेले

नाहीत. परदेशातून आलेल्या सर्व बाधितांचे जनुकीय क्रमनिर्धारण केले जात आहे.

● **प्रवाशांचा पाठपुरावा आव्हानात्मक**

ओमायक्रॉनमुळे जगभरात पसरलेल्या भीतीचे पडसाद देशातही उमटले. केंद्रीय आरोग्य विभागाने देशभरात सतर्कता बाळगण्याचे आदेश दिले. परदेशातून आलेल्या प्रवाशांच्या चाचण्या, तपासण्यांवर भर देण्यासह जनुकीय चाचण्यांवरही लक्ष देण्याच्या सूचना दिल्या गेल्या. परंतु परदेशातून आलेल्या प्रवाशांचे विलगीकरण, आरटीपीसाआर चाचण्या, आंतरराष्ट्रीय प्रवासावरील निर्बंध याबाबतची ठोस नियमावली जाहीर करण्यास मात्र केंद्रीय आरोग्य विभागाला तीन दिवस लागले. नाताळच्या सुट्टीमुळे गेल्या काही दिवसांत भारतात हजारो प्रवासी आले आहेत आणि येत आहेत. या पार्श्वभूमीवर याबाबत तातडीने निर्णय होणे गरजेचे होते. राज्यानेही केंद्राच्या सूचनेनुसार तातडीने आंतरराष्ट्रीय प्रवाशांच्या तपासण्या, आलेल्या प्रवाशांची माहिती घेण्यास सुरुवात केली असली तरी केंद्राच्या सूचना येईपर्यंत जोखमीच्या गटातील अनेक देशांमधून आलेले प्रवासी विविध राज्यांमध्ये दाखल झाले आहेत. गेल्या तीन दिवसांत या विषाणूचा फैलाव १२हून अधिक देशांमध्ये झाला आहे. त्यामुळे जोखमीच्या देशांची यादी दिवसेंदिवस वाढत असून बारकाईने लक्ष ठेवाव्या लागणाऱ्या प्रवाशांची संख्याही अनेक पटींनी वाढत आहे. या सर्व प्रवाशांचा पाठपुरावा करताना स्थानिक संस्थांच्या नाकीनऊ आले आहेत. त्यात आफ्रिकेसह या अन्य जोखमीच्या देशांमधून आलेल्या प्रवाशांचेही संस्थात्मक विलगीकरण करावे का, यावरही विचार केला जात आहे. संस्थात्मक विलगीकरण करायचे असल्यास त्या प्रमाणात सुविधा उपलब्ध करून देणे हेदेखील आव्हानात्मक आहे. एक किंवा अगदी कमी संख्येने रुग्ण आढळलेल्या देशांमधील प्रवाशांचेही १४ दिवस संस्थात्मक विलगीकरण करावे का, असे अनेक प्रश्न सध्या स्थानिक संस्थांपुढे आहेत. हा सर्व गोंधळ लक्षात घेता पुढील आठ ते दहा दिवसांत रुग्णसंख्या वेगाने न वाढल्यास काळजी करण्याची आवश्यकता नाही, असे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

करोनाची विविध उत्परिवर्तने

- अल्फा (बी.१.१.७) – २०२०च्या शेवटच्या काळात ब्रिटनमध्ये आढळला.
- बीटा (बी.१.३५१) – २०२०च्या सुरुवातीच्या काळात दक्षिण आफ्रिकेत आढळला.
- गॅमा(पी.१) – २०२०च्या शेवटच्या काळात ब्राझीलमध्ये आढळला
- डेल्टा(बी.१.६१७.२) – २०२०च्या शेवटच्या काळात हा भारतात आढळला असून जगभरात पसरला आहे.
- लॅमडा (सी.३७) – २०२० मध्ये पेरू देशात आढळला.
- म्यु (बी.१.६२१) – २०२१च्या सुरुवातीच्या काळात कोलंबियामध्ये आढळला.
- ओमायक्रॉन (बी.१.१.१५९) – नोव्हेंबर २०२१ मध्ये दक्षिण आफ्रिकेत आढळला.

● **ओमायक्रॉन नाव का?**

करोनाच्या विविध उत्परिवर्तित रूपांची वैज्ञानिक नावे सामान्यपणे वापरणे गोंधळात टाकणारे ठरू शकते. त्यांचा उल्लेख करणे अधिक सोपे व्हावे यासाठी जागतिक आरोग्य संघटनेने ग्रीक अक्षरांवरून त्यांची नावे निश्चित केली आहेत. आजवर झालेल्या उत्परिवर्तनांना अल्फा, बीटा, गॅमा, डेल्टा अशी नावे देण्यात आली होती. अशी १२ प्रकारची उत्परिवर्तने आढळली आहेत. १२व्या म्युटेशनचे नाव म्यु होते. या क्रमानुसार नव्याने आढळलेल्या म्युटेशनचे नाव न्यु (Nu) किंवा क्षी (Xi) असायला हवे होते. परंतु न्यु हे नवीन या शब्दाशी मिळतेजुळते आहे तर क्षी हे आडनाव असल्यामुळे ही दोन्ही नावे देणे आरोग्य संघटनेने टाळले असून यापुढील अक्षर ओमायक्रॉनचे नाव या उत्परिवर्तनाला दिले आहे.

● **लशीपासून संरक्षण मिळेल का?**

विषाणूची बाधा लशीच्या दोन्ही मात्रा घेतलेल्यांनाही होत असल्याचे संशोधकांचे म्हणणे आहे. या विषाणूमध्ये अनेक प्रकारची उत्परिवर्तने झाली आहेत. सध्या उपलब्ध लशी त्यावर फारशा परिणामकारक ठरणार नाहीत, असे मत संशोधकांनी व्यक्त केले आहे. फायझर, बायोएनटेक या लस उत्पादक कंपन्यांनी नव्या उत्परिवर्तनांवर परिणामकारक लशींची निर्मिती करण्यासाठी पुढाकार घेतला असला तरी या प्रक्रियेसाठी काही महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. करोनाच्या जुन्या रूपांपासून निर्मिती केलेल्या लशीची वर्धक मात्रा कितपत फायदेशीर असेल, असेही प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

दक्षिण आफ्रिकेने कमी रुग्णसंख्या असतानाही या नव्या प्रकाराचा शोध तातडीने घेतला. त्याबाबत जगालाही वेळेत सतर्क केले. खरतर ही सकारात्मक बाब आहे. परंतु आज याच देशावर जगातील अनेक देश भीतीमुळे निर्बंध घालत आहेत. जगाचे हे रूप करोनाने वेळोवेळी दाखवून दिले. ओमायक्रॉनचे हे पुन्हा एक वादळ ठरेल का, याचे ठोस उत्तर सध्या तरी कोणाकडेही नाही. ते पुढच्या काही दिवसांत मिळू शकेल, मात्र तोवर या नव्या उत्परिवर्तनाविषयीची धाकधूक कायम राहणार आहे.

response.lokprabha@expressindia.com

परिचय 'ओमायक्रॉन'चा

कव्हर स्टोरी

कौनैन शेरिफ एम

सार्स कोव्ही-२च्या दक्षिण आफ्रिकेत आढळलेल्या नव्या उत्परिवर्तित रूपाला जागतिक आरोग्य संघटनेने 'ओमायक्रॉन' असे नाव दिले आणि हे चिंताजनक उत्परिवर्तन असल्याचेही स्पष्ट केले. या नव्या रूपात नेमके काय बदल झाले आहेत, त्याची संसर्गक्षमता किती, त्याच्या संसर्गाचे आरोग्यावर किती गंभीर दुष्परिणाम होतील, उपलब्ध लसी त्यावर परिणामकारक ठरतील का, असे अनेक प्रश्न सर्वांनाच पडले आहेत.

दक्षिण आफ्रिकेतील 'द नेटवर्क फॉर जिनॉमिक्स सर्व्हिअलन्स'ने हे उत्परिवर्तन सर्वप्रथम ओळखले. सार्स कोव्ही-२ विषाणूंच्या बी.१.१.५२९ या वर्गातील हा विषाणू असल्याचे तिथल्या संशोधकांच्या निदर्शनास आले. आजवर 'डेल्टा 'हा सर्वाधिक संसर्गक्षमता असलेला उत्परिवर्तित अवतार म्हणून ओळखला जात होता, मात्र प्राथमिक माहितीनुसार 'ओमायक्रॉन' हा त्याहूनही अधिक संसर्गक्षम असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. सध्या उपलब्ध असलेल्या लशी त्यापुढे कितपत प्रभावी ठरू शकतील, याविषयीही शंका व्यक्त केली जात आहे.

ओमायक्रॉनविषयी सध्या हाती आलेली माहिती

सार्स कोव्ही-२ जगभर पसरत असताना त्यात उत्परिवर्तने होत गेली. प्रत्येक उत्परिवर्तन किती घातक आहे, हे स्पष्ट व्हायला बराच वेळ जावा लागतो. कोणते उत्परिवर्तन महत्त्वाचे आहे, हे जाणून घेण्यासाठी जगभरातील आरोग्यविषयक संस्था-संघटनांना, प्रत्येक उत्परिवर्तनावर बारकाईने लक्ष ठेवावे लागते. अशा स्वरूपाच्या सातत्यपूर्ण निरीक्षणातूनच द नेटवर्क फॉर जिनॉमिक्स सर्व्हिअलन्सला बी.१.१.५२९ हे उत्परिवर्तन आढळले.

सध्या उपलब्ध असलेल्या माहितीनुसार बी.१.१.५२९ मध्ये विषाणूच्या स्पाइक प्रोटिन्समध्ये (प्रथिनांच्या आवरणांवरील टोकेरी भागांत) अनेक बदल झाले आहेत आणि प्राथमिक विश्लेषणानुसार सार्स-कोव्ही-२ चा हा नवा उत्परिवर्तित अवतार अधिक संसर्गक्षम आहे. या उत्परिवर्तनानंतर गेल्या दोन आठवड्यांत दक्षिण आफ्रिकेत नव्या रुग्णांमध्ये चौपट वाढ झाली आहे.

जोहान्सबर्ग आणि प्रिटोरियाचा समावेश असलेल्या गॉटेन्ग प्रांतात 'ओमायक्रॉन'चा संसर्ग झालेल्यांच्या संख्येत वेगाने वाढ झाल्याचे द नेटवर्क फॉर जिनॉमिक्स सर्व्हिअलन्सने गुरुवारी स्पष्ट केले. बहुतेक प्रांतांत ओमायक्रॉन पसरल्याची शक्यताही वर्तवण्यात आली आहे.

या उत्परिवर्तनाची वैशिष्ट्य

द नेटवर्क फॉर जिनॉमिक्स सर्व्हिअलन्सने दिलेल्या माहितीनुसार बी.१.१.५२९ मध्ये उत्परिवर्तनाचे नेहमीपेक्षा वेगळे समूह आढळले आहेत. त्यापैकी तब्बल ३० बदल हे विषाणूच्या मानवी शरीरातील प्रवेशास कारणीभूत ठरणाऱ्या स्पाइक प्रोटिन्सच्या भागात झाले आहेत. काही बदल हे विषाणूच्या संसर्गक्षमतेला आणि त्याच्या प्रतिकारशक्तीचे कवच भेदण्याच्या क्षमतेला कारणीभूत ठरणाऱ्या भागात झाल्याचे आढळले आहे. यातील काही उत्परिवर्तने ही अल्फा आणि डेल्टा प्रकारांतही आढळली होती. मात्र अन्य अनेक बदल हे आजवर फारसे आढळले नव्हते आणि त्यांच्या वैशिष्ट्यांची नोंदही झाली नव्हती. त्यामुळे विषाणूतील या परिवर्तनाचे महत्त्व अद्याप नीटसे स्पष्ट झालेले नाही. या उत्परिवर्तनामुळे विषाणू अधिक संसर्गक्षम झाला आहे का, लशीचे आणि प्रतिकारशक्तीचे कवच भेदण्याच्या त्याच्या क्षमतेवर काही परिणाम झाला आहे का आणि त्यामुळे या उत्परिवर्तनामुळे विषाणू अधिक घातक झाला आहे की त्यामुळे उद्भवणारा धोका कमी झाला आहे, हे जाणून घेण्यासाठी संशोधन सुरू असल्याचे, आफ्रिका सेन्टर्स फॉर डिसीज कन्ट्रोलने स्पष्ट केले आहे.

चिंतेचा मुद्दा ठरलेली उत्परिवर्तने

एच६५५वाय, एन ६७९के, पी६८१एच हा बदलांचा समूह विषाणूच्या पेशींमध्ये शिरण्याच्या क्षमतेत वाढ करणारा आहे. त्यामुळे त्याच्या संसर्गक्षमतेतही वाढ होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. यातून अल्फा, बीटा, गॅमा आणि लॅम्बडा प्रमाणेच एनएसपी६ नाहीसा झाला आहे. या घटकाचा संबंध प्रतिकारशक्तीवर हल्ला करण्याच्या विषाणूच्या क्षमतेवर परिणाम करणाऱ्या घटकाशी असल्यामुळे यातील बदलांमुळेही संसर्गक्षमतेवर परिणाम होऊ शकतो, अशी भीती द नेटवर्क फॉर जिनॉमिक्स सर्व्हिअलन्सने व्यक्त केली आहे.

अल्फा, बीटा, गॅमामध्ये आढळलेले आर२०३, जी२०४आर हे उत्परिवर्तन ओमायक्रॉनमध्येही आढळले आहे. या उत्परिवर्तनामुळे संसर्गक्षमता वाढण्याचीही भीती आहे.

जागतिक आरोग्य संघटनेच्या मते...

जागतिक आरोग्य संघटनेच्या तांत्रिक सल्लागार गटाची नुकतीच बैठक झाली असून त्यात या उत्परिवर्तनाचे वर्णन चिंतेचा मुद्दा म्हणून करण्यात आले आहे. चिंताजनक प्रवर्गात गणना करण्यामागे संसर्गक्षमतेत वाढ मात्र निदानाच्या अचूकतेत, लसी व उपचारांच्या परिणामकारकतेत घट यापैकी एक किंवा अनेक कारणे असू शकतात.

जागतिक आरोग्य संघटनेच्या कोविडविषयक तांत्रिक गटाच्या प्रमुख मारिया वॅन केरकोव्ह यांनी सांगितले की, आफ्रिकेतील सहकाऱ्यांनी या उत्परिवर्तनाची नोंद केली असून त्यांनीच त्याविषयी आम्हाला कळवले आहे. जनुकीय बदलांच्या १०० पेक्षा कमी नोंदी उपलब्ध आहेत. अद्याप याविषयी फारशी माहिती नाही. या प्रकारात मोठ्या संख्येने उत्परिवर्तने झाली आहेत, एवढेच सध्या माहीत आहे. एवढ्या मोठ्या संख्येने झालेल्या उत्परिवर्तनांचा परिणाम विषाणूच्या वर्तनावर होऊ शकतो आणि तोच आपल्यासाठी काळजीचा मुद्दा आहे.

लक्षणांतील बदल

बी.१.१.५२९ या कोविडच्या उत्परिवर्तित विषाणूच्या संसर्गाची नेहमीपेक्षा वेगळी अशी कोणतीही विशेष लक्षणे आढळलेली नाहीत, अशी माहिती दक्षिण आफ्रिकेतील द नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ कम्युनिकेबल डिसीजेसने दिली आहे. 'डेल्टा'सारख्या संसर्ग वेगाने पसरवणाऱ्या अन्य उत्परिवर्तित विषाणूंप्रमाणेच 'ओमायक्रॉन'चा संसर्ग झालेल्यांपैकीही काही रुग्ण लक्षणरहित आहेत, हे देखील संस्थेने स्पष्ट केले आहे.

लसींची परिणामकारकता आणि आजाराची तीव्रता

सध्या उपलब्ध असलेल्या लशींची 'ओमायक्रॉन'विरोधातील परिणामकारकता जाणून घेण्यासाठी दक्षिण आफ्रिकेतील प्रयोगशाळांत संशोधन सुरू आहे. यातून लशींच्या क्षमतेचाही अंदाज घेतला जाईल. रुग्णालयात दाखल करण्याचे प्रमाण आणि ओमायक्रॉनचा त्यावर झालेला परिणाम याचा अभ्यास करण्यासाठी यंत्रणाही निर्माण करण्यात आली आहे. या उत्परिवर्तनामुळे आजाराच्या तीव्रतेवर आणि सध्या रुग्णालयांत करण्यात येत असलेल्या औषधोपचारांच्या परिणामकारकतेवर काही परिणाम झाला आहे का, हे देखील या अभ्यासातून स्पष्ट होईल.

आरटी-पीसीआरची अचूकता

विषाणूसंसर्ग लवकर ओळखण्यास सहाय्यभूत ठरणारा एस हा जनुकीय घटक बी.१.१.५२९मधून नाहीसा झाल्याचे दक्षिण आफ्रिकेतील द नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ कम्युनिकेबल डिसीजेसने स्पष्ट केले आहे. मात्र गॉटेन्ग प्रांतातील आजवर तपासण्यात आलेल्या १००हून अधिक नमुन्यांमध्ये एन आणि आरडीआरपी जनुकीय घटकासह अन्य अनेक घटक कायम असल्याचे आढळले आहे. त्यामुळे पीसीआर चाचणीच्या एकंदर अचूकतेवर परिणाम होण्याची शक्यता धुसर आहे. पीसीआरमध्ये किमान दोन वेगवेगळ्या जनुकीय घटकांची चाचणी केली जाते. एकात उत्परिवर्तन झाले, तरी दुसऱ्या घटकामुळे विषाणू ओळखता येईल, हे त्यामागचे कारण आहे.

प्रतिबंधात्मक उपाय



लसीकरण अतिशय महत्त्वाचे असल्याचे सर्वच तज्ज्ञगटांचे म्हणणे आहे. रुग्णालयात दाखल व्हावे लागण्याची शक्यता आणि मृत्यूचा धोका त्यामुळे कमी होऊ शकतो. जिथे मोठ्या प्रमाणात लसीकरण झाले आहे, तिथे आरोग्य यंत्रणेवरच्या ताणात लक्षणीय घट झाल्याचे उपलब्ध माहितीवरून स्पष्ट झाले आहे.

साथीची अखेर अद्याप खूप दूर असल्याचे नव्या उत्परिवर्तनामुळे स्पष्ट होत आहे. त्यामुळे कोविडकाळात घ्यावी लागणारी काळजी म्हणजे मुखपट्टीचा वापर, अंतरभान, हवा खेळती राखणे, हात वारंवार धुणे आणि सर्व पृष्ठभाग सॅनिटायझरने निर्जंतुक करणे हे यापुढेही सुरूच ठेवावे लागणार आहे.

(दि इंडियन एक्स्प्रेस'मधून)

response.lokprabha@expressindia.com

शत्रूला कंठस्नान घालणारी

किलर्स स्क्वॉड्रन

संरक्षण

विनायक परब

बांग्लादेशच्या निर्मितीस निमित्त ठरलेल्या १९७१ च्या भारत-पाक युद्धाला यंदा तब्बल ५० वर्षे पूर्ण होत आहेत. या युद्धामध्ये भारतीय नौदलाने पाकिस्तानी सागरी हद्दीत घुसून कराची बंदरावर चढविलेला हल्लाच पाकिस्तानच्या वर्मी घाव ठरला. पाकिस्तानी नौदलाच्या चार युद्धनौकांना थेट जलसमाधी देत २२ व्या क्षेपणास्त्रवाहू युद्धनौकांच्या (किलर्स स्क्वॉड्रन) ताफ्याने आपल्या आगमनाची वर्दी केवळ पाकिस्तानलाच नव्हे तर संपूर्ण जगाला दिली. 'केवळ अनोख्या स्वरूपाचा नौदल हल्ला' या शब्दांत जगाच्या नौदल इतिहासात या हल्ल्याची नोंद झाली. ४ डिसेंबरच्या मध्यरात्री आणि ५ डिसेंबरच्या पहाटेस भारतीय नौदलाने कराची बंदराच्या परिसरात घुसून केलेला हा हल्ला पाकिस्तानी नौदलासाठी अनपेक्षित असा होता. त्याच्या आदल्याच दिवशी म्हणजे ३ डिसेंबर रोजी पाकिस्तानी हवाई दलाने भारतीय हद्दीत घुसून अमृतसर, पठाणकोठ, श्रीनगर, अवंतीपूर, अमृतसर, जोधपूर, अंबाला, आग्रा, उत्तरलाय





भारतीय नौदलाने चढविलेल्या हल्ल्याचे नकाशीय प्रारूप

येथे हल्ला चढवला. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी त्या दिवशी राष्ट्राला उद्देश केलेल्या नभोवाणीवरील भाषणात हे भारताविरुद्ध पुकारलेले युद्ध असल्याचे सांगून भारत कडवे उत्तर देईल, असे जाहीर केले. सैन्यदलांना तसे आदेशही दिले.

भारतीय नौदलाची मारकक्षमता वाढविण्यासाठी त्या वर्षी मित्रराष्ट्र असलेल्या सोव्हिएत रशियाकडून ओसा वर्गातील युद्धनौकांचा समावेश नुकताच भारतीय नौदलात करण्यात आला होता. अवजड व्यापारी नौकांच्या माध्यमातून या नौका भारतात आणून कोलकाता येथे १९७१ साली त्यांचा समावेश भारतीय नौदलात करण्यात आला. भारतीय नौदलातील सर्वात तरुण

नौसैनिक आणि नौदल अधिकारी त्या वेळेस या ताफ्यामध्ये होते. पंतप्रधानांच्या आदेशानंतर नौदलप्रमुख असलेल्या ॲडमिरल एस. एम. नंदा यांनी नौदलातील हा सर्वात तरुण ताफा कराची मोहिमेवर पाठविण्याचा निर्णय घेतला. कारण या ताफ्यातील नौसैनिक तरुण, वेगवान हालचाली करणारे आणि धोका पत्करण्याची सकारात्मक क्षमता असलेले होते. त्यांचे प्रशिक्षण रशिया येथे पूर्ण करून सुमारे सहा-सात महिन्यांपूर्वीच सर्व जण भारतात दाखल झाले होते.

रशियन भाषेचा सांकेतिक वापर

भारताच्या या सर्वात तरुण किलर्स स्क्वॉड्रनचे वैशिष्ट्य म्हणजे कराची बंदरात घुसून करावयाच्या हल्ल्यादरम्यान सांकेतिक भाषा म्हणून या संपूर्ण ताफ्याने रशियन भाषेचा वापर करण्याचा निर्णय घेतला व तो अमलातही आणला. संपूर्ण हल्ल्यादरम्यान सर्व संवाद व आदेश रशियन भाषेतून देण्यात आले, त्यामुळे ते शत्रूला समजेपर्यंत कामगिरी फत्ते झालेले होती, पाकिस्तानचे कंबरडे मोडण्याचे काम पार पडलेले होते.

'ऑपरेशन ट्रायडेंट' असे या मोहिमेचे नामकरण करण्यात आले. हा ताफा ४ व ५ डिसेंबरच्या मध्यरात्री पाकिस्तानी सागरी हद्दीत कराचीनजीक पोहोचला. कराचीपासून २५ मैल अंतरावर असतानाच 'आयएनएस निर्घात'ने पहिले क्षेपणास्त्र डागले आणि 'पीएनएस खैबर' या विनाशिकेचा यशस्वी वेध घेत तिला जलसमाधी दिली. दुसरा हल्ला 'आयएनएस वीर'ने चढवला आणि पाणसुरुंगशोधक पाकिस्तानी नौकेला सागरतळाशी

धाडले तर 'आयएनएस निःपात'ने पाकिस्तानी नौदलाच्या इंधननौकेला आगीच्या भक्ष्यस्थानी देत तिलाही जलसमाधी दिली. एवढ्यावरच न थांबता ८ व ९ डिसेंबरच्या मध्यरात्री हल्ल्याचे दुसरे पर्व सुरू झाले. त्यात 'आयएनएस विनाश' या युद्धनौकेने पाकिस्तानी नौदलाच्या 'ढाक्का' या इंधननौकेला जलसमाधी आणि कराचीचे केयमारी तेलसाठे उद्ध्वस्त केले. ती आग चार दिवस धुमसत होती. या हल्ल्याने पाकिस्तानी नौदलाचे कंबरडे पूर्णपणे मोडण्याचे काम केले. भारतीय नौदलाच्या या शौर्याचे प्रतीक म्हणून प्रतिवर्षी ४ डिसेंबर हा दिवस नौदल दिन म्हणून साजरा केला जातो. भारतीय नौदलातील या ताफ्याला 'किलर्स स्क्वॉड्रन' हे बिरुद मिळाले!

यंदा या शौर्याला ५० वर्षे पूर्ण होत आहेत तर भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे. याचे औचित्य साधूनच भारत-पाक युद्धामध्ये असीम शौर्य गाजविणाऱ्या आणि शत्रूला कंठस्नान घालणाऱ्या या नौदल ताफ्यास येत्या ८ डिसेंबर रोजी 'राष्ट्रपतींचे मानांकन' देऊन सेनादलांचे सर्वोच्च सेनापती असलेल्या राष्ट्रपतींच्या हस्ते समारंभपूर्वक गौरविण्यात येणार आहे. राष्ट्रपतींचे मानांकन हा सेनादलांसाठी सर्वोच्च सन्मान मानला जातो. तब्बल ५० वर्षांपूर्वी गाजविलेल्या या शौर्याबद्दल स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून गौरविण्यात येणार आहे. राष्ट्रपती रामनाथ कोविंद या सोहळ्यासाठी खास मुंबईत नौदल गोदीत येणार आहेत. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, राज्यपाल आणि माजी नौदल अधिकारी या सोहळ्यास खास उपस्थित राहणार आहेत. २२ व्या क्षेपणास्त्रवाहू युद्धनौकांचा ताफ्याची औपचारिक स्थापना १९९१ साली ऑक्टोबर महिन्यात झाली. यात वीर वर्गातील १० तर प्रबळ वर्गातील तीन क्षेपणास्त्र नौकांचा समावेश आहे. या ताफ्याला मिळालेल्या 'किलर्स स्क्वॉड्रन' या बिरुदामागचा इतिहास मात्र हा असा १९७१च्या युद्धापर्यंत मागे जातो! विद्यमान स्थितीत नौदलाच्या पश्चिम तळाच्या ताफ्यात असलेल्या या स्क्वॉड्रनवर भारताच्या सागरी संपत्तीच्या रक्षणाची महत्त्वपूर्ण अशी जबाबदारी आहे. शिवाय पश्चिम नौदल तळाच्या हद्दीत येणाऱ्या देशाच्या आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईच्या संरक्षणाचीही जबाबदारी आहे. या ताफ्याचे सुरक्षाचक्र सध्या मुंबईला लाभले असून त्यामुळेच मुंबईला निश्चिंती लाभली आहे. महत्त्वाचे म्हणजे किलर्स स्क्वॉड्रनचे मुंबईशी अनोखे नाते आहे, त्यांचे मुख्यालय 'अग्निबाहू' मुंबईच्या नौदल गोदीमध्येच आहे. म्हणूनच राष्ट्रपती या सन्मानासाठी मुंबईत येणार आहेत... आता प्रतीक्षा आहे ती ८ डिसेंबरची!

@vinayakparab

response.lokprabha@expressindia.com

रडके मूल आपलेसे करण्यासाठी...

जन तन मन
डॉ. चारुता गोखले

३ डिसेंबर हा जागतिक विकलांग दिन. इतरांपेक्षा भिन्न क्षमता आणि गरजा असणाऱ्या व्यक्तींच्या या समूहाविषयी आपल्याला अत्यल्प ज्ञान आहे. काही सर्वेक्षण आणि जनगणनेतून आपल्याला त्यांची ढोबळ आकडेवारी समजते. भारतात १००० तील १८ ते २३ बाळे जन्मजात व्यंग घेऊन जन्माला येतात, असा अंदाज आहे; पण ठोस उपाययोजना आखण्यासाठी तो पुरेसा नाही. ८० टक्के जन्मजात व्यंग नेमके कशामुळे निर्माण होते, हे आपल्याला ज्ञात नाही; पण प्रयोगांमधून जनुके, गर्भधारणापूर्व परिस्थिती आणि गर्भाच्या/ गर्भवती स्त्रीच्या आजूबाजूचे वातावरण यांच्या गुंतागुंतीच्या परस्परसंबंधांतून त्यांचा उगम होतो, हे सिद्ध झाले आहे. गर्भधारणेपूर्वी शरीरात लोह, फोलेट, आयोडीन यांची कमतरता असणे, गर्भारपणात विशिष्ट औषधे घेणे, दारू आणि तंबाखूचे सेवन, आईमधील स्थूलता, मधुमेह, उच्च रक्तदाब, गरोदरपणाच्या पहिल्या तीन महिन्यांतील ज्वर, एचआयव्ही, सिफिलीस, रुबेला, झिका यांचा जंतुसंसर्ग ही काही आपल्याला माहिती असलेली कारणे; पण त्यासाठीचा राष्ट्रीय स्तरावरील प्रतिबंधात्मक कार्यक्रम अस्तित्वात नाही. नुकत्याच जन्मलेल्या बाळामध्ये व्यंगाची लक्षणे दिसल्यास पुढे काय करावे, याचे ठरलेले नियम नाहीत. प्रत्येक डॉक्टरच्या ज्ञानानुसार पुढील उपचारांची दिशा ठरवली जाते. कुटुंबाच्या आर्थिक ऐपतीनुसार उपचार मिळतात. योग्य सल्ला मिळाल्यास मूल अचूक शाळेपर्यंत पोहोचते. नशीब बलवत्तर असेल तर शाळेत टिकते; परंतु हा सल्ला मिळण्याची आणि मूल शाळेत न टिकल्यास पुढे काय याचे योग्य वेळी मार्गदर्शन मिळेल याची कोणतीही खात्रीलायक, अधिकृत व्यवस्था नाही. प्रत्येक भिन्नक्षम मुलाच्या क्षमता वेगळ्या, मर्यादा वेगळ्या आणि पर्यायाने गरजा वेगळ्या. त्या ओळखून त्याचा सांभाळ करण्यासाठी पालकत्वाचे धडे देणारे फारसे कुणी नाही. त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाच्या संधी फारशा उपलब्ध नाहीत. प्रत्येक अपंगत्वावर उपचार करण्यासाठी सरासरी नेमका किती खर्च येतो, त्यातील किती पैसे हे कुटुंबाच्या खिशातून जातात, किती टक्के जबाबदारी विमा कंपनी उचलते याचीही आकडेवारीही उपलब्ध नाही. यातील काही सेवा पूर्णतः अनुपलब्ध आहेत तर काही इतक्या प्राथमिक स्वरूपातील किंवा विखुरलेल्या आहेत, की त्या असून नसल्यासारख्याच आहेत. ही प्रत्येक नकारघंटा सामाजिक आरोग्य क्षेत्रात अद्याप किती बदल अपेक्षित आहेत याविषयी खडबडून जागे करते.



अशाच काही जाग्या झालेल्या संशोधकांनी मिळून वरील काही रिकाम्या जागा भरून काढण्याचा नुकताच एक प्रयत्न केला. संशोधकांच्या या गटाने गेली काही वर्षे यावर भारतात संशोधन केले आणि या वर्षी पुस्तकरूपाने ते प्रकाशित केले. हे पुस्तक इंग्रजीत असून पुस्तकाचे नाव आहे 'बर्थ डिफेक्ट्स इन इंडिया : एपिडेमिऑलॉजी अँड पब्लिक हेल्थ इम्प्लिकेशन्स.' आंतरराष्ट्रीय स्तरावर सुरू असलेल्या संशोधनावर प्रकाशझोत टाकल्यास विकसनशील देशांच्या संदर्भात जन्मजात व्यंग हा विषय चर्चिला जात नाही, हे निदर्शनास येते, कारण या विषयाचा आवाका चर्चा करण्याइतका मोठा आहे, हे दाखवण्यासाठीचे आवश्यक अभ्यास आपल्याकडे झालेले नाहीत किंवा आधी नमूद केल्याप्रमाणे ते इतके विस्कळीत अवस्थेत आहेत, की त्यातून कुणालाही काहीही ठोस, शास्त्रीय हाती लागणे कठीण. हे पुस्तक उपलब्ध पुराव्यांचे उत्खनन करत, जिथे शक्य आहे तिथे पुराव्यांची मोट बांधून वाचकांपुढे ठेवते. या क्षेत्रात बाकीचे जग कोणत्या दिशेने प्रवास करत आहे, या दिशेने भारताने जाणे व्यवहार्य आहे का, असल्यास अजून काय अभ्यासणे गरजेचे आहे, याची चर्चा करते. लेखकांनी या संदर्भात स्वतः केलेल्या अभ्यासांचा पुस्तकात सविस्तर उल्लेख केला आहे.

जन्मजात व्यंगाच्या व्याख्येपासून, त्यात कोणकोणते प्रकार येतात, त्यांचे मोजमाप सध्या कसे केले जाते, आदर्श पद्धत काय आहे, व्यंग निर्माण होऊ नयेत म्हणून काय उपाययोजना केली पाहिजे, ती सरकारी पातळीवर कशी राबवता येईल, आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या आरोग्याच्या, आर्थिक आणि सामाजिक गरजा काय आहेत, त्या गरजा त्या त्या वेळी न भागल्यास त्याचा त्यांच्या आयुष्यावर कसा परिणाम होतो, व्यंगांमुळे कुटुंबीयांना सामाजिक कलंकाचा सामना करावा लागतो का, असल्यास त्याची कारणे काय, अशा सर्व विषयांचे सविस्तर विश्लेषण आपल्याला या पुस्तकात वाचायला मिळते.

आंतरराष्ट्रीय संशोधकांच्या वर्तुळात जन्मजात व्यंग ही निव्वळ वैद्यकीय संकल्पना होऊन बसली आहे; पण प्रत्यक्षात त्याला सामाजिक पैलूही आहे. बालरोगतज्ज्ञ, शल्यविशारद त्यातून निर्माण होणाऱ्या शारीरिक विकलांगतेचा अभ्यास करतात, तर जनुकशास्त्रज्ञ अशा व्यंगांना कारणीभूत असलेल्या जनुकीय बदलांची सविस्तर चर्चा करतात; पण व्यंगाचे निदान झालेले मूल पुढे कुठे जाते, त्याला आवश्यक उपचार मिळतात का, मिळालेल्या उपचारांचा त्याला उपयोग होतो का, ते मूल मोठे होताना कोणत्या अडचणींचा सामना करते याची उत्तरे फक्त दवाखान्यात मिळत नाहीत, तर त्याला सार्वजनिक आरोग्याच्या मूलभूत तत्त्वांच्या चष्म्यातून बघावे लागते. ही तत्त्वे कोणती?

प्रथम मोजमाप! किंबहुना वारंवार केले जाणारे मोजमाप (surveillance), प्रतिबंधात्मक उपाय, व्यंगाचे त्वरित निदान, त्यावर उपचार आणि शेवटचे पुनर्वसन. लेखकांनी सार्वजनिक आरोग्य क्षेत्राचे हे खांब लक्षात घेऊन पुस्तकाची मांडणी केली आहे. बाळांमध्ये जन्मजात व्यंगे नेमकी कशी निर्माण होतात, त्यांचे प्रकार कोणते, ती आनुवंशिक असतात की गर्भारपणात अचानक उद्भवतात याने पुस्तकाची सुरुवात होते. पुढे त्यांच्या परिणामांवर चर्चा होते. काही व्यंगे ही आईच्या पोटात असतानाच नष्ट होतात, काही बाळे ही व्यंगे घेऊन जन्माला येतात आणि पुढे जगतात. काही प्रसंगी जन्माला आल्यावर अल्पावधीतच त्यांचा मृत्यू होतो. दर वेळी हे परिणाम निव्वळ मृत्यू, कमी वजनाच्या बाळाचा जन्म अशा प्रकारे मोजले जातात, असे नाही, तर त्याचा कुटुंबीयांच्या शारीरिक, भावनिक आणि मानसिक स्वास्थ्यावर काय परिणाम होतो, आर्थिक भार किती पडतो, सामाजिक कलंकाचा सामना करावा लागतो का, हेही अभ्यासले जाते. लेखकांनी जगभरातील आणि भारतातील यासंबंधी झालेल्या प्रयोगांचे दाखले दिले आहेत. पुस्तकाच्या संपादिका डॉ. अनिता कार या जनुकशास्त्र आणि सार्वजनिक आरोग्य हा दोन्ही क्षेत्रांतील तज्ज्ञ असल्यामुळे एखाद्या व्यंगाला जनुकीय आधार असला तरी त्याला निव्वळ वैद्यकीय अंग न देता त्याचे सामाजिक परिणाम आणि शासकीय आरोग्य यंत्रणेने त्याची दखल का घ्यावी यावर चर्चा केली आहे.

सार्वजनिक आरोग्य यंत्रणेचे सर्वात महत्त्वाचे काम हे प्रतिबंधात्मक उपायांची आखणी आणि त्यांची अंमलबजावणी हे असते. जन्मजात व्यंगांच्या बाबतीत हे प्रतिबंधात्मक उपाय हे स्त्रीला गर्भधारणा होण्याच्या आधीपासून सुरू करणे क्रमप्राप्त असते. सद्यःस्थितीतील यंत्रणांमार्फत हे करायचे असल्यास विवाहित स्त्रियांना नियोजित गर्भधारणेविषयी, गर्भनिरोधक साधनांविषयी जागरूक करणे, त्यांचा आहार चौरस राहील याकडे लक्ष देणे यावर सविस्तर चर्चा पुस्तकात आहे. तसेच व्यंगावर औषधरूपी उपचार, शस्त्रक्रिया तसेच यांचे वैद्यकीय, शैक्षणिक, आर्थिक पुनर्वसन हे सर्व घटक स्वतंत्र नवी यंत्रणा उभी न करता उपलब्ध संसाधनांमार्फत कसे अमलात आणता येतील याचे अभ्यासपूर्ण विवेचन पुस्तकात वाचायला मिळते. थॅलॅसेमिया, हिमोफिलियासारख्या ज्या विकारांना जनुकीय आधार असतो, त्यांचा प्रतिबंध सामान्य माणसाला अप्राप्य वाटतो, हे आपल्या नशिबात लिहिले आहे आणि ते आपल्याला भोगायचे आहे असा समज असतो; पण व्यंग निर्माण करणारे हे विकार नेमके कशामुळे होतात याविषयीचे प्रबोधन, कुटुंबीयांमध्ये असे विकार आहेत का याविषयीची चौकशी, कुमारवयात स्वेच्छेने थॅलॅसेमियासारख्या रोगांची चाचणी यांसारखे उपाय उपयोगी ठरू शकतात. ते भारतासारख्या अनेक समस्यांशी एकाच वेळी झुंजणाऱ्या देशालाही कसे शक्य आहे याविषयी पुस्तकात सविस्तर वाचायला मिळते. थोडक्यात, भारताच्या संदर्भात जन्मजात व्यंगांविषयी सार्वजनिक आरोग्याच्या अंगाने अथपासून इतिपर्यंत सर्व शास्त्रीय तपशील या पुस्तकात वाचायला मिळू शकतील.

सार्वजनिक आरोग्य क्षेत्राचे विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक, शासनयंत्रणेतील निर्णयप्रक्रियेत सहभागी अधिकारी, धोरणकर्ते, वैद्यकीय अधिकारी आणि विज्ञानात रस असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला हे पुस्तक नक्कीच नवे काही तरी देईल. हसरे मूल सर्वांचेच असते. रडके मूल मात्र फक्त आईचे न राहता सर्वांचे होण्यासाठी समाजाला सजग करण्याच्या दृष्टीने हे पुस्तक उपयोगी पडेल यात शंका नाही.

response.lokprabha@expressindia.com

बॅलन डी'ओरच्या प्रतिष्ठेला धक्का!

लिओनेल मेसी

क्रीडा

अन्वय सावंत

बॅलन डी'ओर हा फुटबॉलमधील सर्वात प्रतिष्ठेचा वैयक्तिक पुरस्कार मानला जातो. फ्रान्स फुटबॉल मासिकाच्या वतीने १९५६ सालापासून वर्षातील सर्वोत्तम फुटबॉलपटूला बॅलन डी'ओर पुरस्कार प्रदान करण्यात येतो. या पुरस्कारासाठी जगभरातील आघाडीच्या फुटबॉलपटूंमध्ये कायमच चुरस असते आणि चाहते निकालाची आतुरतेने वाट पाहत असतात. यंदाचा निकाल काहीसा आश्चर्यकारक ठरला. अनेक फुटबॉल समीक्षकांनी या पुरस्काराच्या विश्वासार्हतेवर शंका उपस्थित केली.

यंदा अर्जेंटिना आणि पॅरिस सेंट–जर्मेनचा फुटबॉलपटू लिओनेल मेसी विक्रमी सातव्यांदा बॅलन डी'ओर पुरस्काराचा मानकरी ठरला. मेसीची फुटबॉल इतिहासातील सर्वोत्कृष्ट खेळाडूंमध्ये गणना होते. त्यामुळे त्याने हा पुरस्कार पटकावला याचे आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. मात्र, त्याच्यासोबत या प्रतिष्ठित पुरस्काराच्या शर्यतीत असणाऱ्या खेळाडूंची दर्जेदार कामगिरी पाहता, मेसीच्या निवडीवर नाराजी व्यक्त करण्यास नक्कीच वाव आहे.

मेसीने या वर्षात अर्जेंटिना, बार्सिलोना आणि पॅरिस सेंट–जर्मेन या संघांचे प्रतिनिधित्व करताना ५७ सामन्यांत ४१ गोल आणि १७ असिस्ट (त्याच्या अंतिम पासवर संघ–सहकाऱ्याचा गोल) केले. त्याच्या नेतृत्वात अर्जेंटिनाने 'कोपा अमेरिका' स्पर्धेचे जेतेपद पटकावले आणि त्याने स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कार मिळवताना या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. देशाचे प्रतिनिधित्व करताना नामांकित आंतरराष्ट्रीय स्पर्धा जिंकण्याची ही त्याची पहिलीच वेळ ठरली.

मेसीला अनेकदा आंतरराष्ट्रीय स्पर्धांच्या उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. त्याचा समावेश असलेल्या अर्जेंटिना संघाने २०१४ फिफा विश्वचषकाची अंतिम फेरी गाठली होती. मात्र, जर्मनीकडून ०–१ असा पराभव पत्करावा लागल्याने मेसीचे आंतरराष्ट्रीय जेतेपदाचे स्वप्न अधुरे राहिले. त्यामुळे यंदा 'कोपा अमेरिका' स्पर्धा जिंकल्यावर त्याच्यासह सर्व चाहत्यांनाही आनंद झाला. मात्र, भावनांच्या आधारे बॅलन डी'ओरसारखा मानाचा पुरस्कार एखाद्या खेळाडूला देणे कितपत योग्य आहे?

मेसीची या पुरस्कारासाठी प्रामुख्याने रॉबर्ट लेवांडोवस्कीशी स्पर्धा होती. लेवांडोवस्की सध्याच्या घडीला जगातील सर्वोत्तम आघाडीपटू (स्ट्रायकर) म्हणून ओळखला जातो. त्याने या वर्षी जर्मनीतील बलाढ्य क्लब बायर्न म्युनिक आणि पोलंडकडून खेळताना ५३ सामन्यांत ६४ गोल आणि १० असिस्टची नोंद केली. तसेच त्याने बुंडेसलिगा आणि जर्मन सुपर चषक या स्पर्धा जिंकल्या. त्याने त्याआधी २०२० मध्ये सर्वाधिक ४७ गोल करताना बायर्नकडून चॅम्पियन्स लीगसह सर्वच स्पर्धा जिंकल्या होत्या. मात्र, गतवर्षी करोनामुळे

रॉबर्ट लेवांडोवस्की

जॉर्जिन्हो

आयोजकांनी हा पुरस्कार रद्द केला आणि लेवांडोवस्कीची पहिल्यांदा बॅलन डी'ओर जिंकण्याची संधी हुकली. यंदाही त्याला डावलण्यात आले.

यंदाचा पुरस्कार स्वीकारताना मेसी म्हणाला, 'रॉबर्ट, तुला बॅलन डी'ओर पुरस्कार मिळायला हवा होता. गतवर्षी तूच या पुरस्काराचा खरा मानकरी होतास यावर सगळ्यांचे एकमत आहे.' मात्र, मागील वर्षीच नाही, तर यंदाही या पुरस्कारावर लेवांडोवस्कीचे नाव असले पाहिजे होते, असे अनेक फुटबॉलपटू, प्रशिक्षक आणि समीक्षकांना वाटले. 'मेसी आणि ख्रिस्तियानो रोनाल्डो हे मागील दशकभरातील सर्वोत्तम फुटबॉलपटू आहेत यात तिळमात्र शंका नाही. मात्र, केवळ या वर्षाबाबत बोलायचे तर, अन्य काही खेळाडूंनी मेसीपेक्षा दर्जेदार कामगिरी केली. त्यामुळे त्याला हा पुरस्कार मिळणे योग्य नव्हते,' असे जर्मनीचा फुटबॉलपटू टोनी क्रूस म्हणाला.

असेच काहीसे मत इंग्लंडमधील नामांकित फुटबॉल क्लब लिव्हरपूलचे विख्यात प्रशिक्षक युर्गन क्लॉप यांनी व्यक्त केले. 'ऐतिहासिक कारकीर्दीमुळे कायमच मेसीला हा पुरस्कार दिला जाऊ शकतो. परंतु लेवांडोवस्कीची या वर्षातील कामगिरी पाहता, त्याला यंदा हा पुरस्कार मिळणार नसेल, तर कधी मिळणार?' असा प्रश्न क्लॉप यांनी उपस्थित केला. 'मला या पुरस्काराची नेमकी मतप्रक्रिया माहीत नाही. पत्रकारांनी दिलेल्या मतांच्या आधारे विजेता ठरत नाही का?' असेही त्यांनी विचारले.

क्लॉप म्हणाले त्याप्रमाणेच जगभरातील पत्रकार मतदानाच्या आधारे या पुरस्काराचा विजेता ठरवतात. फ्रान्स फुटबॉल मासिक वर्षभरात सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या ३० खेळाडूंची यादी तयार करते. मग जगभरातील विविध देशांचे प्रतिनिधित्व करणारे १८० पत्रकार मतदान करतात. या पत्रकारांना खेळाडू आणि त्याच्या संघाची कामगिरी, खेळाडूचे कौशल्य आणि खिलाडूवृत्ती, खेळाडूची एकंदर कारकीर्द या तीन निकषांच्या आधारे मतदान करायचे असते. त्यांना सर्वोत्तम पाच खेळाडूंची नावे अनुक्रमे देण्यास सांगितले जाते. या यादीत अव्वल क्रमांकावर असलेल्या खेळाडूला सहा गुण, दुसऱ्या क्रमांकावरील खेळाडूला चार गुण, तिसऱ्या क्रमांकावरील खेळाडूला तीन गुण, मग दोन आणि एक गुण असे गुणदान केले जाते.

सर्वाधिक गुण मिळवलेल्या खेळाडूची बॅलन डी'ओर पुरस्काराचा विजेता म्हणून घोषणा केली जाते. मेसीने यंदा ६१३ गुणांसह हा पुरस्कार पटकावला, तर लेवांडोवस्कीला ५८० गुणांसह दुसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले. चेल्सीकडून खेळताना चॅम्पियन्स लीग आणि इटलीकडून खेळताना युरो चषक जिंकणाऱ्या जॉर्जिन्होने ४६० गुणांसह तिसरे स्थान मिळवले. जॉर्जिन्हो मधल्या फळीतील खेळाडू (मिडफिल्डर) असल्याने त्याच्या गोल आणि असिस्टच्या आकड्यांची मेसी किंवा लेवांडोवस्कीशी तुलना करणे योग्य ठरणार नाही. मात्र, सातत्यपूर्ण खेळ आणि मोक्याच्या क्षणी पेनल्टीचे गोलमध्ये रूपांतर करत त्याने त्याच्या संघांना दोन मोठ्या स्पर्धा जिंकवून दिल्या. परंतु त्याला मेसी आणि लेवांडोवस्कीपेक्षा अधिक मते मिळवणे शक्य झाले नाही.

'वर्षातील' सर्वोत्तम खेळाडूसाठी मतदान करतानाच्या निकषांमध्ये एकंदर कारकीर्दीचाही समावेश आहे. मग एखाद्या खेळाडूने वर्षभरात मेसी किंवा रोनाल्डो यांसारख्या ऐतिहासिक कारकीर्द असलेल्या खेळाडूंपेक्षा दर्जेदार कामगिरी केली, तर त्याला बॅलन डी'ओर पुरस्कार मिळू शकत नाही का? ज्या निकषांच्या आधारे 'वर्षातील' सर्वोत्तम खेळाडू निवडला जातो, ते योग्य आहेत का? याचा आता फ्रान्स फुटबॉल मासिकाने विचार करणे गरजेचे आहे.

मागील १०–१५ वर्षांतील विक्रमी कामगिरी, सातत्याने मिळवलेले यश या गोष्टींचा विचार केल्यास लेवांडोवस्की आणि जॉर्जिन्हो यांची मेसीशी तुलना होऊच शकत नाही. मेसीने वर्षानुवर्षे उत्कृष्ट कामगिरी करत असंख्य वेळा आपल्या क्लब आणि राष्ट्रीय संघाला एकहाती सामने जिंकवून दिले आहेत. त्याने आणि रोनाल्डोने दशकभराहूनही अधिक काळ जागतिक फुटबॉलवर अधिराज्य गाजवले आहे. मात्र, बॅलन डी'ओर हा वर्षातील सर्वोत्तम खेळाडूला दिला जाणारा पुरस्कार आहे. त्यामुळे या पुरस्कारासाठी मतदान करताना तटस्थपणे विचार करत केवळ वर्षभरातील कामगिरीनुसार मत देणे गरजेचे आहे. सध्या तरी तसे होताना दिसत नाही. इतर खेळाडूंच्या पदरी निराशा पडत आहे. त्यामुळे या पुरस्काराची प्रतिष्ठा टिकवून ठेवण्यासाठी फ्रान्स फुटबॉल मासिक कोणती पावले उचलणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

response.lokprabha@expressindia.com

सर्वेक्षण

केतकी जोशी

भय इथले संपत नाही...

एका मराठी वाहिनीवरील लोकप्रिय मालिकेत आईला यायला उशीर होतो. सासू, मुलं, नवरा असे सगळेच तिचं इतक्या उशिरापर्यंत बाहेर राहणं कसं चूक आहे यावर बोलत राहतात. ती कामानिमित्त बाहेर गेली आहे, हे माहीत असूनही हा संवाद होतो. एकीकडे असं वाटतं की हे आता कुठे घडतं का? आता तर कामानिमित्त स्त्रिया कितीतरी वेळ बाहेर राहतात. मग इतकंही कसं समजत नाही यांना... पण हे मत चुकीचं असल्याचं राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या (एनएफएचएस) आकडेवारीवरून स्पष्ट होतं. या सर्वेक्षणातून अत्यंत धक्कादायक गोष्टी, खरंतर सत्यच समोर आली आहेत. महिलांना अगदी क्षुल्लक कारणावरून मारहाण केली जाते हे तर आहेच, पण या मारहाणीचं महिलांनीच समर्थनही केलं आहे. मारहाण होण्यामागची कारणं तसं पाहायला गेलं तर अगदी साधी आणि क्षुल्लक आहेत.

एनएफएचएसच्या वतीने देशभर प्रातिनिधीक स्वरूपात हे आरोग्य सर्वेक्षण केले जाते. १९९२-९३ पासून आजवर तीन वेळा अशी सर्वेक्षणे करण्यात आली आहेत.

एनएफएचएसच्या सर्वेक्षणानुसार तीन राज्यांतील ७५ टक्क्यांहूनही अधिक महिलांनी आपल्या पतीकडून होणाऱ्या घरगुती हिंसाचाराचं समर्थन केलं आहे. तर देशभरातील १४ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांतील सुमारे ३० टक्के महिलांनीही या मारहाणीचं समर्थन केलं आहे. म्हणजेच पती करत असलेली मारहाण आणि त्यामागची कारणं योग्यच आहेत, असं या महिलांना वाटतं. खरंतर महिलांवर होणाऱ्या अत्याचारांबाबत जोरदार चर्चा अगदी सगळीकडेच सुरू असतात. अशा परिस्थितीत महिलाच त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचाराचं समर्थन का करत असतील, असाही प्रश्न आहेच. पुरुषी मानसिकता आणि पुरुषसत्ताक पद्धतीचा आजही असलेला प्रभाव ही त्यामागची मुख्य कारणं सांगता येऊ शकतील. म्हणजे एकीकडे महिला शिकल्या, स्वतःच्या पायावर उभ्या राहिल्या, नोकरी करू लागल्या, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाल्या, काही वेळा तर अगदी नवऱ्यापेक्षाही जास्त कमवू लागल्या. त्यांचा स्वतःचा बँक बॅलन्स, घरावर नाव लावणं, स्वतः काही खरेदी करणं, आयुष्यातले महत्त्वाचे निर्णय घेणं, हे सगळं सगळं होताना आपण आजूबाजूला पाहतो. तरीही नवरा काही परिस्थितीत हात उचलत असेल किंवा अगदी मारहाणही करत असेल तर ते योग्यच आहे, असं महिलांना का बरं वाटतं? म्हणजेच घरातला पुरुष प्रसंगानुरूप जे करतो, ते योग्यच आहे, ही पुरुषी मानसिकता स्त्रियांमध्येच अधिक भिनली, खोलवर रुजली आहे का?

निदर्शनास आलेले मुद्दे

- एखाद्या पतीने त्याच्या पत्नीला मारहाण करणं योग्य आहे का, असा प्रश्न एनएफएचएसने महिलांना विचारला होता. त्यावर नवऱ्याने मारहाण करणं यात काही गैर नाही असं तेलंगणातील आणि आंध्र प्रदेशातील ८४ टक्के महिलांना तर कर्नाटकातील ७७ टक्क्यांहूनही अधिक महिलांना वाटतं.
- घरातल्या वडीलधाऱ्यांचा विशेषतः सासू-सासऱ्यांचा अनादर करणं, हे काही राज्यांमध्ये पुरुषांनी महिलांना मारहाण करण्याचं मुख्य कारण आहे. हिमाचल प्रदेश, केरळ, मणिपूर, गुजरात, नागालँड, गोवा, बिहार, आसाम, महाराष्ट्र, तेलंगणा आणि पश्चिम बंगालमध्ये हे महिलांना होणाऱ्या मारहाणीमागचं मुख्य कारण आहे. मात्र हिमाचल प्रदेशात महिलांनी याविषयी वेगळं मत व्यक्त केलं आहे. पती जर या कारणावरून मारहाण करत असेल, तर ते योग्य नसल्याचं त्यांना वाटतं. तिथल्या फक्त १४.८ टक्के महिलांनी या मारहाणीचं समर्थन केलं आहे.
- पुरोगामी, महिलांचं शिक्षण, आर्थिक स्वातंत्र्य यासाठी प्रसिद्ध असलेल्या महाराष्ट्रातील ४४ टक्के महिलांनी पतीने पत्नीला मारण्याचं समर्थन केलं आहे. मणिपूरममध्ये ६६ टक्के, केरळमध्ये ५२ टक्के, जम्मू काश्मीरमध्ये ४९ टक्के तर पश्चिम बंगालमधल्या ४२ टक्के महिलांना पतीने पत्नीला मारणं, यात काही चुकीचं आहे असं वाटत नाही.
- घरकाम आणि मुलांकडे दुर्लक्ष करणं हेही बायकांना मारण्याचं मुख्य कारण आहे.

- त्याचबरोबर पत्नी नवऱ्याशी एकनिष्ठ नसल्याचा संशय, लैंगिक संबंध ठेवायला नकार देणे हीदेखील मारहाणीची कारणं आहे.
- चांगला स्वयंपाक करता न येणं, नवऱ्याला न सांगता बाहेर जाणं, घरकामाकडे दुर्लक्ष अशा कारणांमुळेही महिलांना मारहाण होते आणि त्यात महिलांना काही वावगं वाटत नाही.
- नवऱ्यानं मारण्यात काही गैर नसल्याचं मत व्यक्त करणाऱ्या सर्वाधिक महिला तेलंगणातील आहेत. तेलंगणातील ८४ टक्के महिलांना पतीने पत्नीला मारणं योग्य आहे, असं वाटतं.
- कर्नाटकातील ८१.०९ टक्के महिलांनीही नवऱ्याच्या मारहाणीचं समर्थन केलं आहे.

खरंतर आपल्या घरातील बायकांना सर्वांसमोर अपमानकारक बोलणं, पत्नीच्या माहेरच्यांबद्दल अपमानकारक बोलणं, टोमणे मारणं, या गोष्टी तर जणू नवऱ्याचा अधिकार असल्यासारखीच परिस्थिती आजही अनेक ठिकाणी दिसते. अजूनही आपल्या घरातील पुरुषच सर्वश्रेष्ठ असल्याची भावना महिलांमध्ये आहे. हे लहानपणापासूनच त्यांच्या मनावर बिंबवलं जातं. शिक्षण, आर्थिक स्वावलंबन, आर्थिक स्वातंत्र्य, पेहरावातला आधुनिकपणा हे सगळं असलं तरी ही मानसिकता मात्र अजूनही तशीच आहे. ती बदलायचा जाणीवपूर्वक प्रयत्नही केला जात नाही.

टाळेबंदीच्या काळात घरगुती हिंसाचार आणि महिलांवरील अत्याचारांमध्ये वाढ झाल्याचं समोर आलं. पत्नीला तोंडात मारणे, हात मुरगळणे, केस ओढणे, ढकलून देणे, धरून गदागदा हलवणे, अंगावर काहीतरी फेकून मारणे, लाथ मारणे, फरपटत नेणे, मारहाण करणे, गळा आवळणे, इच्छा नसताना लैंगिक संबंध ठेवायला भाग पाडणे अशा अनेक गोष्टी अनेक पुरुष सर्रास करतात. साथीच्या दोन वर्षांत हा घरगुती हिंसाचार वाढल्याचं समोर आलं. कौटुंबीक समुपदेशक ॲड. स्वाती यादवाडकर सांगतात, ''गेल्या दोन वर्षांत कौटुंबिक हिंसाचार, लैंगिक अत्याचार, घटस्फोटाची प्रकरणं, मारहाण आणि त्याचा मानसिकतेवर होणारा परिणाम हे जास्त तीव्रतेने दिसून आलं आहे. महाराष्ट्रात घटस्फोट आणि घरगुती हिंसाचाराच्या तक्रारी दाखल केल्या जाण्याच्या प्रमाणातही वाढ झाली आहे. करोनामुळे मानसिक अवस्था बदलली. सतत घरात असल्यामुळे घरातल्या छोट्या छोट्या समस्या ठळकपणे दिसू लागल्या. मग ते नैराश्य अनेकदा घरातल्या बायकांवरच निघू लागलं. तू स्वयंपाक नीट केला नाहीस, जेवायला नीट वाढलं नाहीस अशी क्षुल्लक निमित्तंही अनेक सुशिक्षित जोडप्यांमध्ये पत्नीवर हात उचलायचं कारण ठरू लागली. इतके दिवस ज्या गोष्टींकडे लक्षही गेलं नाही त्या गोष्टी आता दोष म्हणून ठळकपणे समोर आल्या. आर्थिक, सामाजिक ताणतणाव पत्नीवरच काढण्यात येऊ लागले.''

''घरी राहून कित्येक महिने आपल्या माहेरच्यांना साधा फोनही करता आला नाही. यामुळे प्रचंड नैराश्यातून अनेक महिलांना जावं लागलं. इतकी भीषण परिस्थिती असतानाही जर महिलांना आपल्याला होणाऱ्या मारहाणीत काही वावगं वाटत नसेल तर आपण त्यांना माणूस म्हणून वागवण्यात कुठे तरी कमी पडलो आहोत, असं वाटतं,'' असं मत ॲड. यादवाडकर व्यक्त करतात.

आपल्या पत्नीला घरकाम का करावंसं वाटत नाही, तिचं काय म्हणणं आहे हेही समजून घेतलं पाहिजे. तिची काही बाजू असू शकेल आणि ती खरोखरच चुकत असेल तर तिच्याशी बोलून ही चूक सुधारता येऊ शकते. मारहाण हा त्यावरचा उपाय नाही. असं होत असेल तर घरातल्या अन्य महिलांनी ही मारहाण वेळीच थांबवायला हवी, असं महाडला राहणाऱ्या गृहिणी आणि कवयित्री दीप्ती कुलकर्णी यांना वाटतं.

लेखक अभिजीत पेंढारकर यांनी याबद्दल महत्त्वाचं मत मांडलं आहे. ''टाळेबंदीच्या काळात सगळ्यांच्याच आयुष्यात उलथापालथ झाली. त्यात स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर आधीपेक्षा जास्त बंधनं आली, काही वेळा ती त्यांच्यावर

कळत-नकळत लादली गेली. त्यांनीही ती खुशीने किंवा नाइलाजाने स्वीकारली, असं एक लेखक, एक पुरुष, एक नागरिक म्हणून वाटतं. आधुनिक काळात स्त्री सर्वच क्षेत्रांत अग्रेसर असली, तरी घरी आल्यावर ती स्त्रीच असते. अनेक स्त्रियांना घरातल्या मर्यादित चौकटीत का होईना, जे स्वातंत्र्य होतं, घरातले सगळे बाहेर गेल्यावर स्वतःची जी स्पेस होती, ती गेली, असं मला वाटतं. या स्वतःच्या वेळात त्यांना फोनवर का असेना, मैत्रिणींशी, माहेरच्यांशी मोकळेपणाने बोलता येत असे. टाळेबंदीत, ते सुद्धा कमी झालं. अनेकींना घरातल्या आजारपणांमुळे, उत्पन्नातल्या अस्थिरतेमुळे, सारखे सगळे एकत्र असण्यामुळे अकारण ताण आला. तो त्यांनी स्वतःवर ओढवूनही घेतला आणि काही वेळा त्यांच्यावर लादलाही गेला, असंही जाणवलं. 'सुपरवूमन होण्याचा स्त्रियांचा अट्टहासही त्यांना अनेकदा नडतो. सगळे दोष आणि जबाबदाऱ्या स्वतःवर घेण्याचे संस्कार, घरून मिळालेलं बाळकडूही त्यांच्या मोकळेपणाने विचार करण्याच्या प्रवासात अडथळे आणतं. लेखक म्हणून ही बाब नेहमीच अस्वस्थ करते असं अभिजीत यांना वाटतं.

कोविडकाळात अनेक हेल्पलाइन केंद्र, महिलांसाठीची मदत केंद्रं इथं मदतीसाठी येणाऱ्या फोन कॉल्सच्या संख्येतही भरपूर वाढ झाली, असं सामाजिक कार्यकर्त्यांचं म्हणणं आहे. सतत घरात राहिल्यामुळे महिलांवरील अत्याचारांमध्ये वाढ झाली होती, पण हे अत्याचार आहेत, हे चुकीचं घडतंय हेच मुळात अनेक महिलांना उशिरा कळतं. घरातल्या महिला शिकल्या, बोलू लागल्या, आपली मतं मांडू लागल्या हेही त्यांच्यावरील अत्याचार वाढण्यामागचं एक कारण आहे, असं निरीक्षण आहे. बायका बोलत आहेत, याचा अर्थ त्या उद्धट झाल्या आहेत, असा सरळ सरळ अर्थ काढला जातो.

कोरोनाकाळात बहुतांश स्त्रियांच्या जीवनात आमूलाग्र बदल झाले. नोकरी जाणं, स्व-अर्थार्जनाचे साधन बंद पडणं किंवा अपुरी पडणं, घरातील लहान मुलं, वृद्ध तसेच इतर कुटुंबीयांची जबाबदारी अंगावर पडणं, घरातील कोणी कोविडग्रस्त असेल तर त्यांची देखभाल करणं, रुग्णालयात दाखल असेल, तर त्यांची व्यवस्था पाहणं अशा बहुविध भूमिकांचा तोल सावरताना स्त्रियांचं स्वतःकडे नेहमीप्रमाणेच दुर्लक्ष होताना दिसत आहे. त्यांच्या शारीरिक मानसिक आरोग्याला एरवीपेक्षा अधिक धोका निर्माण झाला आहे, असं साताऱ्याच्या मानसोपचारतज्ज्ञ आणि न्यूयॉर्कच्या अल्बर्ट एलिस इन्स्टिट्यूटमध्ये फेलोशिप करणाऱ्या डॉ. वैशाली चव्हाण यांचं म्हणणं आहे. "यापूर्वीही अर्थार्जन करताना या प्रकारच्या विविध भूमिकांचा ताळमेळ घालताना त्यांची दमछाक होतच असे, पण करोना महासाथीमुळे कोसळलेलं आर्थिक संकट, अर्थार्जनाबाबत अनिश्चितता, अन्न व आरोग्य सुविधांची कमतरता, घरात बंदिस्त राहणं, त्यामुळे कुटुंबियांतील संघर्ष तीव्र होणं, घरगुती व लैंगिक हिंसाचारात झालेली वाढ, घरातील पुरुषांची वाढलेली व्यसनाधीनता, अचानक तीव्रपणे पुढे आलेली आयुष्यातील अनिश्चितता, काही नातेवाईक व मित्रमैत्रिणी यांचा कोविडमुळे मृत्यू आणि अचानकपणे लादलेल्या रिकाम्या वेळेचं नियोजन नीट न करता येणं अशा अनेक घटकांचा महिलांच्या मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम झाला. या काळात स्त्रियांचे चिंताविकार, नैराश्यविकार, मंत्रचळ, अन्नसेवनाचे आजार (सतत खाणे व उलट्या करणे किंवा गरजेपेक्षा अत्यंत कमी खाणे), दीर्घकाळ टिकलेला शोक असे आजार वाढलेले दिसतात. तसेच ज्या स्त्रियांना असे मनोविकार आधीच आहेत त्यांचेही मनोविकार वाढलेले दिसतात. भारतातील जवळजवळ ७० टक्के महिला कोविड योद्ध्यांना बर्न आउट जाणवत आहे. सध्या १८-२४ वयोगटात असलेल्या सुमारे ६५ टक्क्यांपेक्षा अधिक स्त्रियांना नैराश्याचा त्रास होत आहे.

अन्याय करणाऱ्याइतकाच अन्याय सहन करणाराही दोषी असतो, असं म्हटलं जातं. त्यामुळे आपल्याला किरकोळ कारणावरून होणारी मारहाण जर महिलाच गांभीर्यानं घेत नसतील आणि त्यात काही चूक आहे, असं त्यांना वाटत नसेल तर नक्कीच कुठेतरी चुकतंय. यावर एक महत्त्वाचा उपाय म्हणजे कोणावरही विनाकारण हात उगारू नये, हे मुलांच्या मनावर लहानपणापासूनच बिंबवणं. अर्थात याचे परिणाम दिसायला वेळ लागेल, पण हळूहळू नक्कीच फरक पडेल. तसंच निमूटपणे मार खाणं चूक आहे, हे मुलींनाही शिकवणं गरजेचं आहे. घरगुती हिंसाचारावर मुख्य प्रवाहात, मोठ्या व्यासपीठांवरही चर्चा होणं गरजेचं आहे. त्यामुळे ज्या महिला याला अन्याय मानत नाहीत, त्यांनाही आपण हे सहन करणं योग्य नसल्याची जाणीव होईल.

कित्येक शतकांपासून मुरलेल्या या मानसिकतेचं उच्चाटन करण्यासाठी प्रदीर्घ काळ सातत्यपूर्ण प्रयत्न करावे लागतील. तरंच राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणातील आकडेवारी काही प्रमाणात का होईना सकारात्मकतेकडे वळू लागेल.

response.lokprabha@expressindia.com

इफ्फी

देविका जोशी

दुहेरी भूमिका बजावताना

गोव्यात नुकत्याच झालेल्या ५२व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात– 'इफ्फी'मध्ये 'गोदावरी' या मराठी चित्रपटाने दोन आंतरराष्ट्रीय पुरस्कार पटकावले. या चित्रपटातील प्रमुख भूमिकेसाठी अभिनेता जितेंद्र जोशी याला 'सर्वोत्कृष्ट अभिनेता' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यापूर्वी केवळ तीन भारतीय अभिनेत्यांना हा पुरस्कार मिळाला आहे. जितेंद्रने आजपर्यंत अनेक उत्तमोत्तम भूमिकांतून आपल्या अभिनयाची छाप रसिकप्रेक्षकांच्या मनावर उमटवली आहे, पण 'गोदावरी' या चित्रपटाच्या निमित्ताने त्याने अभिनेता आणि निर्माता अशी दुहेरी भूमिका बजावली. 'गोदावरी'च्या या प्रवासाबद्दल अभिनेता जितेंद्र जोशी याच्याशी मारलेल्या या दिलखुलास गप्पा...

■ **एक उत्कृष्ट अभिनेता म्हणून तू प्रेक्षकांना माहिती आहेस, पण 'गोदावरी' या चित्रपटाच्या निर्मात्याची भूमिकाही तू पार पाडली आहेस. एक निर्माता म्हणून हा अनुभव कसा होता?**

निर्माता म्हणून याआधी मी '२ स्पेशल' हे नाटक केलं होतं, पण त्याव्यतिरिक्त कोणताच अनुभव नव्हता. निर्माता म्हणून 'गोदावरी' हा माझा पहिलाच चित्रपट आहे. ही जबाबदारी खरंतर माझ्या अंगावर पडली, असं म्हणायला हरकत नाही. एका निर्मात्याने ऐन वेळी माघार घेतल्यामुळे मी आणि या चित्रपटाचा दिग्दर्शक निखिल महाजनने हा चित्रपट करायचा असं ठरवलं. पवन मालू हा मित्रदेखील आमच्याबरोबर आला. चित्रपट करण्याची तीव्र इच्छा होतीच, त्यात या मित्रांची सोबत लाभली. मला हा चित्रपट करावा असं मनापासून वाटलं. एक निर्माता म्हणून ज्या जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात, त्या भक्कमपणे पेलणारी 'ब्लू ड्रॉप'ची टीमही माझ्याबरोबर होती. या संस्थेत काम करणारे माझे मित्र स्वप्निल भंगाळे, चेतन शर्मा आणि त्यांचे सहकारी यांनी सगळ्या जबाबदाऱ्या इतक्या उत्तमरीत्या पार पाडल्या, की मला फार बघावं लागलं नाही. मी वेळोवेळी टीमची काळजी घेत होतोच. 'गोदावरी' या चित्रपटाचा निर्माता म्हणून माझं नाव लागत असलं, तरी टीममधल्या प्रत्येकाची भूमिका फार मोलाची आहे.

■ **चित्रीकरण झालं, तेव्हा कोविडमुळे काही बंधनं होती. अशा परिस्थितीत संपूर्ण टीमबरोबर काम करताना कोणत्या अडचणी आल्या?**

टाळेबंदी थोडी शिथिल झाल्यानंतर मी आणि निखिल नाशिक बघायला गेलो, कारण निखिलने

नाशिक पाहिलं नव्हतं. एका वेगळ्या नजरेतून आम्हाला नाशिक बघायचं होतं, त्यासाठी आमचा मित्र प्राजक्त देशमुख सोबत आला आणि दुसऱ्याच दिवशी निखिलसोबत तो चित्रपटाचा सहलेखक झाला. त्या वेळी ठरावीक वेळेतच बाहेर फिरण्याची परवानगी होती, त्यामुळे आम्ही दिलेल्या वेळेत फिरून पुन्हा हॉटेलवर यायचो आणि चित्रपटाविषयी चर्चा करायचो. सुरुवातीला आम्ही तिघंच होतो त्यामुळे फारशा अडचणी आल्या नाही, पण चित्रीकरण सुरू झाल्यानंतर कोविडची टांगती तलवार सतत डोक्यावर होती. लोक हात मिळवायलाही घाबरायचे, त्या काळात आम्ही नाशिकला जाऊन चित्रीकरण केलं. विक्रम गोखले, नीना कुलकर्णी, संजय मोने असे ज्येष्ठ कलाकार सोबत होते. त्यांच्या आसपास कोणी जाणार नाही, याची आम्ही खबरदारी घेतली होती. हॉटेल ते सेट आणि पुन्हा सेट ते हॉटेल एवढाच प्रवास व्हायचा. हाताळलेली प्रत्येक वस्तू आम्ही सॅनिटाइझ करत होतो. जेवणही प्रत्येकाला खोलीत मिळेल, अशी सोय केली होती. वेळोवेळी आरटीपीसीआर चाचणीही करत होतो. एरवी चित्रीकरणात जसा मोकळेपणा असतो तसा नव्हता. एका बंदिस्त वातावरणात आम्ही काम करत होतो. सगळ्यांसाठीच हा अनुभव नवीन होता, पण प्रत्येकानेच ही गोष्ट सांभाळून घेतली आणि चित्रिकरण निर्विघ्न पार पडलं.

■ **चित्रपटाच्या कथानकाविषयी आणि तुझ्या भूमिकेविषयी काय सांगशील?**

नाशिकला गोदावरीच्या घाटावर राहणाऱ्या देशमुख कुटुंबाची ही गोष्ट आहे. पाच पिढ्यांपासून हे कुटुंब नाशिकला वास्तव्यास आहे. नाशिकमध्ये जन्मलेल्या आणि वाढलेल्या 'निशिकांत देशमुख' नावाच्या माणसाची ही कथा आहे. एकीकडे परंपरा आणि संस्कृती सांगणारे त्याचे आई–वडील आहेत आणि दुसरीकडे मॉडर्न बदलत चाललेलं जग. या सगळ्यात आपण कुठेच बसत नाही, वयाची चाळिशी गाठली तरीही आपण स्वतःला सिद्ध केलेलं नाही हे शल्य त्याच्या मनात आहे. त्याला नाशिक शहराचा, नदीचा, जवळच्या माणसांचा राग आहे. या रागाचंही तो काहीच करू शकत नाही, ही अगतिकता त्याला भेडसावत आहे, पण त्याच्या आयुष्यात एक घटना घडते आणि हा अश्रद्ध माणूस श्रद्धेकडे ओढला जाऊ लागतो. त्याचा द्वेषाकडून प्रेमाकडे, विश्वासाकडे होणारा प्रवास यात चित्रित करण्यात आला आहे.

आठवणीतली प्रतिक्रिया

गोव्यात मानाच्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात 'इफ्फी'मध्ये 'गोदावरी'चं स्क्रीनिंग होतं. चित्रपटानंतर एक तरुण मुलगा मला येऊन भेटला आणि म्हणाला, की 'चित्रपट सुरू झाल्यानंतर माझ्यासाठी हे थिएटर नव्हतं, मी मनाने नाशिकमध्ये होतो. गोदावरीच्या तीरावर होतो. चित्रपट संपल्यानंतरही मी गोदावरीतून बाहेर येऊ शकत नाही.' त्याने अगदी मनापासून दिलेली ही प्रतिक्रिया होती. पुरस्कार मिळाल्यानंतर अनेकांच्या प्रतिक्रिया आल्या, पण त्या मुलाची प्रतिक्रिया माझ्या लक्षात आहे.

मित्रमंडळींची साथ

करोनाकाळात आम्ही चित्रीकरण करत होतो, त्यामुळे योग्य काळजी घेणं खूप गरजेचं होतं. नाशिकमध्ये चित्रीकरण करत असताना प्राजक्तच्या मित्रमंडळींची खूप मदत झाली. 'निर्माणमोहा' या त्याच्या नाट्य संस्थेतील गिरीश, राजेश. हेमंत, श्रीपाद अशी मित्रमंडळींची भक्कम फळी आमच्यामागे उभी होती. माझे मामा कैलास पांडे, डॉक्टर नीलेश शर्मा यांचीदेखील खूप मदत झाली. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे चित्रीकरण पूर्ण झाल्यावर पुढील सोपस्कार पूर्ण करण्यासाठी आकाश पेंढारकर, पराग मेहता, अमित डोग्रा हे तिघे सोबत येऊन उभे राहिले आणि आमच्यावर विश्वास दाखवला. आज 'गोदावरी'ला मिळालेलं यश हे आमच्या सगळ्यांच्या प्रयत्नांचं फलित आहे.

■ **'गोदावरी' हा चित्रपट करण्यामागे काय कारण होतं?**

१७ ऑगस्ट २०२०ला माझ्या मित्राचं, दिग्दर्शक– अभिनेता निशिकांत कामत याचं निधन झालं. त्या वेळी अनेकांनी विविध प्रतिक्रिया व्यक्त केल्या. माझी एकच प्रतिक्रिया होती, ती म्हणजे ₹मला काहीतरी करायचंय. त्याच दिवशी मी निखिलला म्हणालो, की 'आपण काहीतरी करू या'. चित्रपट करण्यावर आमचं एकमत झालं. त्याने मला एक कथा थोडक्यात ऐकवली. चित्रीकरण कुठे करायचं, यावर चर्चा सुरू असताना माझ्या डोळ्यांसमोर 'नाशिक' आलं. या प्रक्रियेत प्राजक्तही सामील झाला. आम्ही नाशिकला जाऊन आलो आणि हळूहळू ही प्रक्रिया पुढे गेली. गोदावरीनेच हा चित्रपट आमच्या हातून करवून घेतला, असं म्हणणं योग्य ठरेल.

■ **'इफ्फी' या आंतरराष्ट्रीय पुरस्कार सोहळ्यात मिळालेल्या पुरस्काराविषयी काय भावना आहेत?**

२०० चित्रपटांची ही आंतरराष्ट्रीय स्पर्धा होती. पाच वेगवेगळ्या देशांतील, ज्यांना मराठी समजत नाही अशा मान्यवर परीक्षकांनी सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा पुरस्कार निखिल महाजनला आणि सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार मला द्यावा ही आमच्यासाठीच नव्हे तर संपूर्ण मराठी चित्रपटसृष्टीसाठी मानाची बाब आहे. अशा एका स्पर्धेत आपण कलेच्या जोरावर आपल्या देशाचं प्रतिनिधित्व करतोय, हीच आमच्यासाठी खूप मोठी गोष्ट आहे. हे यश केवळ आम्हा दोघांचं नसून आमच्या संपूर्ण टीमचं आणि आमच्यावर प्रेम करणाऱ्या कलाकार, तंत्रज्ञ आणि प्रेक्षकांचं आहे. गोदावरी चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर त्याला प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद द्यावा, इतकीच गोदावरी चरणी प्रार्थना आहे.

शब्दांकन – देविका जोशी

response.lokprabha@expressindia.com

इफ्फी

जय पाटील

‘इफ्फी’मध्ये आपला एक तरी चित्रपट झळकावा, अशी प्रत्येक कलाकाराची इच्छा असते; पण कोल्हापुरातल्या एका छोट्याशा गावातून अभिनय क्षेत्रात आलेल्या रावी किशोर या अभिनेत्रीची प्रमुख भूमिका असलेल्या एक-दोन नव्हे, तर तब्बल तीन कलाकृती इफ्फीमध्ये दाखवण्यात आल्या. विशेष म्हणजे या तीन कलाकृती तीन वेगळ्या भाषांतल्या आहेत. या पार्श्वभूमीवर रावीशी मारलेल्या गप्पा...

रावीची हॅट्ट्रिक

भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (इफ्फी) रावीची भूमिका असलेला ‘वाट’ हा मराठी चित्रपट, ‘कुपांचो दर्यो’ हा कोंकणी लघुपट आणि ‘पिकाबू’ हा हिंदी लघुपट दाखवण्यात आला. ‘वाट’ या चित्रपटात समाजातल्या अंधश्रद्धांवर बोट ठेवण्यात आलं आहे. ‘पिकाबू’ हा थरारपट आहे, तर ‘कुपांचो दर्यो’ हा तरल प्रेमाचं चित्रण असलेला काव्यपट आहे. अभिनयाची कोणतीही पार्श्वभूमी नसलेल्या रावीचा इथवरचा प्रवास कौतुकास्पद आहे.

कोल्हापुरात वाढलेल्या रावीला अभिनयाची आवड होती, मात्र त्यात करिअर होऊ शकतं, त्याचेही अभ्यासक्रम असतात याविषयी मात्र ती अनभिज्ञ होती. कोल्हापुरात असेपर्यंत तिचं अभिनयविश्व महाविद्यालयीन महोत्सव आणि युथ फेस्टिव्हलमधल्या एकांकिकांपुरतंच सीमित होतं. विवाहानंतर ती गोव्यात आली आणि तिने अभिनयाचा गांभीर्याने विचार करण्यास सुरुवात केली. आपल्या सुरुवातीच्या धडपडण्याच्या, चाचपडण्याच्या काळाबद्दल रावी सांगते, ‘अभिनयात करिअर करता येऊ शकतं, पदवी मिळवा येते, पीएचडी करता येते, यातलं काहीही मला माहीत नव्हतं. गोव्याला आले आणि मग हळूहळू या क्षेत्राविषयी माहिती मिळू लागली. तिथल्या ‘कला अकादमी’च्या ‘रेपर्टरी कंपनी’त माझी निवड झाली. दोन वर्ष तिथे काम केलं, पण त्यातून फारसं समाधान मिळत नव्हतं. त्यामुळे

अभिनयात एमए करण्यासाठी पुण्याला गेले, मात्र तिथे माझी निवड झाली नाही. तिथे केवळ दहाच जागा होत्या आणि त्यापैकी दोनच जागा मुलींसाठी होत्या. तिथे भेटलेल्या एका मैत्रिणीने मुंबई विद्यापीठातही असा अभ्यासक्रम उपलब्ध असल्याची माहिती दिली. तिथे प्रवेश मिळाला आणि खऱ्या अर्थाने माझा अभिनय क्षेत्रातला प्रवास सुरू झाला.'

मुंबई विद्यापीठात बरंच काही शिकायला मिळाल्याचं, विविध प्रयोग करून स्वतःला अजमावण्याची संधी मिळाल्याचं रावी सांगते. 'तिथे अगदी २६ वर्षांच्या मुलीपासून ६० वर्षांच्या म्हातारीपर्यंत विविध प्रकारच्या भूमिका करता आल्या. एमएचं पहिलं वर्ष सुरू असताना एक फ्रेन्च दिग्दर्शक भारतात आले होते. त्यांच्या 'क्रुसेड्स' या नाटकाचा 'जिहाद यात्रा' हा उर्दू अनुवाद करण्यात आला होता. त्या नाटकात अभिनय करण्याची संधी मला मिळाली. हा समृद्ध करणारा अनुभव होता.'

एमएचं दुसरं वर्ष सुरू असताना तिचं फेसबुक प्रोफाइल पाहून एका तेलुगू कास्टिंग डायरेक्टरने तिला हैदराबादला येण्यास सांगितलं. तिथे काम मिळण्याची शक्यता असल्यामुळे ती हैदराबादला गेली. एक ॲड. फिल्म केली. अनुभव घेऊन पाहायला काय हरकत आहे, अशा विचारातून 'बडे अब्बू' चित्रपटात साहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम सुरू केलं, पण नंतर त्यात अभिनेत्री म्हणून तिची निवड झाली. पुढे या चित्रपटाची 'इफ्फी'मध्ये निवड झाली.

रावीने विविध भाषांतील चित्रपट, लघुपटांत काम केलं आहे. भाषिक अडथळे ओलांडणं तिने कसं साध्य केलं असावं, असा प्रश्न पडतोच.



'इफ्फी'मध्ये निवड झालेल्या 'पिकाबू' या हिंदी लघुपटाची संपूर्ण टीम मल्याळी आहे. इफ्फीमध्ये निवड झालेला 'वाट' हा माझी प्रमुख भूमिका असलेला पहिलाच मराठी चित्रपट आहे.

इफ्फीतील यंदाच्या अनुभवाविषयी ती सांगते, 'इफ्फीच्या निमित्ताने बऱ्याच काळानंतर चित्रपट महोत्सवाला प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची संधी मिळणार, म्हणून मी खूश होते. आपला चित्रपट निवडला जाईल का, वगैरे काहीही

वाट

कुपांचो दर्यो

त्याविषयी ती सांगते, 'कोंकणीचं मराठीशी साधर्म्य आहे. त्यामुळे ती भाषा समजण्यात फार अडथळे आले नाहीत, पण मल्याळम् ही अतिशय कठीण भाषा आहे. सुरुवातीला मला त्यातला एकही शब्द कळत नसे. मी केरळला जाऊन वसतिगृहात राहू लागले. मग एक एक शब्द लक्षात येऊ लागला. टाळेबंदीच्या काळात मल्याळम् भाषा शिकायला सुरुवात केली. आज ही भाषा, माला लिहिता, वाचता, बोलता येते. तमिळ आणि तेलगू मला थोडंफार समजतं. मल्याळममध्ये तीन चित्रपट केले आहेत आणि एक शॉर्टफिल्म केली आहे. 'ऑन द रॅग्ज' हा संवाद नसलेला चित्रपट केला आहे.

डोक्यात नव्हतं. एक चित्रपट आणि दोन लघुपटांची निवड झाल्यामुळे खूपच आनंद झाला. साथीमुळे जे निराशाजनक वातावरण निर्माण झालं होतं, त्यातून बाहेर पडण्यासाठी इफ्फी हा एक आश्वासक अनुभव ठरला.'

रावीने 'झाँसी' नावाच्या एका तेलगू वेबसीरिजमध्ये काम केलं असून, ती पुढच्या वर्षी प्रदर्शित होण्याची शक्यता आहे. वाटेत येणारे अडथळे पार करत, मिळेल त्या प्रत्येक संधीला पुरेपूर न्याय देत, स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण करण्याच्या दिशेने रावीची वाटचाल सुरू आहे.

response.lokprabha@expressindia.com

बाबल्याचो गाव

अनुभव

सरिता बांदेकर

बस सुरू झाली आणि बाबल्या अंगाची मुटकळी करून सीटवर आडवा झाला. सीझन नसल्यामुळे बस रिकामीच होती. आता पेण येईपर्यंत काही चिंता नव्हती. अचानक गावी जायचं ठरल्यामुळे फक्त स्वतःचंच सामान होतं, कुणाच्या भेटी नव्हत्या. आता गावी पोहोचल्यावर सगळ्यांचं ऐकून घ्यावं लागणार होतं. त्याच्यासाठी मनाची तयारी करून ठेवायला पाहिजे, असा विचार बाबल्या करत होता. जवळ जवळ सहा महिन्यांनी तो गावी निघाला होता.

पहाटे ५ वाजता बस तळेऱ्यात पोचली. बाबल्या आता पुढे जायला रिक्षा शोधत होता. जाधववाडीला जायला कुणी तयार नव्हतं. शेवटी बाबल्याने आपलं बूड बसस्टॅण्डमधल्या बाकावर टेकवलं आणि उजाडायची वाट बघत बसला.

उजाडल्यावर त्याने सांवताच्या घरी फोन लावला आणि बाबूला सांगितलं, 'बाबू मला अचानक सुट्टी मिळाली, म्हणून आलोय गावाला. मला न्यायला स्टॅण्डवर ये.' बाबू १५ मिनिटांत स्टॅण्डवर आला आणि आल्या आल्या प्रश्नांची सरबत्ती सुरू केली.

'काय रे सगळा बरा असा ना? मध्येच कशी रजा

भेटली तुला? आणि हे काय सामान एव्हढाच तुझा? काय प्राब्लेम नसा ना?'

'अरे, अरे तुझी एक्स्प्रेस थांबव. चल आधी घराकडे जाऊ या. मला जरा रजा मिळाली म्हणून आलो आराम करूक. तीन महिने एकही दिवस सुट्टी न घेता काम केलंय. मग मालक बोललो जा चार दिवस जाऊन ये गावाकडे. आणि तिकटा पण मिळाली. मग काय आलो तसाच,' बाबू रिक्षात बसत बोलला.

घरी पोहोचल्यावर आय आणि बापूस बघतच बसले. त्यांनी हाक दिली 'गे बाय, ह्या कोण ईला हा ता तरी बघ.' मग झीलाकडे वळून त्यांनी विचारपूस केली. 'काय कामधंदा ठीक आहे ना? कंपनी बंद तर झाली नाही ना?' वगैरे वगैरे... तोपर्यंत कुस्मी डोकावून परत आत गेली होती. बाबल्या आत गेल्यावर तिने त्याच्या हातात गरम पाण्याचा तांब्या आणि मशेरी दिली. बाबल्याचं आवरेपर्यंत तिने चहा केला होता. चहा-बिस्कीट देऊन ती पण तिथेच चहा घेत बसली. बाबल्याने कुस्मीला विचारलं, 'आईशीक आणि बापसास चाय नाय दिलास तो?'

कुस्मी म्हणाली, 'त्यांका टाइम हा अजून. व्हळावर जाऊन आल्यावर घेतील.' बाबल्या म्हणाला, 'गे पण त्या संडास बांधून दिला कशाक मी?' त्यावर कुस्मीने सांगितलं, 'ता काय ता माका म्हाईत नाय. तुमचे आईस-बापूस असा, तुम्हीच काय ता बघा.' एवढं बोलून कुसुम पाणी भरायला गेली.

बाबल्याने आता पडवीतल्या बाजेवर अंग टाकलं आणि मोबाइलवर काही मेसेज आलाय का बघायला सुरुवात केली. पण निवांतपणा त्याच्या नशिबी नव्हता. शेजारची मयेकरीण येऊन त्याच्या आईला विचारत होती. 'गे तुझो झील ईला काय? सगळा बरा असा ना?' बाबल्याच्या आवशीने सांगितलान, 'काय बोलला नाय बा. आराम करूक आलंय म्हणताहा.' मयेकरीण म्हणाली, 'नाय गे, ते कंपनी बंद पडता म्हणून लोकं हयसर परत येतात, म्हणून ईचारलंय. च्यापाणी झाला काय गे? काय हाडलंन या वेळेस?' बाबल्याची आऊस म्हणता कशी, 'काय नाय हाडल्यान या वेळेस. बिस्कीटा पण घरातलीच खाऊक दिलंय. माका वाटता बायलेसाठी गाऊन का काय ते हाडलान हा. आमच्यासाठी काय नाय बा. तुका काय च्या होवी का काय? कुस्मी गेली पाणी भरूक आणि माका काय तो घॅस चालू करता येणे न्हाय. तू आपली नंतर ये.'

मयेकरीणच्या लक्षात आलं, आपली डाळ काही इकडे शिजणार नाही. ती निघाली जाता जाता तिने बाबल्याला हाक मारली,

'काय रे बाबल्या, तू गावाकडे येणार म्हणून बाबूक सांगितलं होतंस?' बाबल्या म्हणाला, 'न्हाय गे, अचानकच सुट्टी मिळाली, तशी लगेच निघालो.' मयेकरीण विचारतात होती, 'किती दिवसाची सुट्टी आहे तुझी? घावण्याचे पीठ देऊचा हा बाबूक. नेशील ना रे?'

झालं बाबल्या विचार करू लागला आता किती जण काय काय देणार कोण जाणे? येताना कुणाच्या भेटी नव्हत्या पण जाताना न्याव्याच लागणार. आता बाबल्याने ठरवलं, जरा वाडीत फिरून येऊ या. त्याने पैशांचं पाकीट घेतलं आणि तो निघाला फेरफटका मारायला. खानविलकरणीने बघितलं आणि त्याला हाक मारून जवळ बोलावून विचारपूस केली. त्याला म्हणाली, 'काय रे झीला, वेळेवर इलास बघ. कालच म्हैस व्यायली हा. बघ खरवस वाटायलाच निघाले होते. तू पण चव घे. आज तुला आवडतो तसा नारळाच्या दुधाचा करीन. संध्याकाळी घेऊन जा.' बाबल्याने खरवस खाल्ला आणि निघायच्या आधी खानवलकरणीला म्हणाला, 'गे मावशे, यावेळेस भेट हाडूक जमले नाय. तरी हे घे १०० रुपये.' खानविलकरीण म्हणाली, 'बाबल्या झीला, अरे पैसे नको मला. ठेव तुझ्याजवळ आणि मला मोबाइल चार्ज करून दे. अरे इकडे कुणाक जमणा नाय ना रिचार्ज करूक. मग पंचाईत होते. आणि आता भेट पण आणू नको. इकडे आता सर्व काही मिळता.'

खानविलकरणीकडून बाबल्या निघाला, वाडीमधली पुरुष मंडळी शेतावर कापणीसाठी गेली होती. अप्पा बोलला, 'अरे तू काळजी करू नको. उद्या एकादशी आहे ना, उद्या सगळे मोकळेच असतील.' एकादशीला कुणी शेतात काम करत नाही. उद्या पण कोंबो मिळणार नाही म्हणून बाबल्या हिरमुसला झाला. त्याने अप्पाला सांगितलं कुणाचा कोंबा आहे का ते बघ. घरी येऊन कुसुमला वड्याची तयारी करायला सांगितलं. बाबल्याची आई जात्यावर घावण्यासाठीचे तांदूळ दळत होती. थोडे तांदूळ दळून झाल्यावर तिने कुसुमला चूल पेटवायला सांगितले.

बाबल्या घरी आल्यावर त्याला चुलीवरचं जेवणच लागतं. कुसुमनी चूल पेटवली आणि नारळ खोवायला घेतला. घावणे तयार होईपर्यंत गुळवणी तयार झाली. बाबल्याने घावणे गुळवणी खाऊन मस्त ताणून दिली. संध्याकाळी खानविलकरीण खरवस घेऊन आली. तिने कुसुमला विचारलं, 'काय गे, कोंबो मिळालो काय? न्हाय तर माझ्याकडे तलंग कोंबडी असा. रुक्मी येणार होती पण तिका काय रजा मिळूक न्हाय. तू घाल बाबल्याला करून. मी नंतर घेईन कुणाकडून तरी रुक्मी ईली की.'

कुसुमला जरा बरं वाटलं, आता सगळीकडे फिरत बसायला नको. वड्याची तयारी करायला हरकत नाही. खानविलकरीण आता बाहेर जाऊन पुरुषांच्या गप्पा रंगल्या होत्या तिकडे जाऊन बसली. राण्यांच्या अभ्याने तिच्यासाठी पान लावायला घेतलं. तिचं सगळं लक्ष बाबल्या काय सांगतो तिकडे होते. ती त्याला म्हणाली, 'अरे तू असा मध्येच आलास म्हणून जरा आमका टाइमपास तरी हा. नायतर गणपती आणि शिमग्याशिवाय कोणच येऊक न्हाय. आता काय

सामान/ औषधपाण्याची चिंता न्हाय. तो जाधवाचा संतोष माहीत असा मा तुका? तो सर्व करतो.'

बाबल्याला ती काय सांगतेय तेच कळेना. ती पुढे सांगत होती, 'अरे, आता सगळे चाकरमानी कणकवलीच्या पत्त्यावर पार्सल पाठवतात. मग तो आमका हाडून देता. त्याका पैकं देऊचे लागतत. पण पार्सल पाठवणारा पैकं त्याच्या मोबाइलवर पाठवता. आमका सगळा घरबसल्या मिळता. फक्त मोबाइल चार्जिंग करणारा न्हाय कुणी. अरे परवा ती सावतीण ईली होती नवा फोन मिरवत होती. म्हणता कशी माझ्या चेडवानी नवीन फोन पाठवलाय त्यात म्हणे निस्ता बोलूचा की अमुक अमुक माणसाक फोन लाव. की लगेच फोन लागतो. मी तिका इचारलंय फोन लागतो पण मिस् कॅाल लागतो का ता सांग. तर लगेच तिका काम आठवलं. आता तूच सांग बाबल्या आम्ही कुणाक फोन लावूक नाय मग आम्हाला तो फोन काय कामाचा? आमका मिस् कॅाल देणारा फोन असेल तर घेऊन ये पुढच्या वेळी इलास की.' हा इरसालपणा बाबूला नवीन नव्हता, तरी पण बाबू चाट पडला.

एक बरं झालं की त्याला जास्त पैसे लागणार नव्हते. कधीतरी १०/२० रुपयांचे रिचार्ज करून द्यायचे. कारण बॅलन्स संपला की यांना यांच्या माणसांपासून दूर गेल्यासारखं वाटतं. आता त्यांना मोबइलचाच आधार वाटतो. मुलं पण इतकी वात्रट झालीत की मैदानात खेळ खेळत नाहीत. कुणाचा तरी मोबाइल घ्यायचा आणि गेम खेळत बसायचं. आणि मग चुकून फोन लागतो आणि या म्हाताऱ्या माणसांचा फोनमधला बॅलन्स संपतो.

बाबल्याने बाबूला विचारलं, 'अरे मुलं क्रिकेट वगैरे काही खेळत नाहीत?' बाबू म्हणाला, 'अरे क्रिकेटसाठी बॅट, बॅाल लागतो. त्यासाठी पैसे लागतात ना.' बाबल्याने विचारलं, 'अरे पण पकडा पकडी, लपाछपी खेळायला तर काही लागत नाही. विटी-दांडू तर आपण बनवू शकतो ना?'

यावर बाबू म्हणाला, 'विटी बनवायची किंवा बेचकी बनवण्यासाठी कष्ट कोण घेणार? त्यासाठी चांगलं लाकूड शोधून आणावं लागतं. मग त्याला तासावं लागतं. पण हे करण्यापेक्षा बाजारात १० रुपयाला मिळते ती चायनीज बेचकी किंवा विटी आणायची. पण आपण तयार करण्यातली गंमत यांना काय कळणार?'

बाबल्या विचार करत होता किती बदललाय गाव आणि त्यातली माणसं. चाकरमानी पाठवतो त्या सामानावर दिवस काढायचे. मुलांना खाऊ काय आणायचा विचारलं तर सांगतात, मॅगीची पाकिटं आणा. आंबोळ्या, घावणे, शिरवळ्या नको असतात. तांदळाची, नाचणीची भाकरी नको असते. पिझ्झा पाहिजे असतो. पोहे, उपमा, शिरा नको असतो; वडापाव पाहिजे असतो. पण खानविलकरीण, मयेकरीण, जाधवीण, सावतीण मात्र तीच असते. माझा नाही पण तुझा चेडू, झील आलेला असो तर त्याका ह्या खाउक दी त्या खाउक दी करणाऱ्या. कुणाच्या तरी झीलान, चेडवान खाल्लान म्हणजे आपल्याच झीलान, चेडवान खाल्ल्याचं त्यांना समाधान मिळतं. पूर्वी चाकरमानी गावी आला की काहीतरी हातावर ठेवायचा, ते पैसे चाकरमानी परत जाताना त्यांच्याच मुलाबाळांच्या हातावर ठेवायचे आणि वर पेजेचे तांदूळ, कुळीथाची पिठी नाहीतर घावण्याचं पीठ द्यायचं. काही लोक कोकम, भाकरीचे तांदूळ द्यायचे.

बाबल्याची रजा आता संपत आली होती. कोंबडी-वडे, आंबोळी, शिरवळ्या, शेतातले खेकडे खाऊन बाबल्या तृप्त झाला होता. जाधवांच्या बेबीने सुकवलेले गरे आणून दिल्यामुळे सुकट घातलेली गऱ्याची भाजी पण खाऊन झाली होती. आता मोबाइलमुळे माणसं फोनवरच गप्पा मारत होती. गप्पांचे फड रंगलेच नाहीत, त्यामुळे जरा चुकल्यासारखंच वाटत होतं. बाबल्याचं मन भरून आलं होतं, कुसुम भेट म्हणून आलेल्या वस्तू त्याच्या बॅगेत भरत होती. त्याने तिला विचारले, 'काय गे कुस्मे, माका काय समजेना झाला. आपला गाव बदलला हा की माणसा बदलली?' त्यावर कुसुम म्हणाली, 'जाऊ दे , तुम्ही जास्त इचार करू नका. गाव पण तोच असा आणि माणसं पण तीच. पण बदलल्यात त्या त्यांच्या गरजा. म्हणून तुमका तसा वाटता. तुम्ही पुढच्या वेळी याल तेव्हा आणखीन काही गरजा बदलल्या असतील. निवांत झोपा आता.'

दुसऱ्या दिवशी बाबल्या निघाला तेव्हा सगळ्याजणी जमल्या होत्या, त्याला टाटा करायला. सगळ्या म्हाताऱ्यांना एकच गोष्ट पाहिजे होती,' त्याने अधूनमधून १०-२० रुपयांचं रिचार्ज करावं. त्याचीच आठवण करून द्यायला सगळ्या जमल्या होत्या. आवशी, बापसाला 'येतंय गं' म्हटल्यावर त्यांनी पोचल्यावर फोन करण्याची आठवण करून दिली. आता पोस्ट कार्डाची जागा फोनने घेतली होती. राक्षसाचा जीव पोपटात होता, तसा गाववाल्यांचा जीव फोनमध्ये अडकला होता. असा विचार करून बाबल्या बाबूच्या मोटारसायकलवर बसला. मोटारसायकल दिसेनाशी झाली तरी तिचा आवाज येतच होता, पण लवकरच त्या आवाजाची जागा मोबाइलच्या रिंगटोनने घेतली आणि सगळ्यांची पांगापांग झाली.

response.lokprabha@expressindia.com



विचार

अनिकेत देशमुख

नातं मैत्रीचं...!

आग लगी जब घर में तब उसने पूछा,
'बचा क्या है?' मैंने कहा, 'मैं!'
तब उसने कहा,
'तो फिर जला ही क्या है?'

जन्मापासून मृत्यूपर्यंत माणूस अनेक नाती जोडत असतो. काही नाती जन्मतःच जुळलेली असतात, तर काही नाती तो जीवन जगताना जोडत जातो. त्यापैकीच एक नातं असतं मैत्रीचं, जे प्रत्येकाच्याच जीवनात खूप महत्त्वाचं ठरतं. प्रेमापेक्षा मैत्री नेहमीच श्रेष्ठ ठरताना दिसते.

पुराणांमध्ये, इतिहासात अशा पवित्र आणि अतूट मैत्रीची अनेक उदाहरणे आहेत. द्वारकाधीश श्रीकृष्ण आणि सुदामा यांच्यातील मैत्री असो वा महाभारतातील दुर्योधन आणि कर्ण यांची मैत्री, ती पवित्र बंधामुळे अजरामर झाली आहे. इतिहासात डोकावताना डोळ्यांसमोर उभी राहते हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती संभाजी महाराज व कवी कलश यांच्यातील दृढ मैत्री. अखेरच्या श्वासापर्यंत त्यांच्यातील हे मैत्रीचं नातं कायम राहिलं. अकबर-बिरबलाची मैत्री, तेनालीराम व महाराज कृष्णदेवराय यांची मैत्रीही याच वर्गातली. हे सर्व मित्र काळावर नाव कोरून गेले.

आजच्या आधुनिक काळात मैत्रीचं स्वरूप, तिची व्याख्या, या नात्याचे संदर्भ सारेच बदलले आहेत. राहणीमान, फॅशन, समाजमाध्यमे यांचा आज मानवी मनावर आणि पर्यायाने मैत्रीच्या निकषांवरही मोठा प्रभाव पडत आहे. मित्रांची संख्या वेगाने वाढत आहे; पण ही मैत्री खरीच मैत्री आहे का, याचे उत्तर मात्र देता येत नाही. आजकाल फेसबुकवर अनेकांच्या मित्रयादीत हजारो मित्र असतात. त्यांची फ्रेंड्स लिस्ट कायम फुल झालेली दिसते; परंतु यापैकी खरे मित्र किती, हे सांगणे मात्र कठीण असते. नैराश्याच्या गर्तेत अडकल्यानंतर मनातील सल कोणापुढे व्यक्त करावी, यशापयश कोणाला सांगावे. अपमान, आनंद, दुःख निर्धास्तपणे कोणाकडे व्यक्त करावे, असा प्रश्न मित्रयादीत हजार मित्र असणाऱ्यांनाही पडलेला असतो. मित्रांची खरी गरज असते, तेव्हा त्यांना आधार द्यायला एकही मित्र समोर येत नाही आणि हीच त्यांची सर्वात मोठी शोकांतिका ठरते.

आधुनिक तंत्रज्ञानामुळे जग खिशात आले असले, तरी प्रत्येक नाते समाजमाध्यमांपुरतेच सीमित झाले आहे. मैत्री फ्रेन्डशिप डे साजरा करण्यापुरतीच उरली आहे. सारे काही यशापयशाच्या, आर्थिक लाभांच्या, स्वार्थाच्या तागडीत तोलले जात आहे. अशा स्थितीत आपल्या फेसबुकवर किती मित्र आहेत, आपण किती व्हॉट्सॲप ग्रुपवर आहोत, यापेक्षा आपल्या आयुष्यात जिवाभावाचे मित्र किती आहेत, याचा विचार केला जाणे गरजेचे आहे.

response.lokprabha@expressindia.com

कथा

सुनील शिरवाडकर

वेडी

वैशाख संपत आला. आकाशात ढगांची गर्दी दाटू लागली. सगळीकडे अंधारून आलं आणि थोड्याच वेळात ताड– ताड– ताड पावसाचे थेंब पडू लागले. कौलांवरून, पत्र्यांवरून पाण्याच्या धारा वाहू लागल्या. पावसाचा जोर जसा वाढला, तसे रस्त्यांवरून, नाल्यांमधून पाण्याचे लोट वाहू लागले, गंगेला येऊन मिळाले, गंगेचा प्रवाह फुगत गेला. त्या प्रवाहातून झाडाच्या फांद्या, पाणसाप, विंचू वाहत येऊ लागले.

काठावरच्या मुरलीधर मंदिराच्या दारात उभं राहून वेडी ते पहात होती. अचानक काय झाले, कुणास ठाऊक, वेडी एकदम पावसात नाचू लागली. तिला पावसाचा भारी लळा. नाचत नाचतच खाली आली आणि गंगेच्या काठी पाण्यात उतरून खेळू लागली. गंगेच्या पाण्याला जसं काही मिठीत घेऊ लागली. ओंजळीने ते गढूळ, मातकट पाणी पिऊ लागली.

कोणी तरी तिला म्हटलंही...

'असं गढूळ पाणी पिऊ नये. शास्त्र आहे तसं.'

'तुझं शास्त्र ठेव तुझ्यापाशी. चव बघ या पाण्याची. नव्या पाण्याची.'

'अगं, तब्येत बिघडेल त्यानं.'

'नाही... या पाण्यानं तर नाहीच बिघडणार. झाडाला कशी चैत्र पालवी फुटते, तशी आपल्या गंगेला ही ज्येष्ठ पालवी फुटली आहे. त्यानं थोडीच तब्येत बिघडणार? आणि गवळिणीची तर मुळीच नाही.'

सगळे जण तिला वेडी गवळण म्हणूनच ओळखायचे. अशी उंचीने जरा कमी. एका हातात हातभर बांगड्या, तर दुसऱ्या हातात काहीही. कधी कडं, कधी तुटकं घड्याळ, गळ्यात पण काय काय घालून घ्यायची. माळा काय, पोती काय. कपाळावर तीट आणि गालात एका बाजूला तंबाखूची गोळी. लालसर गोरी, पण लक्ष वेधून घ्यायचे तिचे पाणीदार डोळे.

तिला वेडी म्हणायचे सगळे; पण खरं तर ती मुळीच वेडी नव्हती. खूप हुशार होती. आई–वडील नव्हते तिला. भावाकडेच राहायची. शाळेतही जायची. पुस्तकं वाचायची; पण त्या काळात मुलींनी शिकणं, शाळेत जाणं म्हणजे मोठं पाप. वहिनी तिच्या भावाचे कान फुंकायची. मग भाऊ तिला खूप मारायचा. एकदा रात्री भावानं खूप मारलं तिला आणि मग रात्रीतूनच ती घराबाहेर पडली... कायमचीच.

आणि मग ती गंगेचीच झाली. दिवसभर गंगेच्या काठी फिरायची. कधी खंडोबाच्या कुंडात पाय सोडून बसायची. कधी गाडगेबाबा धर्मशाळेत जाऊन बसायची. तिथल्या सदावर्तात कधी तिला काही खायला मिळे, तर कधी हाकलूनही दिले जाई. कधी तापलेल्या खडकांवरून उड्या मारत व्हिक्टोरिया पुलाजवळ यायची. तिथे डोहात सूर मारणाऱ्या मुलांकडे पहात बसायची. सगळेच तिची चेष्टा करायचे...

अंगावर पाणी उडवायचे; पण वेडीला त्याचे काही नाही. हसत बसायची एकटी.

कधी कोणी तिला गवळण म्हणायला सांगायचे. तिच्या मनात आलं की ती म्हणायची. आजूबाजूला लोक, यात्रस्थ जमायचे. मग तिला स्फुरण चढायचे. स्वतःभोवती गिरक्या घेत मोठ्याने गायची. म्हणता म्हणता तिचा वेग वाढायचा. घागरा डेरेदार होऊन गरगरत फिरायचा. तिला हसणारे होते, डोळा मारणारेही होते.

पण वेडी इतकीपण वेडी नव्हती. गरगर फिरून तिचा कधी तोल गेला नाही आणि डोळा मारणाऱ्यांकडे बघून तर कधीच नाही. त्याबाबतीत ती शहाण्या मुलींपेक्षा शहाणी होती.

संध्याकाळ झाली... ऊन उतरलं की वेडी थकून जाई. दिवसभर गंगेच्या काठी फिरल्यानंतर तिला घराची ओढ लागे. तिला तिचं असं घर नव्हतंच मुळी; पण तिला आसरा दिला होता तो तिच्या कान्ह्याने, मुरलीधराने. पाय ओढत, हळूहळू ती दगडी पायऱ्या चढून मंदिरात यायची. संतबुवांनी सांगितलं होतं, वेडीला कोणी काही बोलायचं नाही. मंदिरात एका कोपऱ्यात गोधडी टाकून बसून राही. तिच्या चेहऱ्याकडे पाहून संतबुवांना तिचं मन कळे. मुखावाटे एक एक गवळण गात कधी तिचे डोळे भरून येत. गालावरून ओघळ येत; पण ती कधीच काही बोलायची नाही. संतबुवा समजायचे, आज वेडीला कोणी तरी मारलंय किंवा ती उपाशी आहे. पोटात काही नाही बिचारीच्या.

मग ते त्या गोपालकृष्णाच्या पुढ्यातलं नैवेद्याचं ताट तिच्या पुढ्यात ठेवत.

'घे... शांतपणे जेव आता.'

पण वेडीला कुठला धीर. ताटातले सगळे पदार्थ एकत्र करायची... गोपाळकालाच तो... आणि बकाबका खायला सुरुवात करायची.

संतबुवांनी तिला मुलीची माया दिली. जन्माष्टमी उत्सवात तर वेडी मंदिराच्या बाहेर कधी पडलीच नाही. दिवसरात्र पडेल ते काम करायची. संध्याकाळी भजनात टाळ घेऊन साथ करायची.

आज जन्माष्टमीच्या उत्सवाची सांगता होती. संतबुवा कीर्तनाला उभे राहिले. मंदिराचे प्रांगण कृष्णभक्तांनी फुलून गेलेले. मुरलीधराचे आजचे रूप विलक्षणच. उंची पोशाख, दागिने, तुळशी फुलांच्या माळा आणि तो हसरा चेहरा. वेडीला वाटलं, आत्ता तो ओठावरचा पावा दूर करून आपल्याशी बोलायला लागेल. वेडी एकटक ते साजिरे रूप पहात होती, नजरेत साठवत होती.

बुवांचं कीर्तन रंगात आलेलं. बुवा एकामागून एक गवळणी गात आहेत. सगळे जण डोलत आहेत.

आणि अचानक बुवा एका चरणावर अडले. नेहमीचीच गवळण; पण पुढची ओळ त्यांना आठवेना. पुढे काय... पुढे काय...

बुवांच्या मागे साथीला वेडी होतीच. तिचे डोळे जरी त्या योगेश्वराकडे होते, तरी कान मात्र बुवांच्या कीर्तनाकडे होते. ऐकून ऐकून तिला सगळंच पाठ झालेलं, तोंडात बसलेलं. वेड्या गवळणीने तो चरण उचलला आणि टाळांच्या ठेक्यावर ती गाऊ लागली..

काळी घोंगडी हाती काठी।
लागला धेनुचे पाठी।।
अरे हरी, व्रज वाकुडा की तुजसाठी।
बैसला यमुनेचे तटी।।
राधा गोरटी हाती वाटी।
लागली कृष्णाचे पाठी।।
एका जनार्दनी झाली दाटी।
घातली पायांवर मिठी।।

response.lokprabha@expressindia.com



पुस्तकाचे नाव : शब्दांची नवलाई
कवी - एकनाथ आव्हाड
प्रकाशक : दिलीपराज प्रकाशन, पुणे
पृष्ठे : ६४, मूल्य : १५०/- रु.

पुस्तकाचे पान

मोहन कुंभार

शब्दवैभव समृद्ध करणाऱ्या बालकविता

एकनाथ आव्हाड यांचा 'शब्दांची नवलाई' हा बालकवितासंग्रह नुकताच वाचनात आला. पारंपरिक बालकवितेला फाटा देऊन लिहिलेल्या वेगळ्या, अभ्यासपूर्ण बालकवितांचा समावेश या संग्रहात आहे. हा संग्रह वाचताना वाचक उत्कंठावर्धक भावविश्वात रममाण होतो. मुलांना कविता वाचताना आपण अभ्यासाला पूरक असे काहीतरी वाचतो आहोत; जे कंटाळवाणे नाही असेच वाटेल. 'शब्दांची नवलाई'मधल्या कविता जरी बालकांसाठी असल्या तरी मोठ्यांनाही, प्रामुख्याने लहान मुलांना शिकविणाऱ्या शिक्षकांना भुरळ घालणाऱ्या आहेत. या बालकविता केवळ मुलांच्या मनोरंजनासाठी नाहीत, तर मराठी विषयाचा अभ्यास कसा हसत-खेळत होऊ शकतो याचा हा एक उत्तम परिपाठ आहे.

एकनाथ आव्हाड शिक्षक असून त्यांचा एक कवितासंग्रह, १२ बालकवितासंग्रह, तीन काव्य कोडीसंग्रह, सहा बालकथासंग्रह, एक नाट्यछटा संग्रह आणि एक चरित्र प्रकाशित झाले आहे. समकालीन बालसाहित्यिकांमध्ये एकनाथ आव्हाड हे एक समर्थ लेखक आहेत. मुलांमध्ये वावरताना त्यांना काय आवडते, हे उलगडत गेल्यामुळे त्यांनी मुलांसाठी अभ्यासपूर्ण लेखन केले. आव्हाड स्वतः मुलांसाठी कथाकथन करतात. शिक्षकांनाही कथाकथन कार्यशाळेद्वारे मार्गदर्शन करतात. त्यांच्या काही पुस्तकांच्या ब्रेल लिपीतील आवृत्त्याही प्रकाशित झाल्या आहेत. अनेक पुस्तकांचे हिंदी व इंग्रजी भाषेत अनुवाद झाले आहेत. बालकोश खंड एक ते पाचमध्ये त्यांच्या बालकवितांचा समावेश आहे. आकाशवाणीसारख्या माध्यमातून त्यांच्या बालकवितांचे अनेकदा प्रसारण झाले आहे. त्यांच्या काही बालकवितांचा समावेश अभ्यासक्रमातील पाठ्यपुस्तकांमध्येही झालेला आहे.

बालसाहित्यातील महाराष्ट्र शासनाच्या पुरस्कारांसह अनेक महत्त्वाचे पुरस्कार देऊन त्यांना गौरवण्यात आले आहे. अनेक बालकुमार साहित्य संमेलनांचे अध्यक्षपदही त्यांनी भूषवले आहे. एकनाथ आव्हाड यांच्या बालसाहित्यावर साहित्यिक सदानंद पुंडपाळ, डॉ. सुरेश सावंत व डॉ. मथु सावंत यांनी लेखन केले आहे. अनेक दैनिके, साप्ताहिके, मासिके, दिवाळी अंक यातून त्यांचे साहित्य सतत प्रसिद्ध होत असते. फेसबुकसारख्या माध्यमातूनही ते सातत्याने वाचकांसमोर येतात. लेखनाला पूरक अशा अनेक उपक्रमांमध्ये ते नेहमीच सहभागी होतात. बालसाहित्य हा केवळ त्यांच्या कामाचाच भाग नसून जगण्याचा भाग झाला आहे.

बालविश्वाशी समरस होऊन लिहिणे ही नक्कीच सोपी गोष्ट नाही. बदलत जाणारा काळ, शैक्षणिक पद्धती, शैक्षणिक साधने यानुसार त्यांनी मुलांच्या गरजांचा विचार करून शब्दांची नवलाई हा बालकवितासंग्रह लिहिला आहे. या बालकविता वाचताना मुलांना अभ्यासातली काही कोडी सुटत जातातच. शिवाय शिष्यवृत्तीसारख्या अवघड परीक्षांसाठी या कवितासंग्रहाचा खूप चांगल्या पद्धतीने वापर करता येईल, हे प्रकर्षाने जाणवते. मुलांच्या मनात अभ्यासाविषयी गोडी निर्माण करण्यात हा संग्रह नक्कीच मदत

करेल यात शंका नाही. यात मराठी विषयातील कठीण वाटणारा व्याकरणविषयक भाग सोप्या पद्धतीने, जिव्हाळ्याने कवितेत उतरवण्याचा खूप चांगला प्रयत्न केला आहे.

डॉ. सुरेश सावंत यांची प्रस्तावनात्मक पाठराखण या बालकवितासंग्रहाला लाभली आहे. आपल्या प्रस्तावनेत ते म्हणतात, 'एकनाथ आव्हाड यांनी बालकवितेला पारंपरिक चौकटीतून मुक्त केले आहे. शब्दांची नवलाई हा त्यांचा संग्रह म्हणजे बालकवितेतील प्रयोगशीलतेचा आणखी पुढचा टप्पा आहे. एकनाथ आव्हाड हे मुळात एक उत्तम शिक्षक आहेत. त्यांची भाषेची जाण अतिशय प्रगल्भ आहे. या भाषिक प्रगल्भतेतूनच त्यांच्या शब्दांची नवलाई या संग्रहातील कविता अवतरल्या आहेत. त्यांना जाणवलेली मराठीतील शब्दांची नवलाई बाल-कुमार वाचकांपर्यंत पोचविण्याचा त्यांचा प्रयत्न कौतुकास्पद आहे. मराठी भाषेतील आणि व्याकरणातील अनेक नवलाईच्या गोष्टी त्यांनी कवितेत बांधल्या आहेत. विद्यार्थ्यांना वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करता येणे हे एक भाषिक कौशल्य आहे. त्या वाक्प्रचारांतील सौंदर्य समजले तरच विद्यार्थी छान छान वाक्ये तयार करू शकतील.'

या संग्रहातील 'आई म्हणते' या कवितेत आव्हाड यांनी 'तोंड' हा एकच शब्द मराठीत वेगवेगळ्या परिस्थितीत कशा पद्धतीने वापरता येतो हे सहज सुंदरपणे मांडले आहे. उदाहरणार्थ; संकटांना तोंड देणे, तोंड भरून बोलणे, दुसऱ्याच्या बोलण्यात तोंड न घालणे, तोंडसुख घेणे, तोंडाची वाफ दवडणे, तोंडाला पाने पुसणे, तोंडाला तोंड देणे, तोंडघशी पाडणे, तोंड सोडून बोलणे, तोंडाला कुलूप लावणे... असे वाक्प्रचार त्यांनी कवितेतून सहजपणे मांडले आहेत. त्याशिवाय 'आपला हात जगन्नाथ' या कवितेत 'हात' हा अवयव घेऊन वाक्यांमध्ये बदल झाल्यावर त्याचे अर्थ कसे बदलत जातात हे सांगितले आहे. त्यांच्या हातात या अशा मांडणीविषयीची जादूच आहे. मराठीत एकाच शब्दाला अनेक अर्थ असतात हेसुद्धा त्यांनी कवितेतून फार ओघवत्या शैलीत मांडले आहे. मराठीत कुठल्याही वाक्प्रचाराचा शब्दशः अर्थ घेता येत नाही. तसे सरळ अर्थ घेतले तर ऐकणाऱ्याचा गोंधळ उडू शकतो, अशा अर्थाची ही कविता. उदाहरणार्थ; घर डोक्यावर घेणे, डोळ्यात धूळ फेकणे, हातावर तुरी देणे, जिभेचा पट्टा चालविणे, नाकाने कांदे सोलणे, वगैरे वगैरे...

विद्यार्थ्यांना नेहमीच समूहदर्शक शब्द कठीण वाटतात. आव्हाड यांनी या समूहदर्शक शब्दांची 'समूहाचे गाणे' या कवितेत ओघवत्या शैलीत मांडणी केली आहे. प्राणी आणि त्यांचे राहण्याचे ठिकाण याविषयी 'घरांची नवलाई' या कवितेतून सांगितले आहे. 'अनुभवांच्या खाणी' या बालकवितेत मराठीत वापरल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या म्हणींचा प्रत्येक कडव्यात चपखलपणे वापर केला आहे. व्याकरणदृष्ट्या मुलांना आकर्षित करण्यासाठी सामान्य नाम, विशेष नाम आणि भाववाचक नाम असे नामांचे प्रकार उदाहरणासहित 'नामाचा महिमा' या कवितेत मांडले आहेत.

'बाबा म्हणतात' या कवितेत क्रियापदावरून उद्देश हेतू जाणून घेता येतो, हे सहज सुलभतेने स्पष्ट केले आहे. 'शब्दांची लाडीगोडी'मध्ये जोडून येणाऱ्या शब्दांविषयी खूप छान रचना आहेत. शब्दांच्या नादमयतेविषयी लिहिलेल्या 'नादमयता' या कवितेतून पाण्याचा खळखळाट, पानांचा सळसळाट, चाकांचा खडखडाट... इत्यादी नादांविषयी जाणून घेता येते.

लेखक आणि त्यांची टोपणनावे मुलांना अनेकदा ओळखता येत नाहीत. यासाठी एकनाथ आव्हाड यांनी 'नावात बरंच काही' या कवितेत साहित्यिक आणि त्यांची टोपणनावे खूप छान पद्धतीने मांडली आहेत. राम गणेश गडकरींचे टोपणनाव 'गोविंदाग्रज', वि. वा. शिरवाडकरांचे 'कुसुमाग्रज' अशी नावे समजावून सांगितली आहेत.

शब्दांची नवलाई या शीर्षक कवितेत 'कर' या शब्दाचे अनेक अर्थ मुलांना समजावून सांगितले आहेत. उदाहरणार्थ; कर म्हणजे हात, कर म्हणजे टॅक्स. त्याचबरोबर चरण, जलद, चिरंजीव असे शब्दांचे वाक्यानुसार बदलणारे अर्थ या कवितेत आहेत. 'चिन्हांचा खेळ' या कवितेत चिन्हांची ओळख. 'प्रकाश गाणे' या कवितेत एकाच शब्दाला असणारे अनेक समानार्थी शब्द. 'मधासारखी गोड' या कवितेत काही मित्रांची स्वभावानुसार केलेली तुलना दिसते. 'आईस पत्र' या कवितेत पत्र सर्वसाधारणपणे कशा स्वरूपाचे असावे हे स्पष्ट होते. 'शब्दांचा साठा' या कवितेत प्राणी आणि त्यांचे आवाज याविषयीची वर्णने आहेत. 'गमतीची गोष्ट' व 'वेगळीच बात' या कवितांमधून अनुक्रमे सर्वनाम, विशेषणांचे प्रकार यांची ओळख होते.

एकनाथ आव्हाड यांनी या बालकवितासंग्रहाची रचना आपल्या वर्गातील विद्यार्थिमित्रांना समोर ठेवून केली आहे. त्यांना ज्या ज्या ठिकाणी अभ्यास अवघड वाटेल त्या त्या ठिकाणी त्यांना या संग्रहाची आठवण व्हावी व त्यांनी या कवितांची उजळणी करावी अशाच पद्धतीने आशयनिर्मिती केली आहे. मराठी भाषेला सजविण्यासाठी आणि ती सहज, ओघवती करण्यासाठी वेगवेगळ्या शब्दालंकारांची गरज असते. शब्दांचा योग्य ठिकाणी वापर केला की भाषेचे सौंदर्य खुलते. वाचताना मनाला, जिभेला माधुर्य जाणवते. मराठी व्याकरणातल्या कठीण गोष्टी सोप्या वाटत जातात. आपण केवळ शिकत नाही तर खेळत आहोत अशी जाणीव होते, हे या संग्रहाचे प्रमुख सामर्थ्य आहे.

मराठीचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांनी हे पुस्तक वाचल्यास ते आपल्या विद्यार्थ्यांना विविध क्लिष्ट संकल्पना सहज समजावून सांगू शकतात. शिक्षण म्हणजे केवळ माहिती पुरवणे नव्हे तर विषयाची परिभाषा हृदयात उतरवणे होय. हा कवितासंग्रह ही जबाबदारी चोख निभावतो. सर्वच बाल-कुमारांनी व शिक्षकांनी वाचावा व संग्रही ठेवावा असा हा कवितासंग्रह आहे.

response.lokprabha@expressindia.com

प्रतिसाद

सोनाली नवांगुळ

माजगावकरी सहजयोग

'लोकप्रभा' दिवाळी अंकात संपादक विनायक परब यांनी 'व्वा चितारताना' या लेखात कोल्हापुरातले चित्रकार जी. एस. माजगावकर यांच्याविषयी लिहिले आहे. मी कोल्हापुरात राहात असून त्यांच्याविषयी इतकी विस्तृत माहिती व चित्रं या लेखानिमित्त पाहायला मिळाली.

'कोल्हापूर स्कूल' म्हणून नावाजल्या गेलेल्या चित्रांहून माजगावकरांची चित्रं किती वेगळी आहेत, त्यांचा विचार किती आधुनिक आहे हे जाणवलंच! बरेच जपला आहे. त्या परिसराला दर रविवारी चित्रकार भेट देतात आणि तिथेच बसून चित्रकाम करतात. भारतात असा अनुभव येत नाही, कारण आपल्या सरकारकडे ही संवेदनशीलता नाही, हे सांगताना सरांच्या डोळ्यांत नकळत अश्रू तरळलेले असतात...'

अगदी परवाच मेधाताई (मेधा पाटकर), सुनीती, सु. र. आणि अन्य साथींसह कोल्हापुरात आली होती. तिच्या एका मीटिंगमध्ये पुराच्या प्रश्नांविषयी, निष्कर्षांविषयी, उपाययोजनांविषयी चाललेली चर्चा थोडीफार ऐकता

'व्वा' चितारताना!

दिनकर

मुद्दे, उल्लेख या लेखात येतात, ते मुळातूनच वाचावेत... पण एक उल्लेख इथं नोंदवते.

'रंकाळा गेल्या ३०-४० वर्षांत बदलला आहे, तशी पंचगंगाही. आबालाल रहेमानांनी रंगविलेल्या रंकाळ्यावरच्या संध्यामठाच्या चित्रातील प्रकाश आता मिळणार नाही, कारण रंकाळ्याचे पाणी प्रदूषित आहे, त्यामुळे तेथील प्रकाशदेखील बदलला आहे. तो प्रकाश आता मिळणार नाही... कोल्हापुरात पूर्वी तलाव होते. आता ते राहिले नाहीत. आबालाल रहेमान यांनी रंगविलेल्या वॉटर लिलीजचा तलाव गायब आहे, कारण तो बुजवला गेलाय. जगद्विख्यात चित्रकार मोने यांनी रंगविलेल्या वॉटर लिलीजचा परिसर तेथील सरकारने आली. कोल्हापुरातल्या दोन-तीन मीटिंग्ज, मग कराड, मग सातारा असा तिचा दौरा होता. स्थानिक पर्यावरण कार्यकर्त्यांशी बोलून नोंदी घेणं सतत सुरू होतं. त्याविषयी त्या त्या जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांशी बैठका असणार होत्या.

आता माजगावकर सरांवरचा लेख वाचताना राहून राहून मेधाताई व तिचे कार्यकर्तेच आठवत राहिले. तळी, ओढे, नद्या यांवरचा प्रकाश झळाळता राहावा, ती प्रदूषणमुक्त राहावीत, माणसं त्यांच्याकाठी फिरावीत, गात राहावीत, चित्रं काढत राहावीत यासाठीच तर त्यांची धडपड.

response.lokprabha@expressindia.com

प्रतिसाद

प्रा. मो. नि. ठोके

निकोप दृष्टी देणारा लेख

'लोकप्रभा'च्या दिवाळी अंकात शमिका वृषाली यांनी लिहिलेला 'इसवी सनाचे दुसरे शतक शृंगारप्रेमी महाराष्ट्र' हा लेख वाचला. या लेखातून स्त्री-पुरुष संबंधांबाबत निकोप दृष्टी देणारा अत्यंत महत्त्वाचा विचार वाचावयास मिळाला याचा आनंद वेगळा आहे. स्त्री-पुरुषांत शारीरिक आकर्षणातून प्रेमभावना निर्माण होत असते हे आपल्याकडे मान्य केले जात नाही. अनेक ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत हा विचार नाकारत असतात. आपल्याकडे स्त्री-पुरुष संबंधाकडे नकारात्मक दृष्टीने पाहिले जाते. प्रेम ही भावना मनात उचंबळून कधी येते? तर स्त्री-पुरुषांना आपल्या पसंतीचे जोडीदार मिळतात त्या वेळी मन उचंबळून येते; तसेच या वेळी स्त्री-पुरुषांमध्ये समर्पणाची भावना असते. प्रत्येक व्यक्तीच्या मनाची धाव ही सुखाकडे, आनंदाकडे असते. स्त्री-पुरुषांत शारीरिक आकर्षणातून प्रेमभावना निर्माण होत असते हे शाश्वत सत्य आहे. दुर्दैवाने आपल्याकडे हे सत्य स्वीकारले जात नाही. या लेखात म्हटले आहे- प्रेमाचा व्यापक अर्थ प्रीती असला तरी त्याची आदी किंवा अंतिम परिणती ही शृंगारात होते. म्हणूनच स्त्री-पुरुषांचे लैंगिक आकर्षण हेच प्रेमाचे मूळ आहे. हा विचार सातवाहन राजा 'हाल' याने संपादिलेल्या ग्रंथात वाचावयास मिळत आहे. हा विचार हाल राजाने सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी सांगितलेला आहे. हा विचार आधुनिकतेच्या या युगात अत्यंत गरजेचा आहे.

सातवाहन राजा हाल याचा कालखंड इ. स. २० ते इ.स. २४ हा आहे. याने फक्त चार वर्षे राज्य केले. त्याच्या या लहान कारकीर्दीला 'शांतीयुग' असे म्हटले आहे. शांती, समृद्धी असते त्या वेळी स्त्री-पुरुष प्रीती फुलत असते. हाल हा राजा उत्तम कवी होता. याचा उल्लेख काही पुराणे आणि 'लीलावती', 'अभिधन चिंतामणी', 'देशनाम माला' इ. ग्रंथांत आला आहे. त्याने प्राकृत भाषेत 'गाथासप्तशती' हा ग्रंथ संपादित केला असे मानले जाते; परंतु डॉ. भांडारकर यांच्या मते दुसऱ्या कोणी तरी हा ग्रंथ रचून हाल राजाला अर्पण केला असावा असे म्हटले आहे. 'बृहत्कथे'चा लेखक गुणाढ्य हा हाल राजाच्या समकालीन होता. त्यानेच हा ग्रंथ लिहिला असावा असे म्हटले आहे. तत्कालीन सामाजिक स्थिती आणि संस्कृती यावर प्रकाश टाकणारा हा ग्रंथ आहे. या ग्रंथात साळी समाजातील नंदीवृद्धा आणि हरिवृद्धा या दोन कवींच्या गाथांचा समावेश करण्यात आला आहे. ही माहिती प्रसिद्ध प्राचीन इतिहास संशोधक डॉ. वा. वि. मिराशी यांनी लिहिलेल्या The History and inscription of the Sala Vahans and The Western Kshatrapas या ग्रंथात पान क्र. १९० वर दिलेली आहे.

'ख्वा' चितारताना!

response.lokprabha@expressindia.com

पोटपूजा

तुषार प्रीती देशमुख

सामिष मेजवानी

नारळ दुधातील कोलंबी बटाटा रस्सा

- एक बाऊल कोलंबी (२५ कोलंबी) सोलून त्यातील काळा धागा काढून स्वच्छ धुऊन थाळीत काढून घ्याव्यात. १ मोठा चमचा आलं-लसूण पेस्ट, १ टीस्पून हिंग, अर्धा चमचा हळद, २ चमचे बेडगी मिरची पावडर, १ मोठा चमचा मिक्स मसाला (संडे मसाला), १ चमचा लिंबू रस, चवीनुसार मीठ एकत्र करून कोलंबीला लावावे. १० मिनिटे मुरू द्यावे.
- १ नारळ फोडून त्याच्या अर्ध्या कवडीचा ओला नारळ खवणून त्याचे मिक्सरमधून दूध काढून घ्यावे.
- तोवर २ मोठे कांदे उभे पातळ चिरून घ्यावेत, २ मोठे टोमॅटो बारीक चिरून घ्यावेत. ३ मध्यम आकाराच्या बटाट्यांची सालं काढून त्यांचे आठ काप करून घ्यावेत. कोथिंबीर बारीक चिरून घ्यावी.
- कढईत २ चमचे तेल घालून पाव टीस्पून हिंग, १ चमचा कढीपत्ता पावडर घालून कांदा परतून त्यात टोमॅटो घालावा. त्यात मुरलेली कोलंबी घालून मध्यम आचेवर परतवून अर्धा पेला पाणी व नारळाचे दूध घालून वाफेवर शिजवून घ्यावे. शेवटी त्यात १ चमचा गरम मसाला, १ चमचा साजूक तूप व बारीक चिरलेली कोथिंबीर घालून पुन्हा एक वाफ येऊ द्यावी.

गार्लिक खिमा चीज टोस्ट

- १५० ग्राम चिकन खिमा पाण्याने ४-५ वेळा धुऊन घ्यावा. पाणी निथळण्यासाठी बारीक चाळणीचा वापर करावा.
- खिम्याला १ चमचा आलं-लसूण पेस्ट लावावी. त्यावर १ टीस्पून हळद, अर्धा टीस्पून हिंग, १ चमचा मिरची पावडर, १ चमचा मसाला (घरी जो नेहमी वापरता तोच), १ चमचा लिंबू रस, १ चमचा मीठ, १ टीस्पून धणे-जिरे पावडर व १ टीस्पून तेल लावून १० मिनिटे मुरच ठेवावे.
- १० मोठ्या पाकळ्या लसूण सोलून बारीक चिरून घ्यावा.
- १ मध्यम आकाराचा कांदा व वाटीभर कोथिंबीर बारीक चिरून घ्यावी.
- कढईत १ चमचा तेल व २ चमचे बटर घालून लसूण लालसर परतवून घ्यावा व त्यावर कांदा परतवून त्यात मुरलेला खिमा घालावा. खिमा परतवून त्यात पाव वाटी पाणी घालून २० मिनिटे वाफेवर शिजवावे. त्यात १ टीस्पून गरम मसाला व कोथिंबीर घालून परतवून कोरडे करून घ्यावे.
- २० पाकळ्या लसूण सोलून बारीक चिरून बटरवर खमंग लालसर परतवून घ्यावे.
- ब्रेड स्लाइसला बटर व टोमॅटो सॉस लावून त्यावर २ मोठे चमचे खिमा ठेवून त्यावर खमंग परतलेला लसूण पेरावा. दुसऱ्या ब्रेड स्लाइसला बटर व टोमॅटो सॉस लावून त्यावर ठेवावी. टोस्टरमध्ये टोस्ट करून घ्यावे व मधोमध कापून गरमागरम गार्लिक खिमा चीज टोस्ट सर्व्ह करावा.

ऊर्जायुक्त थालीपीठ

- १ मध्यम आकाराचा कांदा, १ बाऊल कोथिंबीर बारीक चिरून घ्यावी.
- २ मोठ्या (कमी तिखट) हिरव्या मिरच्या, १ इंच आलं, १ चमचा जिरं, २ चमचे तीळ (तव्यावर थोडे परतून घ्यावेत), ८ पाकळ्या लसूण हे सर्व मिक्सरमधून थोडंसं पाणी घालून वाटून घ्यावं.
- परातीमध्ये १ वाटी ज्वारीचं पीठ, अर्धा वाटी बाजरीचं पीठ, पाव वाटी मक्याचं पीठ आणि पाव वाटी तांदळाचं पीठ घेऊन त्यात एक चमचा ओवा हातावर कुस्करून घालावा. १ टीस्पून गोडा मसाला, १ चमचा हळद, ४ चमचे वाटण, १ चमचा मीठ, चिरलेला कांदा, कोथिंबीर आणि २ चमचे तेल घालून पीठ एकत्र करून मग त्यात थोडं-थोडं कोमट पाणी घालून मध्यम जाडसर मळून घ्यावं.
- पोळपाटावर तेलाचा हात लावून मळलेल्या पिठाचा मोठा गोळा घेऊन मध्यभागी ठेवून हाताने थापावं. थापून झाल्यावर त्याला ३-४ छिद्रं करून घ्यावीत.
- तव्याला तूप किंवा तेल लावून गरम होताच त्यावर थापलेलं थालीपीठ ठेवून मंद आचेवर झाकण ठेवून ३-४ मिनिटं शिजवून थालीपीठ परतवावं. त्यावरील छिद्रांमध्ये तूप सोडून लालसर रंगावर खमंग भाजून घ्यावं.
- गरमागरम ऊर्जायुक्त थालीपीठ शेंगदाण्याच्या चटणीबरोबर खावं.

response.lokprabha@expressindia.com

संस्कार

कथा

मेघना फडके

नेहा पोंक्षे तशी तरतरीत स्मार्ट मुलगी, पण खेड्यातली. हिच्या कोकणी शहाळ्यासारख्या भाबड्या गोडव्याला भुलून वल्लभने आत्याच्या मागे लागून तिला मागणी घातली. तिलाही तो स्मार्ट तरुण पाहताक्षणी आवडला. आई म्हणाली, ‘‘बघ हो, राहशील ना नीट? मोठं शहर आहे, तुला काही माहीत नाही तिथलं.’’ तर अगदी आव आणत म्हणाली, ‘‘हो गं आई, तुझी लेक काही बावळट नाही, हुशार आहे, हो की नाही हो बाबा?’’ बाबांनीही तिची री ओढली. ‘‘हो गं, हुशार आहे माझी लेक, काही काळजी करू नको.’’

झालं, पुढच्या महिन्यात लग्न पार पडलं. नेहा पोंक्षेची नेहा अत्रे झाली आणि आलीसुद्धा वल्लभसोबत सासरी– मुंबईला. इकडे ही दोघंच राजा–राणी. नेहा मुंबईत नवीनच होती. नवऱ्याची नोकरी तिथे म्हणून गेलेली, पण यापूर्वी कधीही मुंबई न पाहिलेली. रस्ते माहीत नव्हते. बसची नावं, नंबर काही माहीत नव्हतं. वल्लभ ऑफिसला गेल्यावर अगदीच कंटाळली. घरी वेळ जाईना म्हणून धीर करून बाहेर पडली. नवऱ्याने बजावलं होतं, ‘एकटी जाऊ नकोस कुठे. परत यायला समजलं नाही तर कुठे शोधणार तुला?’ तरी मनात म्हणाली, खुणा लक्षात ठेवीन, दुकानांची नावं लक्षात ठेवीन आणि गेलेल्या रस्त्याने परत येईन. तिने यापूर्वी असा झगमगाट कधीच पाहिला नव्हता, त्यामुळे खूप भांबावून गेली होती, पण तिला ते आवडतही होतं. इथे सगळी माणसं कायम कशी गडबडीत असतात? असा प्रश्न तिला पडे. सगळी धावत आहेत, खरेदी करत आहेत, यांच्याकडे नेहमी कसे पैसे असतात? आपल्याला तर बाबांकडून घ्यावे लागत, इथे तर लहान मुलंसुद्धा सहज पैसे खर्च करतात... तिला बाळबोध प्रश्न पडत होते. सगळं तिला अचंबित करणारं होतं.

फिरायची तिला आवड होती, पण नेहमी

बहीण मिताली किंवा मैत्रीण बरोबर असायची. एकटी ती फार काही फिरलेली नव्हती. शाळा-कॉलेजात गेली असेल तेवढीच. या गजबजलेल्या शहरात ती आनंदाने फिरत होती. कुठे नवनवीन ड्रेस, खाण्याचे विविध पदार्थ सगळं न्याहाळत होती. कानातले, गळ्यातले विकणारी छोटी छोटी मुलं बघून तिला वाईट वाटलं. एवढ्या लहान वयात त्यांना काम करावं लागतं, म्हणून. तिने दोन कानातले विकत घेतले. थोडी पुढे चालता चालता तिला कुणी तरी धक्का दिला. तिला वाटलं गर्दीमुळे कुणी धडकलं असेल; पण नाही, तिला जाणवलं, तो धक्का चुकून नव्हता लागला. तो माणूस तिच्याकडे विचित्र पाहत होता. तोंडात माव्याचा तोबरा, टपोरी शर्ट आणि रंगवलेले केस. ती घाबरली, पण त्याहीपेक्षा तिला किळस वाटली. नजरच तशी होती त्याची. अगदी आरपार पाहत होता. तिला वाटलं, दोन ठेवून द्याव्यात मुस्कटात, पण इथे अनोळखी शहरात ती ते करू शकली नाही.

चालण्याचा वेग वाढवला आणि आल्या रस्त्याने परतू लागली. ती घाणेरडी नजर तिचा पाठलाग करत होती. तो अधिक अधिक जवळ येऊ लागला. आता तिच्या लक्षात आलं, यातून सुटण्यासाठी काही तरी करायला हवं. तो अगदी जवळ आला. त्याने तिचा हातच धरला, हिने एक जोराचा हिसका दिला आणि सुटली. आता मात्र ती पळत राहिली. तोही तिच्या मागे पळत राहिला. एका अरुंद रस्त्यावर त्याने तिला धक्का दिला. ती खाली पडली आणि ही संधी साधून तिला हात देण्याचे नाटक करत तो तिला भिडायचा प्रयत्न करू लागला. झटापट झाली, ती ओरडू लागली आणि तेवढ्यात एक युवक तिच्या मदतीला आला. त्याने त्या टपोरीला दोन लाफे दिले आणि घालवून दिलं.

तरी तो बडबड करत होता, 'तुझे देख लेंगे.' नेहा आता जरा सावरली आणि त्याच्याकडे कृतज्ञ नजरेने पाहत राहिली. आता तो तिच्या जवळ येऊ लागला. हिला वाटलं, धीर द्यायला येतोय, पण कुठलं काय, तोही तसाच होता. आता मात्र तिचा धीर सुटला, 'वल्लभ, कुठून तरी ये ना, देवा...' मनातल्या मनात श्रीराम जय राम म्हणू लागली. काय करावं तिला सुचेना. अचानक कुणी तरी तिचा हात धरून तिला ओढत घेऊन जाऊ लागलं. ती एवढी घाबरली की विरोध करण्याएवढे त्राणच राहिले नाहीत. ती फरफटत राहिली.

एका चाळीत तो थांबला. त्याने आईला हाक मारली, त्याची आई लगबगीनं बाहेर आली, ''काय रे बबलू?''

''आई, तो पलीकडच्या गल्लीतला भेळवाला हिला त्रास देत होता. मला माहीत नाही कोण आहे ते, आपल्या राणीसारखी वाटली गं आणि मला राहवलं नाही, त्याच्याशी मारामारी करण्यापेक्षा हिलाच दूर केलं. बघ तूच आता.'' नेहा पाहत राहिली. ती नलू आत्या होती. नेहा लहान असताना तिने पुसटंसं ऐकलं होतं, तिने पळून जाऊन लग्न केल्याचं. तरी तिच्या लक्षात होता आत्याचा चेहरा. ती कधीच माहेरी आली नव्हती. ''नलू आत्या?'' नेहाने जोरात विचारलं. तिला आनंद झाला होता, तिची आत्या भेटल्याचा, त्या परिस्थितीत जवळचं कुणी भेटल्याचा. आत्याही कौतुकाने आणि आश्चर्याने पाहत राहिली. ''नेहा ना गं तू?'' गालावरच्या तिळामुळे आत्याने ओळखलं. ''हो गं आत्या.'' दोघी अगदी आनंदून गेल्या. ''एकटी कशी गं तू इकडे?'' आत्याने विचारलं आणि नेहाला आठवलं. वल्लभ... तो आता शोधत असेल आपल्याला. सगळं तिला सांगितलं. ''अशी नको गं एकटी फिरू. दुनिया नाही गं चांगली इथली! मी कशी टक्कर दिली मला माहीत. असू दे, चल, मी येते तुला घरी सोडायला.'' नेहाला आठवलं, आजी नेहमी तिचं नाव आलं की डोळ्यांत पाणी आणायची, म्हणायची, ''हेच का संस्कार केले मी? काय चुकलं माझं?'' आजीला वाटायचं आपलंच काही चुकलं असणार नलूला वाढवण्यात, म्हणून ती पळून गेली. तिने आईला फोन केला, सगळी हकीकत सांगितली आणि म्हणाली, ''आजीला निरोप दे, तुझे संस्कार नाही कमी पडले. नलू आत्याच्या मुलामुळे मी वाचले आज. सॉरी आई, पुन्हा नाही जाणार मी एकटी बाहेर.'' आई ओरडणार हे माहीत असल्यामुळे तिने आधीच माफी मागितली. ''आई, मी आता कराटे क्लास लावणार आहे,'' तिने सांगून टाकलं.

आत्या नेहाला घेऊन तिच्या घरी गेली. वल्लभ काळजीने हैराण झाला होता. आत्याने त्याला समजावून सांगितलं. थोडा वेळ थांबून ती परतली. वल्लभ नेहाला घट्ट जवळ घेत म्हणाला, ''अशी कशी जातेस गं?'' त्याला सॉरी म्हणत ती त्याच्या कुशीत शिरली.

response.lokprabha@expressindia.com

विचार

अविनाश पोईनकर

अंधश्रद्धा आजही कायम

एकविसावे शतक विज्ञान–तंत्रज्ञानाबरोबरच आधुनिक विचार रुजवणारे, मानवी प्रगतीच्या क्षितिजांची व्याप्ती वाढवणारे असल्याचे ढोल आपण पिटतो. समाज अनिष्ट रूढी–प्रथा–परंपरा बाजूला सारून वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासू लागला आहे, कार्यकारणभाव समजून घेऊ लागला आहे, असे मानले जाते. मात्र प्रत्यक्षात आपण जागतिकीकरणाच्या मोहजाळात अडकलो आहोत. काही महिन्यांपूर्वी चंद्रपूर जिल्ह्यातील अतिदुर्गम जिवती तालुक्यात घडलेली घटना, हेच सिद्ध करते.

हा भाग तसा कायमच दुर्लक्षित राहिलेला आहे. जिवती तालुक्यापासून १२ किलोमीटरवर वणी खुर्द गावात २१ ऑगस्टला एक माणुसकीला काळिमा फासणारी घटना घडली. गावातल्या दोन महिलांच्या अंगात देवी येते आणि काही लोकांनी जादूटोणा–भानामती केली आहे, अशी बतावणी करण्यात आली. त्यानंतर संपूर्ण गाव एकत्र आले आणि गावातल्या चौकात सातही जणांना आणून त्यांचे हातपाय दोरखंडाने बांधण्यात आले. हे सर्व जण अघोरी कृत्य करत असल्याचा आरोप करून त्यांना जीवघेणी मारहाण करण्यात आली. हा प्रकार सुरू असताना गावातील सभ्य व्यक्तींनी बघ्याची भूमिका घेतली. कोणीही या प्रकाराला विरोध करण्याची हिंमत केली नाही. ही घटना दोन दिवसांनंतर उघडकीस आली.

असे का घडले?

एक वेळ राहायला घर नसले तरी चालेल पण आता प्रत्येक कुटुंबात स्मार्टफोन आले आहेत. या उपयुक्त तंत्रज्ञानाचा अनेकदा गैरवापर केला जातो. कोणतीही माहिती विशेषतः अफवा काही सेकंदात शेकडो लोकांपर्यंत पोहचते. मात्र या घटनेची माहिती पोलिसांनीही गुप्त ठेवली. पुरोगामी महाराष्ट्रात कुटुंबांना वाळीत टाकणं, गावाच्या बाहेर काढणं हे प्रकार नवे नाहीत. जिवतीतील वणी खुर्दच्या घटनेने यावर कडी केली आहे. हा प्रकार केवळ एका जाती–धर्मापुरता मर्यादित नाही, या घटनेने एकविसाव्या शतकाला वाकुल्या दाखवत समस्त मानवजातीला काळिमा फासला आहे.

शांताबाई भगवान कांबळे (वय ५३), शिवराज कांबळे (वय ७४), साहेबराव एकनाथ हुके (वय ४८), धम्मशीला सुधाकर हुके (वय ३८), पंचफुला शिवराज हुके (वय ५५), प्रयागबाई हुके (वय ६४), एकनाथ हुके (वय ७०) यांच्यावर हे अत्याचार करण्यात आले. वर्षानुवर्षे गावात राहणाऱ्यांना गावातील सर्व जण ओळखतात. असे असताना कोणाच्या तरी अंगात देवी येते किंवा कोणी तरी करणी करते, असे एखाद्याने सांगितले, तर त्यावर इतरांचाही विश्वास बसणे हे सर्वात भयावह आहे.

भानामतीचे प्रयोग केल्याचे पुरावे असतील तर कारवाई झालीच पाहिजे, मात्र त्यासाठी स्वतंत्र यंत्रणा आहे. गावाने अशी घृणास्पद वागणूक देणे कायद्याला धरून नाही. वयोवृद्ध मंडळींना इतक्या क्रूर पद्धतीने खांबाला दोरीने हात–पाय बांधून चौकात जबर मारहाण करणे संस्कृतीला धरून नाही. मानवी मनावर संपूर्ण गावाने केलेला हा आघात पचवून आता हे लोक गावात सन्मानाने राहू शकतील? कितीही समुपदेशन केले तरीही हे घाव भरून निघतील? या सात लोकांपैकी पाच जणांना गंभीर दुखापत झाली आहे. काहींची हाडे मोडली आहेत. हा हादरवणारा प्रकार पोलिसांनी वेळीच रोखला नसता तर याचे परिणाम किती तीव्र झाले असते, याची केवळ कल्पनाच केलेली बरी. ही घटना महाराष्ट्र–तेलंगणा सीमेवर घडली असली, तरी हे आपणा सर्वांचे सामाजिक अपयश आहे, हे स्वीकारायला हवे. ही परिस्थिती बदलण्यासाठी प्रयत्न केले जायला हवेत.

भूतबाधा, जादूटोणा केल्याचे आरोप ग्रामीण भागात नित्याचेच आहेत.

अभ्यासक्रमातही काळी जादू, पांढरी जादू शिकवली जाते. प्रबोधनाचे पाठ शालेय स्तरावर शिकवण्यात शासनही नापास झाले आहे. इग्नू विद्यापीठाने तर ज्योतिषशास्त्राला विद्याशाखा म्हणून मान्यता देऊन कहर केला आहे. अंधश्रद्धा निर्मूलन समिती आपल्या परीने या सर्व बाबींवर काम करून ढोंगी व्यक्तींचे पितळ उघडे पाडत असली, तरी प्रबोधनाचा ठेका केवळ या चळवळीने घेतलेला नाही. समाजातील घटक म्हणून सर्वसामान्य माणसाची काहीच जबाबदारी नाही का?

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष नरेंद्र दाभोलकर यांनी अंधश्रद्धा निर्मूलनासाठी कायदा अंमलात आणावा यासाठी १६ वर्षं संघर्ष केला, मात्र त्यांच्या हत्येनंतरच सरकारला जाग आली आणि कायदा करण्यात आला, हे पुरोगामी महाराष्ट्राचे अपयश आहे. 'महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष, अघोरी व दुष्कर्मी प्रथा अन् काळी जादू अधिनियम २०१३' या कायद्यातील कलमानुसार भूत उतरवण्याच्या बहाण्याने चमत्काराचा प्रयोग, गुप्तधन, करणी–भानामतीच्या नावाखाली अमानुष, अनिष्ट, अघोरी कृत्ये, नरबळी, जादूटोणा, एखाद्या व्यक्तीला अपशकुनी किंवा सैतान ठरवणे, भूत–पिशाचांना आवाहन करून घबराट निर्माण करणे, स्वत:मध्ये अलौकिक शक्ती आहे अथवा आपण कोणाचे तरी अवतार आहोत असा दावा करणे यावर बंदी घालण्यात आली आहे. मात्र तरीही जिवती तालुक्यात हा निर्घृण प्रकार घडला.

नरेंद्र दाभोलकर व माधव बागवे यांनी लिहिलेल्या काळी जादू अर्थात भानामती या पुस्तकात ते अधोरेखित करतात की, 'गेल्या २५ वर्षात हे प्रकार कमी झाले आहेत; परंतु बंद झालेले नाहीत. १० मे २०११ रोजी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या कराड तालुक्यात कराडपासून अवघ्या ११ किमीवर असलेल्या धोंडेवाडी या गावात अचानकपणे भानामतीचे प्रकार घडू लागले. टाकीतील पाणी तांबडे होणे, बंद कपाटातील वस्तू आपोआप बाहेर येणे, कपडे फाटणे व जळणे अशा स्वरूपाच्या भयचकित करणाऱ्या गूढ घटना घडल्या. ही भानामती आपला पाच वर्षांचा नातू करतो हे देवऋषीचे म्हणणे प्रमाण मानून सख्ख्या आजीने नातवाचा गळा दाबून बळी घेतला.

त्याच्याच दुसऱ्या दिवशी ११ मे २०११ ला रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यात मुंबईहून काही काळासाठी घरी आलेल्या तरुणाने लग्नानंतर चार वर्षे आपल्याला मूलबाळ नाही, याचे कारण आपल्या चुलत बहिणीने करणी केलेली आहे, हे भगताचे म्हणणे खरे मानून थंड डोक्याने बहिणीच्या डोक्यात काठी मारून तिचे आयुष्य संपवले. १३ मे २०११ ला नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यात धाकट्या जावेने आपल्यावर करणी–भानामती केली या संशयाने थोरल्या जावेने धाकटी जाऊ व तिचे एक महिन्याचे मूल यांचे जीवन संपवण्यासाठी त्यांना विष पाजले. यापासून बोध एवढाच घ्यायचा की, एकविसाव्या शतकात विज्ञानाचा सूर्य माथ्यावर आला असतानाही भानामतीची झापडे लावून माणसे आपले जीवन जगत आहेत.'

जिवती हा आदिवासीबहुल मागास तालुका आहे. या तालुक्याच्या विकासाच्या अनुशेषाबाबत सारेच गप्प आहेत. अजूनही स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षातदेखील बऱ्याच गावांत जायला रस्ते नाहीत. दळण–वळणाच्या सुविधा, वीज, इंटरनेट नाही. अठराविशे दारिद्र्यात आहे. त्यांच्या जोरावर काम करणारे संधिसाधू मात्र गब्बर झाले आहेत. शासनाच्या योजना कितपत प्रभावी ठरत असतील, हे अशा प्रकरणावरून लक्षात येते.

खरे तर अंगात देव येण्याचे सोंग घेऊन निरपराध कुटुंबांवर भानामती करत असल्याचा आरोप करणाऱ्यांना जादूटोणा कायद्याअंतर्गत कठोर शिक्षा होणे आवश्यक आहे. असे प्रकार अंधश्रद्धेतून किंवा पूर्ववैमनस्यातून होत असल्याचे अंनिसने बऱ्याचदा उघड केले. तरीही समाजमन जागृत होण्याचे प्रमाण समाधानकारक नाही.

भारत हा सुधारणावादी विचारांचा देश आहे. महाराष्ट्राला विवेकशील व तर्कनिष्ठ संतांची परंपरा आहे. संत तुकाराम महाराजांपासून संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अशा अनेकांनी आपले विचार मांडून जनजागृती केली. अंधश्रद्धा निर्मूलनासाठी भजन, कीर्तनातून प्रबोधनाचा रथ पुढे नेला. याच महाराष्ट्रात भानामतीच्या संशयामुळे असे प्रकार घडत असतील, तर प्रबोधनाची चळवळ गावखेड्यांत नव्याने व्यापक व सशक्त करणे आवश्यक आहे. केवळ अंधश्रद्धा निर्मूलन समिती व शासनच नव्हे तर सर्वसामान्य माणसांनीही एकत्र येऊन अंधश्रद्धांविरुद्ध उभे राहायला हवे.

response.lokprabha@expressindia.com



शब्दकोडे क्र. १९३ चे उत्तर

बो	क्या	सा	त	बं	डे	■	फ्रा	स्ट	र	फे	णे
ळ	■	ने	■	धू	■	टाँ	य	■	वा	टा	■
■	वै	गु	ण्य	■	रा	म	दा	स	■	■	हँ
अ	■	रु	■	मो	■	अँ	■	■	श	ब	री
ल	■	जी	■	ग	रु	ड	■	द	र	■	पॉ
ब	डा	■	वा	ली	■	जे	जु	री	■	उं	ट
त्या	■	ड	क	■	प	री	■	■	गा	■	र
ग	र	■	डा	व	■	■	का	स	व	■	■
ल	ह्या	न	■	न	ख	■	त	न	■	स	सा
ब	ट	■	ह	वा	ल	दा	र	■	क	ल	प
त्या	■	टां	■	स	ब	र	■	रा	म	■	शि
■	कां	गा	रू	■	त	■	बं	ग	ला	■	डी

उभी विधाने :

१) अमर्याद, अपार, ज्याला शेवट नाही असे
२) गडबड-गोंधळ घालणारा, भांबावणारा
३) कागदाचे वीस दस्ते
४) प्रामाणिक, सद्वर्तनी
५) श्रीरामांचे एक बंधू
६) गाडीचे छत
७) अनुकूल वेळ, मोका
८) निबिड, दाट; भयंकर
११) दंगामस्ती, धुमशान
१३) मोहरी
१६) मचवा, होडी
१७) हजामत, श्मश्रू
१९) गोजी, पाडी
२०) अंगकाठी, बांधा
२१) यथेच्छ, मन भरेपर्यंत
२३) धडा; न्यायोचित शिक्षा
२४) झीज, ऱ्हास, एक रोग
२६) भीती, डर
२९) लोंगर, फळांचा घोस
३१) दणकट, मजबूत
३२) कमी दर्जाचे, कवडीमोल
३४) उत्तम, वाईट नसलेला
३५) चकित; तल्लीन
३७) पगार, तनखा
३८) मूषक
३९) तळहात
४०) बोभाटा, प्रसिद्धी
४१) शत्रुत्व, दुश्मनी
४२) नवीन, अपरिचित
४३) पायऱ्यांची विहीर
४६) नाद; रुची, गोडी
४८) सोवळ्याचे रेशमी वस्त्र

शब्दकोडे-१९४

सरिता वेंगुर्लेकर

आडवी विधाने :

१) निराधार, अंतराळात लटकलेले
४) भोंगळ, गबाळ्या
७) टीम, खेळाडूंचा समूह
९) श्रीकृष्णाचे धर्मपिता
१०) भ्रमर, भुंगा
१२) दुसऱ्याच्या अधीन असलेला
१४) एक हिंस्र पशू
१५) बारा वर्षांचा काळ
१७) सामर्थ्य; हुशारी
१८) दरोडा
२०) खंदक, खळगा
२२) चंचल; चलाख; तल्लख
२३) हात दाखवून करून घेतात ते, वाईट चिन्ह
२५) गगन, आभाळ
२७) सीमा, वेस
२८) आयुष्य, उमर
३०) विवाहसंबंधाने झालेला नातलग
३३) त्रासदायक काम; अडचण
३५) शिक्षा, सजा
३६) गरीब, निर्धन
३७) गती
३८) वाळवंटातील जहाज मानला जाणारा प्राणी
३९) मोठे भांडण
४२) तंगिणी, सरिता
४४) अयोग्य, चुकीचे
४५) वनात राहणारे
४७) औपचारिक, वरवरचे
४९) लाट, लहर
५०) पहाटे गवतावर जमणारे जलबिंदू
५१) किंमत
५२) नेमाने यात्रेला जाणारा

response.lokprabha@expressindia.com

मेष

चंद्र–शुक्राचा युतीयोग हा उत्साह आणि आनंद यांची पर्वणी ठरणारा योग आहे. नव्या योजनांची आखणी कराल. त्या अमलात आणण्याचा प्रयत्न कराल. नोकरी–व्यवसायात समुदायाला उद्देशून मार्गदर्शन कराल. वरिष्ठ वर्गासह वैचारिक देवाणघेवाण होईल. सहकारी वर्गाच्या समस्या समजून घ्याल. वेळेत कामे पूर्ण करण्याकडे कल असेल. जोडीदाराच्या कष्टाचे चीज होईल. मुलांच्या अतिरिक्त मागण्यांवर आळा घालावा लागेल. हवामानातील बदल अंगीकारताना श्वसन व पचनाच्या तक्रारी उद्भवतील.

वृषभ

चंद्र–बुधाचा युतीयोग हा आपल्या विचारांवर ठाम राहण्यास मदत करेल; परंतु अट्टहास धरणे हितकारक नाही. नोकरी–व्यवसायात वरिष्ठ अधिकारी आपणास पाठिंबा दर्शवतील. सरकारी कामे धिम्या गतीने पुढे सरकतील. जोडीदाराच्या कामकाजात अडथळे निर्माण होऊन विलंब होईल. आर्थिक नुकसान टाळा. मुलांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे देता येतील. अंतर्गत उष्णता आणि वातावरणातील थंडी यामुळे उत्सर्जन संस्थेवर भार पडेल.

दि. ३ डिसेंबर ते ९ डिसेंबर २०२१

मिथुन

चंद्र आणि नेपच्यून या दोन संवेदनक्षम ग्रहांचा लाभयोग हा अंतःस्फूर्तिदायक योग आहे. भावनांचा समतोल राखून निर्णय घ्याल. नोकरी–व्यवसायात अनपेक्षित लाभ जाहीर होईल. आपल्या चातुर्याला दाद मिळेल. वरिष्ठ त्यांच्या अनुभवाची शिदोरी आपणास देतील. सहकारी वर्गाकडून मदतीचा हात मिळेल. शंकाकुशंका उपस्थित करू नका. जोमाने कामाला लागा. जोडीदार चांगली साथ देईल. मुलांना त्यांच्या वाटा सापडतील.

कर्क

रवी–चंद्राचा लाभयोग हा समस्या सोडवत पुढे नेणारा योग आहे. आपल्या मताचा मान राखला जाईल; परंतु त्यासाठी स्वतःला सिद्ध करावे लागेल. नोकरी–व्यवसायात काही गोष्टींचा विचार नव्याने करावा लागेल. वरिष्ठांचा पाठिंबा न मिळाल्यास हताश होऊ नका. जोमाने कामाला लागा. आपल्यातील लहानसे बदलही कामी येतील. जोडीदाराची ओढाताण होईल. मुलांना कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या यांची जाण द्याल. कोरड्या त्वचेच्या समस्या सोडवण्यासाठी वैद्यकीय सल्ला घ्यावा.

सिंह

बुध–नेपच्यूनचा केंद्रयोग हा तारतम्य दाखवणारा योग आहे. भावनेच्या आहारी न जाता विवेकी विचारांवर भर द्याल. नोकरी–व्यवसायात आकर्षक योजनांचा लाभ मिळेल. वरिष्ठांचा विश्वास खरा ठरवाल. हितशत्रूंचे डावपेच हाणून पाडाल. सावधगिरी बाळगाल. जोडीदाराला त्याच्या क्षमतेनुसार योग्य मोबदला मिळेल. कौटुंबिक नातेसंबंध दृढ होतील. मुलांच्या हळवेपणाचा अतिरेक त्रासदायक ठरेल. सांधेदुखी, युरिक ॲसिड या संबंधित त्रास होण्याची शक्यता आहे .

कन्या

चंद्र–बुधाचा लाभयोग हा उत्साहवर्धक योग आहे. मनात योजलेल्या गोष्टी पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त ऊर्जा खर्ची पडेल. कामानिमित्त लहानमोठे प्रवास कराल. नोकरी–व्यवसायात आपले अस्तित्व आणि वर्चस्व सिद्ध करून दाखवाल. सहकारी वर्गाला धाकात ठेवाल. कौटुंबिक वातावरण आनंदी राहील. जोडीदाराच्या कामातील अडथळ्यांमुळे त्याची अस्वस्थता वाढेल. पित्तप्रकृती बळावल्याने न झेपणाऱ्या जबाबदाऱ्या स्वीकारूच नका. निसर्गाचा आनंद घ्याल.

तूळ

गुरू–मंगळाचा केंद्रयोग महत्त्वाचे निर्णय घेताना धाडस देईल. मंगळाची जिद्द आणि गुरूची सात्त्विकता यांना समोपचाराची जोड मिळेल. नव्या गोष्टी शिकायला मिळतील. माणसांची योग्य पारख कराल. नोकरी–व्यवसायात आर्थिक व्यवहार लाभदायक ठरतील. सहकारी वर्गाचा सहभाग उल्लेखनीय असेल. जोडीदाराच्या कलेने घेतल्यास आपला त्रास कमी होईल. मुलांची उन्नती पाहून समाधान वाटेल. त्वचेचा कोरडेपणा त्रासदायक होईल. वैद्यकीय तपासण्या टाळू नका.

वृश्चिक

चंद्र–गुरूचा केंद्रयोग अडचणीतून मार्ग काढत पुढे नेणारा योग आहे. रडत न बसता नव्या उमेदीने आगेकूच कराल. नोकरी–व्यवसायात मनाविरुद्ध घटना घडतील. धीर धरावा. वरिष्ठांसह संबंध चांगले ठेवाल. सहकारी वर्ग आपली मते समजून घेईल. जोडीदाराला कामानिमित्त प्रवास करण्याची संधी उपलब्ध होईल. एकमेकांच्या संमतीने महत्त्वाचे निर्णय घ्याल. मुलांना योग्य मार्गदर्शन मिळेल. हाडांची काळजी घ्यावी. पडणे, मार लागणे, हाड मोडणे या शक्यता आहेत.

धनू

चंद्र–गुरूचा लाभयोग हा हितकारक निर्णय घेण्यास पुष्टी देईल. अग्नी तत्त्वाच्या राशीतील चंद्र आक्रमक न होता गुरूच्या शुभयोगामुळे अभ्यासक वृत्ती बाणवेल. नोकरी–व्यवसायात परदेशासंबंधित कामकाजाला गती मिळेल. प्रश्न सुटत जातील. वरिष्ठांकडून वाहवा मिळवाल. सहकारी वर्गाचा सल्ला उपयोगी ठरेल. जोडीदाराला अधिक मेहनत घ्यावी लागेल. कामाचा ताप व व्याप वाढेल. मुलांचे हट्ट पुरवावे लागतील. डोळे, त्वचा आणि उत्सर्जन यांची काळजी घ्यावी.

मकर

चंद्र–शनीचा लाभयोग हा सातत्य टिकवणारा योग आहे. चंद्राच्या कुतूहलाला शनीची चिकाटी आणि सखोल अभ्यासू वृत्ती यांची जोड मिळेल. नोकरी–व्यवसायात कायद्याने पुढे जाल. कामाव्यतिरिक्त इतर गोष्टींमध्ये रस दाखवू नका. काही गोष्टी वरिष्ठांच्या निदर्शनास आणून द्याल. सहकारी वर्गावरील विश्वास दृढ होईल. जोडीदाराच्या मेहनतीस फळ मिळेल. मुलांना त्यांच्या कार्यात वा शिक्षणात यश लाभेल. डोकेदुखी, मणका वा सांधेदुखी यांसारखे त्रास सहन करावे लागतील.

कुंभ

गुरू–चंद्राचा युतीयोग हा संधीचे सोने करणारा योग आहे. गुरूच्या ज्ञानाचा बौद्धिक राशीतील चंद्राला पुरेपूर उपयोग होईल. नोकरी–व्यवसायात अडचणीतून मार्ग निघेल. अधिकाराचा योग्य वापर कराल. वरिष्ठांचा विश्वास खरा ठरवाल. सहकारी वर्गाला आवश्यक ती मदत करण्याची तयारी दाखवाल. जोडीदार त्याच्या कार्यक्षेत्रात स्वतःला झोकून देईल. त्याच्या कष्टाचे चीज होईल. मुलांची रखडलेली कामे मार्गी लागतील. डोकेदुखीचा आणि खांदेदुखीचा त्रास उद्भवल्यास औषधोपचार घ्यावा लागेल.

मीन

चंद्र–बुधाचा लाभयोग भावना आणि विचार यांच्यात समतोल राखणारा योग आहे. कामाच्या स्वरूपात थोडा बदल होऊन नव्या योजना राबवाल. नोकरी–व्यवसायात आपला दृष्टिकोन बदलल्याने लाभदायक स्थिती प्राप्त होईल. वरिष्ठ आणि सहकारी वर्गाकडून फारसे सहकार्य मिळण्याची अपेक्षा न ठेवणे बरे! जोडीदार कौटुंबिक पातळीवर महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल. मुलांना आपले विचार पटवून द्यायचा प्रयत्न करा. मनोबल वाढवा. मणका आणि हिप बोन यांची काळजी घ्यावी लागेल.

response.lokprabha@expressindia.com

पधारो म्हारे देश...

माणूस, त्याची संस्कृती-परंपरा सगळं निसर्गातूनच घडलेलं आहे. परंतु ज्याप्रमाणे माणूस निसर्गातून अनेक गोष्टी घेतो, शिकतो, वापरतो त्याचप्रमाणे त्याच्या भोवतालच्या निसर्गात नसलेल्या गोष्टींची उणीवही भरून काढण्याचा प्रयत्न करताना दिसतो. याचं सर्वात उत्तम उदाहरण पाहायला मिळतं ते भारतातील आकाराने सर्वात मोठ्या असलेल्या राज्यात- राजस्थानमध्ये. राजस्थान म्हणजे वाळवंट, पावसाची कमतरता, कोरडी हवा, हाडं गोठवणारी थंडी आणि कातडी करपवणारा उन्हाळा... थोडक्यात राजस्थान म्हणजे जराही ओलावा, आर्द्रता, हिरवाई, सौम्यता नसलेला प्रदेश. पण याच प्रदेशात राहाणारे, इथल्या प्रतिकूल हवामानाला चिवटपणे तोंड देणारे आणि या रखरखीत प्रदेशात गीत-संगीत-कलेने सप्तरंगांचे इंद्रधनुष्य उलगडणारे स्थानिक आपल्या आदरातिथ्याने, आपुलकीने आणि दिलदारीने निसर्गातली ही उणीव दूर करतात. जयपूर-उदयपूरच्या रॉयल पॅलेसेसपासून ते सम-खुरीच्या वाळवंटातील भटक्या लोकांच्या तांड्यांपर्यंत राजस्थानात कुठेही गेलात तरी 'पधारो सा' म्हणून अतिशय प्रेमाने तुमचं स्वागत केलं जातं. साहजिकच देशी आणि विदेशी पर्यटकांच्या यादीतील सर्वात वरच्या क्रमांकाचे राज्य असते ते राजस्थान!

आकाराने विशाल (३ लाख ४२ हजार २३९ चौरस किलोमीटर) असल्याने भारतातील पंजाब, हरयाणा, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, गुजरात या राज्यांना आणि एवढेच नव्हे तर पाकिस्तानातील पंजाब आणि सिंध प्रांतांनाही राजस्थानच्या सीमा भिडलेल्या आहेत. तुलनाच करायची असेल, तर युरोपातील ग्रीस, पोर्तुगाल, हंगेरी, ऑस्ट्रिया आणि युनायटेड किंगडम या देशांपेक्षाही राजस्थानचे क्षेत्रफळ जास्त आहे.

इतिहासकाळात राजपुताना म्हणून ओळखली जाणारी ही भूमी इथल्या पराक्रमी वीरांच्या शौर्यासाठी, ललनांच्या अनुपम सौंदर्यासाठी, राजघराण्याच्या अनमोल खजिन्यासाठी आणि गीत-संगीताच्या क्षेत्रातील दिग्गज कलाकारांसाठी प्रसिद्ध आहे. भारताच्या इतिहासात मौर्य आणि गुप्त काळापासून आपल्या सळसळत्या अस्तित्वाचा ठसा उमटवणाऱ्या राजस्थानच्या वीरांची गाथा ही भारताची अभिमान गाथा आहे. गझनीच्या महंमदाचा अनेक वेळा पराभव करणाऱ्या पृथ्वीराज सिंहापासून ते १९६२ च्या चीनच्या आक्रमणात रेझांग लाची चौकी प्राणपणाने लढवणाऱ्या मेजर शैतानसिंगपर्यंत राजस्थानच्या वीर योद्ध्यांची परंपरा अंखड आहे. भारताच्या एकूण भूभागापैकी ११ टक्के भूभाग व्यापणाऱ्या राजस्थानचे सर्वात मोठे भौगोलिक वैशिष्ट्य म्हणजे थरचे वाळवंट आणि अरवली पर्वत. थरच्या वाळवंटाचा ८५ टक्के भाग भारतात (उरलेला पाकिस्तानात) आहे आणि त्यातील

६० टक्के वाळवंट राजस्थानात आहे. प्राचीन भारतीय साहित्यामध्ये या वाळवंटाचा उल्लेख 'मरुकंटर' असा आढळतो. प्रभू श्रीरामचंद्रांनी सीतेच्या शोधात फिरताना याच मरुकंटरमध्ये आपल्या अमोघ शक्तीने पुष्कर येथे पाण्याचे कुंड निर्माण केल्याची पुराणकथा आहे. राजस्थानातले राजवाडे, किल्ले, राजस्थानी पोशाख-दागिने, राजस्थानी संगीत-नृत्ये याबरोबरच तेथील खाद्य परंपराही लक्षणीय, चवदार आणि मोहात पाडणारी आहे. बिकानेरी भुजिया, मिर्ची बडा, प्याज कचोरी असे नाश्त्याचे पदार्थ असोत किंवा मुख्य जेवणातील गट्टेकी सब्जी, पापड का साग, लौकी के कोफ्ते, कैर सांगरी की सब्जी अशा चमचमीत भाज्या असोत, राजस्थानी जेवण तुमची रसनातृप्ती केल्याशिवाय राहात नाही. त्यात भर पडते ती गुजिया, घिवर, इमरती, बालुशाही, चुरमा लाडू अशा देसी घी मधल्या मिठायांची. त्यामुळे राजस्थानची सहल म्हणजे डोळ्यांना, कानांना आणि जिभेला मेजवानी हे समीकरणच आहे. जयपूर-उदयपूर-अबू ही मेवाडमधील ठिकाणे असोत किंवा मारवाडमधील जैसलमेर-बिकानेर-जोधपूर असोत या नेहमीच्या लोकप्रिय पर्यटनस्थळांबरोबरच राजस्थानमध्ये जरा हट के, ऑफ बीट म्हणता येशील अशी अनेक ठिकाणे आहेत. मग चला ऑफ बीट राजस्थानची झलक पाहूया

राजस्थानमधील मेवाडची राजधानी असलेले उदयपूर हे तलावांचे शहर म्हणून ओळखले जाते. सिसोदिया राजवंशातील राजे उदय सिंग दुसरे यांनी हे शहर सन १५५९ मध्ये वसवले. अरवली पर्वताच्या रांगांनी वेढलेल्या या शहराच्या परिसरात फतेह सागर, लेक पिचोला, स्वरूप सागर लेक असे एकूण सात तलाव आहेत. सिटी पॅलेस, लेक पॅलेस, जग मंदिर, सहेलियों की बाडी, मोती मगरी अशी अनेक पर्यटन आकर्षणे या शहरात आहेत. शिवाय महाराणा प्रताप आणि सम्राट अकबर यांच्यातील ऐतिहासिक लढाई जिथे झाली ती 'हल्दी घाटी' उदयपूरपासून जवळ आहे. राणी पद्मिनीच्या जोहाराची गाथा सांगणारा चित्तौडगढही उदयपूर जवळच आहे. उदयपूरला जाणारे बहुतेक पर्यटक चित्तौडगढच्या प्रसिद्ध किल्ल्याला भेट देतातच, पण उदयपूरपासून ८४ किलोमीटरवर असलेला कुंभलगढ मात्र पर्यटकांच्या यादीत सहसा नसतो.

राजसमंद जिल्ह्यात अरवली पर्वताच्या रांगेत १५ व्या शतकात बांधलेला कुंभलगढ आजही राजस्थानच्या गौरवशाली इतिहासाच्या खुणा जतन करत ताठ मानेने उभा आहे. युनेस्कोच्या विश्व वारसा यादीत समाविष्ट असलेला हा किल्ला १३ पर्वत शिखरांनी वेढलेला आहे. तीन हजार ६०० फूट उंचीवर असलेला हा किल्ला ३६८ हेक्टर परिसरात पसरलेला आहे. तसा या किल्ल्याला ६ व्या शतकापासूनचा इतिहास लाभलेला असला तरी सध्या आपण बघतो तो किल्ला राणा कुंभ यांच्या कारकीर्दीत बांधलेला आहे. राजस्थानातील मेवाड आणि मारवाड या भागांच्या सीमेवरचा हा किल्ला म्हणजे राजस्थानच्या शेकडो वर्षांच्या इतिहासाचा मूक साक्षीदार आहे.

या किल्ल्याची तटबंदी सुमारे ३६ किलोमीटर लांब आहे. तर किल्ल्याच्या प्रवेशद्वाराची भिंत १५ फूट रुंद (जाड) आहे. याच किल्ल्यावर महाराणा प्रताप यांचा जन्म झालेला असल्याने राजस्थानच्या इतिहासात कुंभलगढला विशेष स्थान आहे. किल्ल्यातील बादल महल, नीलकंठ महादेव मंदिर, पार्श्वनाथ मंदिर, हल्ला पोल- राम पोल- हनुमान पोल असे दरवाजे पाहताना राजस्थानी वास्तुशैली आणि कलाकुसरीचे दर्शन घडते. किल्ल्याभोवतीचे अभयारण्य हे इथे येणाऱ्या पर्यटकांसाठी आणखी एक आकर्षण ठरते. ६१० चौरस किलोमीटरवर पसरलेल्या या अभयारण्यात बिबट्या, चौसिंगा, निलगाय,



अस्वल, तरस, कोल्हा, चिंकारा असे प्राणी आणि विविध प्रकारचे पक्षी आहेत. कुंभलगढसाठी जवळचा विमानतळ आणि रेल्वे स्थानक उदयपूर हेच आहे. कुंभलगढच्या परिसरात लक्झरी रिसॉर्टपासून हॉटेल्सपर्यंत विविध प्रकारची निवास व्यवस्था उपलब्ध आहे.

राजस्थानच्या उत्तर भागातील शेखावती हा प्रांत तिथल्या खानदानी हवेल्या, त्यातील पेंटिंग्ज, नक्षीकाम आणि सौंदर्यपूर्ण रचनांसाठी प्रसिद्ध आहे. १५ व्या शतकात महाराव शेखाजी यांनी सिकर, चुरू आणि झुनझुन या भागांचे मिळून राज्य स्थापित केले, तेच पुढे शेखावाटी म्हणून ओळखले जाऊ लागले. या सगळ्या भागाचे उल्लेख रामयण-महाभारत काळाच्याही पूर्वीच्या ग्रंथांमध्ये आढळतात. झुनझुनमधील 'ढोसी हिल' या टेकडीवर च्यवन ऋषींचा आश्रम होता आणि तिथेच त्यांनी च्यवनप्राश तयार केले असे मानले जाते. या प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या शेखवती बोलीचा उपयोग सुमारे ३० लाख लोक करातात. संपूर्ण राजस्थानाच्या तुलनेत या प्रदेशातील साक्षरतेचे प्रमाण सर्वाधिक आहे. शेखावाटी हा भाग इतिहासकाळापासूनच व्यापाऱ्यांचा म्हणून ओळखला जातो. आधुनिक काळात ज्यांनी उद्योग-व्यवसायात मोठी झेप घेतली आहे, अशा बिर्ला, बजाज, पोद्दार, खेतान, ओसवाल, सिंघानिया, गोएंका या उद्योजकांचे मूळ शेखावाटीतच आहे. पर्यटनाच्या क्षेत्रात अनेकदा शेखावाटीचे वर्णन 'द वर्ल्ड्स लार्जेस्ट ओपन आर्ट गॅलरी' असे केले जाते.

शेखावाटीच्या कला परंपरेचे सुंदर दर्शन घडते ते 'मांडवा' या ऐतिहासिक गावामध्ये. या गावातील किल्ल्यापासून ते हवेल्यांपर्यंत सगळीकडे शेखावाटीचे प्रसिद्ध 'फ्रेस्को' पाहायला मिळतात. झुनझुन जिल्ह्यातील मांडवा जयपूरपासून १९० किलोमीटरवर आहे. कृष्ण लीलांपासून ते राजस्थानच्या कलाकुसरीत हमखास दिसणाऱ्या 'गजलक्ष्मी'पर्यंत पारंपरिक शैलीत रंगवलेल्या इथल्या हवेल्या म्हणजे खरोखरच राजस्थानी कला कौशल्याचे संग्रहालय आहे. मांडवा येथील किल्ला, लक्ष्मीनारायण लाडिया हवेली, मोहनलाल सराफ हवेली अवश्य पाहाव्यात. शेखावाटीमधील आवर्जून भेट द्यावे असे शहर म्हणजे 'फतेहपूर'. जयपूरहून बिकानेरकडे जाताना हे शहर लागते. या गावात भित्तीचित्रांनी सजवलेल्या हवेल्यांबरोबरच मंदिरेही पाहायला मिळतात. २०० वर्षांपूर्वीची सराफ हवेली, राधा-कृष्णाच्या चित्रांनी सजलेली जगन्नाथ लोहिया हवेली, सीताराम केडिया हवेली, गोएंका हवेली याबरोबरच फतेहपूरमधील नदाइन कल्चरल सेंटर पर्यटकांचे लक्ष वेधून घेते. ही मुळात नंदलाल देवरा यांची हवेली होती. प्रख्यात फ्रेंच चित्रकार नदाइन याने ती विकत घेऊन तिचे रूपांतर कल्चरल सेंटरमध्ये केले. त्यामुळे इथे शेखावाटी शैलीतील चित्रांबरोबरच अन्य पारंपरिक शैलीतील चित्रेही पाहायला मिळतात.

राजस्थान म्हणजे मरूभूमी, उजाड प्रांत, रखरखीत प्रदेश. मग अशा राज्यात वन्यजीव कुठले असणार असा समज असेल तर तो

साफ चुकीचा आहे. राजस्थानच्या या रेताड, उजाड, हिरवाईरहित निसर्गानेच पट्टेरी वाघांपासून ते स्थलांतर करून येणाऱ्या कुर्जा (क्रौंच) पक्ष्यांपर्यंत नाना प्रकारच्या वन्यजीवांना आसरा दिला आहे. राजस्थानच्या वन्यजीवनाचे सर्वांगसुंदर दर्शन घडते ते सवाई माधोपूरजवळच्या रणथंबोर नॅशनल पार्कमध्ये. या कोरड्या पानगळी रानामधल्या पट्टेरी वाघांचे किस्से देश-विदेशात मशहूर आहेत. या संरक्षित जंगलाला पार्श्वभूमी लाभलेली आहे ती १२ व्या शतकातील भव्य रणथंबोर किल्ल्याची. राजस्थानच्या नैसर्गिक अधिवासाचे आणि त्यातील वन्यजीवांचे दर्शन घडवणारे अभयारण्य म्हणजे 'ताल छापर'. चुरू जिल्ह्यातील 'छापर' गावाजवळच्या 'ताल' म्हणजे सखल गवताळ कुरणात हे अभयारण्य आहे. या माळरानावर काळविटे, चिंकारा, डेझर्ट कॅट, जंगल कॅट, गोल्डन जॅकल, इंडियन फॉक्स, डेझर्ट हेअर असे प्राणी पाहायला मिळतात, मात्र तालछापरकडे निसर्गप्रेमी आकर्षित होतात ते इथे दिसणाऱ्या अनेक प्रकारच्या शिकारी पक्ष्यांसाठी. मॉन्टेग्यूज हॅरिअर, मार्श हॅरिअर, टॉनी इगल, रेड नेक्ड

फाल्कन, शॉर्ट टोड इगल असे शिकारी पक्षी इथे सहज पाहायला मिळतात. त्यामुळे पक्षीप्रेमी पर्यटकांसाठी तालछापर म्हणजे माळावरचे नंदनवच ठरते.

राजस्थानच्या भेटीत एक ठिकाण अवश्य पाहायला हवे कारण इथे अभयारण्य वा संरक्षित अरण्य नाही पण तरीही हे गाव पक्ष्यांचे रक्षणकर्ते म्हणून ओळखले जाते, कारण या गावातील जमिनीचा एक तुकडा चक्क कुर्जा म्हणजे दिमॉइझल क्रेन्सच्या नावावर नोंदवण्यात आला आहे. हे आहे फलोदी तालुक्यातील 'खिचन'.या गावातील रतनलाल मालू यांनी भूतदया म्हणून पक्ष्यांना दाणे घालायला सुरुवात केली, स्थलांतर करून येणारे दिमॉइझल क्रेन्स त्या दाण्यांसाठी मोठ्या संख्येन इथे येऊ लागले आणि आता खिचन हे दिमॉइझल क्रेन्सचे आश्रयस्थान मानले जाते. ऑक्टोबरच्या अखेरीपासून इथे क्रेन्स गोळा व्हायला सुरवात होते. १५-२० हजार पक्षी रोज सकाळी इथे दाणे टिपायला येतात. हा अनोखा सोहळा पाहायला पर्यटकही गोळा होतात. जोधपूरपासून १५० कि.मी.वर असलेल्या खिचनकडे जाताना वाटेत ओसियां हे गाव लागते. या गावातील प्राचीन मंदिरे पाहाण्यासारखी आहेत.

राजस्थान जसा शाही राजवाड्यांसाठी ओळखला जातो त्याचप्रमाणे भव्य, बुलंद किल्ल्यांसाठीही प्रसिद्ध आहे. जोधपूरचा मेहरानगड, जयपूरचा आमेरचा किल्ला, जैसलमेरचा गोल्डन फोर्ट, चित्तौडगढ, रणथंबोरचा किल्ला हे तर लोकप्रिय आहेतच परंतु राजस्थानच्या पारंपरिक वास्तू वैभवाचे, स्थापत्य कलेचे दर्शन घ्यायचे असेल तर 'बुँदी'ला भेट द्यायलाच हवी. ऐतिहासिक वारसा लाभलेल्या बुँदीमधील मुख्य आकर्षण म्हणजे 'तारागड '. बुँदीचे राज्य स्थापन करणाऱ्या राव देवा याने १४ व्या शतकात या किल्ल्याचे बांधकाम सुरू केले.या भव्य किल्ल्यात जाण्यासाठी लक्ष्मी पोल, फुटा दरवाजा आणि गगुडी की फाटक अशी तीन प्रवेशद्वारे आहेत. या प्रवेशद्वारांवर हत्तीची शिल्पे कोरलेली आहेत. या किल्ल्यातील भीम बुरुजावर कधीकाळी 'गर्भगुंजन' ही महाकाय तोफ आरूढ झालेली असायची. किल्ल्यातील छत्र महल, रतन महल, बादल महल, फूल महल अशी दालने त्यातील कलाकुसरीमुळे पर्यटकांचे लक्ष वेधून घेतात.

राजस्थानच्या पारंपरिक वास्तुकलेतील महत्त्वाची गोष्ट म्हणजे 'स्टेप वेल' अर्थात पायऱ्यांच्या विहिरी किंवा कुंड. पाण्याचे दुर्भिक्ष्य असलेल्या या प्रदेशात पायऱ्या पायऱ्यांची रचना करून जलसंवर्धनाचे तंत्र तयार करण्यात आले होते. बुंदीमध्ये या तंत्राने बांधलेल्या अनेक विहिरी किंवा कुंड पाहायला मिळतात. नागर-सागर कुंडसारखी जुळी कुंड असोत किंवा आपल्या भौमितिक रचनेनं थक्क करणारं डभई कुंड असो, बुंदीमधली कुंड पारंपरिक शहाणपणाचं देखणं दर्शन घडवतात. आणखी एक थक्क करणारी वास्तू म्हणजे 'चौरांसी खंबोंकी छत्री'. दिवंगतांच्या स्मरणार्थ छत्री उभारण्याची परंपरा राजस्थानमध्ये आहे. बुंदीचे महाराज राव अनिरुद्धसिंग यांनी आपल्या 'देवा' या दाईच्या स्मरणार्थ ही चौऱ्यांशी स्तंभांची छत्री उभारलेली आहे. या वास्तूवरच्या कोरीवकामात वन्य प्राण्यांची चित्रे आणि राजस्थानी लोकजीवनाचे दर्शन घडते. बुंदी शहराचे आणखी एक आकर्षण म्हणजे महाराव राजा भावसिंग यांनी सन १६४५ मध्ये बांधलेला मोती महल हा राजवाडा. राजस्थानी महाराजांच्या विलासी जीवनशैलीची झलक या राजवाड्यात दिसते. या शिवात बुँदीमध्ये फुल सागर, नवल सागर, जैत सागर असे तलावही आहेत. थोडक्यात कोट्यापासून फक्त ३९ कि.मी.वर असलेलं बुँदी म्हणजे मिनिएचर राजस्थानच आहे.

आपल्या भव्य राजवाड्यांनी, चमचमीत खाद्यपदार्थांनी,मोहक लोकसंगीताने आणि डोळ्यांचे पारणे फेडणाऱ्या कलाकौशल्याने राजस्थानची मरुभूमी 'पधारो म्हारे देश' म्हणून आमंत्रित करत आहे. हे आमंत्रण अवश्य स्वीकारा आणि राजस्थानच्या रंगांत रंगून जा.

response.lokprabha@expressindia.com